The Indian Banking system, though has got out of the stage of infancy and is attaining its stage of manhood, was being governed, by the Companies Act. To secure orderly growth of banking, to protect the interest of depositors, to avoid unhealthly competion among banks and to prevent banking failures there was a strong need of a comprehensive Banking Act. The Bill in this connection prepared by Reserve Bank of India in 1939, which could not pass in 1944 was introduced as a new Bill in the Legislature in 1946. This again was withdrawn in January 1948, and reintroduced on 22nd March, 1948. It was passed on 17th January 1949, and came into force from 16th March 1949. The Act defines a banking company as a company "accepting, for the purpose of lending or investment, or deposits of money from the public repayable on demand or otherwise and withdrawable by Cheque, drafts, order or otherwise". All banks working in provinces or states are to be licensed by Reserve Bank. Minimum requirements with regard to capital and reserve are laid down by the Act. The Act prohibits banking companies from engaging directly or indirectly in trading activites, interlocking directorate. After two years of the commencing of the Act, at least 20 per cent of the total liabilites of a bank are to be kept in gold, cash or unencumbered Government securities, and also to keep in Provinces and Acceding states assets representing at least 5 per cent of their time and demand liabilities. By another clause, it is provided that paid up capital shall not be less than one half of subscribed capital. Provision for inspection of bank's accounts by Reserve Bank under certain conditions is also made. The reserve Bank has now the power on dermanent statutory basis to control the entire joint stock banking in India.

The recent development in Banking legislation is the Banking companies ( Amendment ) Act, 1950. It was passed on 1[illegible]th March 1950. The provisions of the Act are applicable to whole of India except Jammu and Kashmir.

The Act empowers the Reserve Bank to control the opening of branches in India as well as outside India. The Act lays down procedure for amalgamation of banking companies. Summary trial is provided for those who have committed any offence in promoting or forming a company which now wound up provided the offence is punishable under the Indian Companies Act of 1913. Special provisions have been made for speedy winding up of companies going into liquidation. So also, where the Court has directed the official liquidator to take

advice of Reserve Bank, the Reserve bank has the power to inspect any records that it may think necessary and give any advice it deems fit.

In spite of the considerable increase of banking offices, the contention holds that banking facilities still remain inadequate considering the size of the country.

Besides Joint-stock banking of the ordi-nary kind may not always be found to b suitable for Indian conditions. Oth more suitable models which might b tried are furnished by the popular co-op-rative in Germany and Italy. It is no for the Reserve Bank of India wisely guide banking progress in this country.

-- *Your De-Luxe Shopping Resort* --

EVERY EVENING

MEHTA & CO.

**Navi Peth, JALGAON E. K.**

★ Toilet,

★ Stationery,

Etc. Etc.

INTERCOLLEGIATE SPORTS



**Hututu Finalists**
(Jalgaon-Nagar)



**Ladies Hututu** (Our Team in action)



**Our Hockey Team**



**On your mark....!**



**Shot-put**

[Photographs : M/s K. D. Vaishnav & R. B. Badchape]

# OUR ROLL OF HONOUR

## I. Sc. First Classes



G. V. Shivram



C. M. Koranne



S. T. Teli



B. H. Phalak



# GYMKHANA.

( Report read by the Chairman at the time of the Prize-Distribution Ceremony of the Gymkhana. )

This year we started our Gymkhana activities rather late as the elections were delayed due to some unforeseen circumstances. The elections were over in the usual hectic atmosphere and keen interest was taken in contesting various posts as the Inter collegiate sports were to be conducted this year on behalf of our college.

The following members formed the Gymkhana Managing Committee.

1. Principal Y. S. Mahajan ( President )
2. Prof. P. S. Bhonsale ( Chairman )
3. Mr, S. R. Wadekar ( Staff Representative )
4. Prof. M. N. Advant ( Prof-In-charge of Magazine and Reading Room )
5. Prof. M. M. Kelkar ( Prof. in-charge of Debating Union )
6. Mr. G. V. Patil ( General Secretary )
7. Miss K. V. Gupte ( Ladies Representative )
8. Mr. R. K. Desai ( Cricket Secretary )
9. Mr. Bharambe ( Foot-ball Secretary )
10. Mr. F. A. Fanibanda ( Minor Games Secretary )
11. Mr. V. M. Thakar ( Indian Games Secretary )
12. Mr. R. V. Vaidya ( Reading Room & Magazine Secretary )
13. Mr. Jagtap ( Debating Secretary )

Later on, as Miss Gupte left the College, Miss S. V. Kolhatkar was nominated to act as Ladies Representative.

Our difficulties regarding the play grounds handicapped us a lot. This along with rains made it impossible to start the Gymkhana activities early. Even then, students managed to get little practice on Police Grounds. This resulted into rush for Table-tennis. Of late, students have taken much interest in this indoor game and it has attained immense popularity. Our Lady students also have taken fancy for it; and in near future we hope they will reach a good standard.

As the Inter-collegiate Sports were to take place in the first week of December, we had Annual Sports by the end of the first term. A good response was given and record number of entries w re received for various items. Results of these sports will be known when the prizes will be distributed in a few minutes but we would like to make special mention of Miss Patki who won the triple crown in Table Tennis and that of Miss Savant S. V. who swept every thing before her in Athletics. Miss Savant holds a bright future if properly trained.

With the beginning of the 2nd term, books were set aside and every one seemed to be in the grip of Inter Collegiate Sports fever. This was the first time that these were being staged at Jalgaon and as such

aroused tremendous interest. Final selections of the teams were made and all players tried their best to be fit for the sports. Our Foot-ball team was sent to Nagpur on a tour to get sufficient match practice. Although they did not win a match, our players gave creditable performances against topnotchers of Nagpur.

The Inter Collegiate Sports commenced on 3rd December and we had an auspicious start by a victory in Ladies Hu-tu-tu event against Amalner College. Our team very ably led by Miss Nalini Paradkar made the rivals appear ridiculous. Ultimately our ladies, won the championship by defeating Nagar College. Miss Paradkar, supported by Miss Chaudhari and Miss Savant carried our side on her shoulders. We thank the authorities of Bal Krida Mandal for training our team. Our Gents Hu-tu-tu team also won the championship, for which Mr. Marwadi, our skipper and his players deserve a lot of credit.

Our greatest victory in the Inter Collegiate Sports came when we snatched the Foot-ball Championship from Amalner College. It was a poetic Justice that after the defeat incurred on us last year by Amalner College, we won this Championship this year. It was a great final and a grand penalty kick in the last minute by Mr. Chandgude, our Captain, brought home victory. Our team played with excellant team work and the whole team deserves our congratulations.

In Hockey we were unlucky to lose the final against Nasik College In Mr. Kane, we had a fine Secretary for this department and under his inspiring leadership, with solid supports of M/s Rasse & D'Mello, our hockey team gave fine exhibition against Nagar College in the first match. We hope that our boys w try their best to get this champions next year.

For the first time in the history our College, we won Table-tennis sing and doubles in Gents events. C Champion Mr Thakar along with M V. K. Shaha & R. V. Sharma brou us these victories. Mr. Kulin Desai combination with Miss Kolhatk managed to win the mixed doubles th in Badminton. All these victories in earlier stage of the Sports flattered leading every one to expect our colleg win the General Championship. But the days passed on and the Athle started, it was quite clear that Ahme nagar College had a firm grip over championships; and finally they w to Nager College for which we cong tulate them heartily. Unless our La reach a good standard in Table-ten Badminton and similar games, it impossible to secure the Gen Championship. This year we have a fine batch of sportswomen in F. Y. students, If they mean to do it, it not be difficult for them to at mastery in the above games. We that they will take the lead and se example for others.

M\s D'Mello, Thakar, Desai, Anvikar were selected to represen North Zone in Inter Group Tourna We congratulate them for selection.

Our Cricket team has participat the Scouts Shield Tournament. We have won the first round again Police Eleven and we hope that our will give a good account unde leadership of Mr. R. V. Sharma,



I will remember this day in my life for ever. For to-day I have personally met the idol of millions. I remember to have watched him playing against the Jardine's team at Bombay. I, a kid then, sat under scorching Sun just near the boundary line in front of the tents, watching C. K. batting. In that match a new star appeared on the horizon of Indian Cricket–that was no one else but Amarnath. Still C. K. was there as glorious as ever. I never imagined then to meet him personally. But it has happened.

Lasty, a few words about our Guest this evening. Our Annual Sports were over by the end of the lst Term and we requested Lt. Col. C. K. Naidu to come as Guest for Prize Distribution Ceromony. He very promptly responded to our request; but as he was busy with M. C. C. tour, he could not come earlier than this day. Amidst his multifarious activities, he has spared a day for us and we are much thankful to him. Actually, he played a match againstt M. C. C. at Nagpur and arrived here. At the age of 58, he was the top scorer in the first innigs at Nagpur and his sixers, as they are very rare these days, must have been a feast to the eyes of the spectators. Cricket lovers must have sadly noted these days that present batsmen generally have an eye on records and they go on piling huge scores. Gone are the days when the majestic figure of Lt. Col. C. K. Naidu would walk to the wickets amidst thunderous applause and would send the red bullet to meet the crowds over the boundry line in response to their request ! Indian cricket has become rather dull, tedious and timid these days; every one wishes that it should again be the same when great Ranji played it and after-wards great Naidu made it popular.

At ptesent, Lt. Col. Naidu is the Chief selecter of our Test teams and I am confident that under his able guidance Indian cricket will reach International standards.

We hope his visit to this place will create enthusiasm for sports among the students in particular and public in general. We find here a lot of indifference towards the sports. Reason for this may be that proper facilities are not given. But this is viscious circle. Somewhere it needs to be broken. We suggest that the students should break it by taking the lead. It is really a sad experience that young people, instead of bubbling with vigour and enthusiasm, should be found simply passive spectators. It is high time that they realise the joy of creation by actually playing a game rather than watching it,

Our guest is known all over the world as a great sportsman who plays the game in right spirit. He values sportsman spirit greatly and we wish that our students follow him on and off the field. Let the students remember that-to borrow from Shakespeare - " the quality of sportsman - spirit is not strained but falleth like gentle rain on the place beneath and is twice blessed in that it blesseth him that takes and blesseth him that gives. "

I conclude this report - reading by thanking all the student and members of the staff for giving their co-operation and making Gymkhana activities a success. - I also thank the D. S. P. and Local School Authorities for helping us every time through out the year. Once again I thank our Chief Guest for coming over here and also thank all of you who have graced this occasion by their presence. I request our Guest to distribute the prizes.

# Results of Annual Sports 1951--52

## Athletics-Gents

1. Broad jump—
   1 J. C. Hardmann
   2 R. V. Sharma
   3 N. T. Jagtap
2. Hopstep jump—
   1 R. V. Sharma
   2 A. E. Kane
   3 J. C. Hardmann
3. High jump—
   1 J. C. Hardmann
   2 N. T. Jagtap
   3 R. K. Desai
4. Shot-put—
   1 S. K. Rasse
   2 A. E. Kane
   3 P. K. Moghe
5. Discus throw—
   1 J. C. Hardmann
   2 P. K. Moghe
   3 R. V. Sharma
6. Javeline throw—
   1 S. K. Rasse
   2 R. V. Sharma
   3 A. E. Kane
7. 100 m. running—
   1 Anvikar
   2 J. C. Hardmann
   3 R. V. Sharma
8. 200 m. running—
   1 P. K. Moghe
   2 J. C. Hardmann
   3 R. V. Sharma
9. 400 m. running—
   1 R. V. Sharma
   2 B. H. Kulkarni
   3 A. E. Kane
10. 800 m. running—
   1 R. V. Sharma
   2 B. H. Kulkarni
   3 P. K. Moghe
11. 1600 m. running—
   1 B. H. Kulkarni
   2 R. V. Sharma

## Athletics- Ladies

1. 50 m. running—
   1 Miss Savant S. V.
   2 Miss Vad S R.
   3 Miss Kothari V, D.
2. 100 m. running—
   1 Miss Savant S. V.
   2 Miss Vad S. R,
   3 Miss Patki S. N.
3. 50 m. skipping—
   1 Miss Patki S. N.
   2 Miss Savant S. V.
   3 Miss Kothari V. D,
4. Throwing cricket bail—
   1 Miss Savant S. V.
   2 Miss Kothari V. D.
   3 Miss Chaudhari L. L.

## Table Tennis

1. Gents singles—
   Champion : Mr. Thakar V. M.
   Runner up : Mr. Sharma R. V.
2. Gents doubles—
   Champion : M/s V. K. Sharma and G. L. Acharya
   Runners up : M/s Thakar V. M. and Sharma R. V.
3. Mixed doubles—
   Champions : Mr. R. V. Sharma and Miss Patki S. N.
   Runners up : M/s. V. K. Shaha and Miss Savant S. V.



4. Ladies singles—
   Champion : Miss Patki S. N.
   Runner up : Miss Vyas U. C.
5. Ladies doubles—
   Champions : Miss Patki S. N. and Miss Kulkarni I. S.
   Runners up : Miss Patil P. N. and Miss Chaudhari L. L.
6. Luckey doubles—
   Champions : M/s V. M. Thakar and P. G. Nemade
   Runners up : M/s S. K. Rasse and Chandorkar

## Badminton

1. Gents singles—
   Champion : Mr. K. M. Desai
   Runner up : Mr. Vishwas K. Patil
2. Gents doubles—
   Champion : M/s Vishwas K. Patil and S. K. Rasse
   Runners up : K. M. Desai and V. K. Shaha
3. Mixed doubles
   Champions : Mr. K. M. Desai and Miss Athavale S. D.
   Runners up : Mr. Vasant K. Patil and Miss Savant S. V.
4. Ladies singles—
   Champion : Miss Koranne S. G.
   Runner up : Miss Vyas U. C.
5. Ladies doubles—
   Champions : Miss Savant S. V. and Miss Kulkarni I. S.
   Runners up : Miss Gandhe V. V. and Miss Koranne S. G.

## Carrom

1. Gents singles—
   Champion : Mr. Oswal D. L.
   Runner up : Mr. Tamhane M. D.
2. Gents doubles—
   Champions : M/s Oswal D. L. and Surve S. S
   Runners up : M/s Sharma R. S and Vasant K. Patil
3. Mixed doubles—
   Champions : Mr. Oswal D, L. and Miss Kulkarni I. S.
   Runners up : Mr Acharya G. L. and Miss Savant S. V.
4. Ladies singles—
   Champion : Miss Pradhan S. B.
   Runner up : Miss Kulkarni I. S.
5. Ladies doubles—
   Champions : Miss Kulkarni I. S and Miss Pawar V. S.
   Runners up : Miss Patki S. N, and Miss Pawar K. N.

1. General Chamipon in Gents' Athletics events—

   Mr. R. V. Sharma

2. General Champion in Ladies' Athletics event—

   Miss Savant S. V.

3. General Champion in Gents' Non-Athletic events—

   equally divided between M/s R. V. Sharma,. K. M. Desai & D. L. Oswal

4. General Champion in Ladies Non-Athletic events—

   Miss Kulkarni I. S.

## STAFF TOURNAMENTS

Bridge—
   Champions : Prof. M. M. Thatte & Prof. G. N. Pandit
   Runners up : Prof. D. W. Joshi & Prof. S. R. Wadekar

Chess--

Championship equally divided between Prof. M. M. Thatte, Prof. A. G. Chiplunkar & Mr. Atvindakshan

## Table Tennis

1. Gents singles—
   Champion : Prof. P. S. Bhonsle
   Runner up : Mr. G. N. Pandit
2. Gents doubles—
   Champions : Prof. P. S Bhonsle & Prof. B. V. Joglekar
   Runners up : Prof. M. D. Nadkarni & Mr. S R. Wadekar
3. Handicap singles—
   Champion : Mr. S. R. Wadekar
   Runner up: Prof P. S. Bhonsle
4. Luckey doubles—
   Champsons : Prof. M. M. Kalkar and Mr. S. R. Wadekar
   Runner up : Prof. S. V. Sirdesai & Mr. G. H. Pandit

General Champion in staff tournaments

Mr. S. R. Wadekar

## Trophies & Shields

1. Shrimati Indirabai Savant Trophy for Ladies singles champion
   Miss Koranne
2. Shri Deosing Patil Badminton Trophy for Gents singles champion
   Mr. K M. Desai
3. Shield for Gen. Champion in Gents Athletics ( Khandesh Sports )—
   R. V. Sharma
4. Shield for Gen. Champion in Ladies Athletics ( Donated by Shri Gadgil)
   Miss S. V. Savant

---

A College foot-ball star, who had failed an examination, was disqualified just before the big game. There was great weeping and wailing and gnashing of teeth, and the distressed president of the school came to the professor who had given the fatal grade. "This is terrible !" he said, "We can't win the game without him."

"But I had to give him zero," said the teacher. "You see, he cheated."

"Cheated ! Did you see him ?"

"No, I didn't."

"Does he admit it ?"

"No, he denies it," said the teacher, "But he - a poor student - sat next to the best student, and their answers were almost identical."

"Do you think that proves cheating ?"

"In this case I do. The good student replied to the last question, 'I don't know the answer.' And the foot-ball star wrote, 'I don't know the answer either.'"

✠ ✠ ✠

Brown : "She is a smart girl - brainy enough for two."

Jones : "Then she's just the right girl for you."

✠ ✠ ✠

Flattery is like cologn water to be smelt and not to be swallowed.

✻ ✻ ✻

One drunkard to another : "What we see here, is it a Moon or the Sun ?"

Second drunkard : "I do not know. I do not belong to this place."

✠ ✠ ✠

The teacher was explaining to the class that they should always try to give happiness to others. Taking out a little girl in front, she asked, "What have you done in the last few days, to give joy to anybody around you ?"

"Well," said the little girl, "I spent Sunday afternoon with my Aunt, and when I left, she was delighted."



# MERRY MOMENTS.

The mistress of the house gave her new maid a cheque at the end of the first month. She went to the bank and very nervously put the cheque on the counter. "You must endorse it", said the cashier. "Endorse it ?" repeated the maid "How do you do that ?" "Sign it as you would a letter." She very slowly wrote on the back, "Your darling Polly."

✻ ✻ ✻

The boy's case was that his arm was so badly injured in a railway accident that he could no longer lift it above his head. The lawyer for the railway company was cross-examining him in court, "Now, my boy, your arm was hurt in the accident."

"Yes, sir," said the boy.

"And you cannot lift your arm high now ?"

"No, sir."

"Would you mind," said the lawyer very gently, "just showing the jury once more how high you can raise your arm since the accident ?"

The boy lifted it with an apparent effort just to the shoulder level.

"And how high could you lift it before the accident ?" asked the lawyer, in his most innocent manner, and up went the arm straight over the boy's head !

✻ ✻ ✻

A king's jester punned incessantly until the king, in desperation, condemned him to be hanged. However, when the executioners had taken the jester to the gallows, the king thinking that after all a good jester was not easy to find, relented and sent a messenger post haste with a royal pardon.

Arriving at the gallows just in time, where the jester stood with a rope already about his neck, the messenger read the king's decree, to the effect that the jester would be pardoned if he would promise never to make any pun. The jester could not resist the temptation of the opportunity, however, for he cackled out, "No noose is good news." And they hanged him.

✻ ✻ ✻

An English university professor was waiting in the bitter cold for a train to London when the non-stop Cornish express astonishingly stopped at the station. The professor promptly got on board. He had one foot in the carriage when a railway official called out: "You can't get on here, Sir., The train does not stop." "That's all right," said the professor. "If it doesn't stop, then I'm not on it."

✻ ✻ ✻

Arriving late for a holiday dinner, a guest found a seat reserved for him near the head of the table, where a goose was being carved. "Ah," he commented, "So I'm to sit by the goose." But noticing the lady seated on his left, he hastened to make amends. "I mean," he smiled at her apologetically, "the roasted one, of course."

✻ ✻ ✻

Jones : Good evening, old man. Thought I'd drop in and see you about the umbrella you borrowed from me last week.

Brown : I am sorry, but I lent it to a friend of mine. Were you wanting it ?

Jones : Well, not for myself, but the fellow I borrowed it from says, the owner wants it.

# DEGREE EXAMINATION RESULTS 1951.
## UNIVERSITY OF POONA

### B. A. (Hons)

**2nd Class**

1. Mr. Bhangale Asaram Namdeo
2. „ Pawar Indrarao Shankarrao

**Pass Class**

1. Mr. Kulkarni Vishnu Vaman
2. „ Bakshi Raghunath Vaman
3. „ Palshikar Mahadeo Balwant
4. Miss Karnik Pushpamala Moreshwar
5. Mr. Koshti Pandharinath Gop
6. „ Nemade Murlidhar Nam
7. „ Shivrame Laxman Deoch
8. „ Mahajan Dattatray Pand
9. „ Phalak Ganpat Bhavdu
10. „ Talele Vasant Mansaram
11. „ Mahajan Popat Bhaskar
12. „ Rane Vinayak Govind

### B. Sc.

**2nd Class**

150 Chaudhari Baburao Sadashiv
166 Dhake Ramdas Dhula
170 Dugad Bhaichand Fulchand
174 Gajare Pralhad Shrawan
193 Miss Joglekar Yamu Hari
198 Joshi Shrikrishna Mahadeo
235 Moghe Damodar Shridhar
236 Moghe Gopal Shridhar
239 Naik Vishnu Sadashiv
242 Nemade Pandurang Girdhar
257 Patil Bhaskarrao Dhondaji
260 Patil Prabhakar Ganpat
312 Bakshi Dhruva Vamanrao
363 Kulkarni Jayant Shriram
371 Mahajan Damodar Kashiram
384 Nehete Namdeo Popat
389 Patil Chhabildas Hema
401 Rane Ghanshyam Kashiram
402 Raut Prabhakar Sadashivrao
407 Sarode Sudhakar Namdeo
700 Kolhe Hari Sitaram
703 Chaudhari Kashinath Nagesh
706 Mahajan Pandit Tukaram
708 Wani Rajaram Motiram
325 Chaugule Prabhakar Vinayak

**Pass Class**

139 Bhargav Prabhakar Shankar
146 Chaudhari Gopal Ramoo
147 Chaudhari Narayan Soma
172 Firke Kashiram Nimba
237 Moghe Vishnu Keshav
262 Patil Tukaram Chavdas
270 Rane Madhukar Sitaram
283 Shaikh Gulamhusain Sulaiman
292 Talele Gopal Hiraman
302 Wani Eknath Totaraw
372 Mahajan Govind Hiraman
391 Patil Vasant Ramdas
394 Miss Pendharkar Nalini Dattatr
701 Narkhede Chhagan Vithal
702 Bhortake Vidyadhar Mitharam
704 Chitte Purushottam Waman
709 Dixit Madhav Dattatraya

## University of Bombay
### B. A. ( Special )

**Pass Class**

1. Mr. Walvekar Vasant Madh

# INTERCOLLEGIATE WINNERS
## UNIVERSITY OF POONA
(North Group)



Our Ladies' Hututu Team



Our Gents' Hututu Team

INTERCOLLEGIATE WINNERS

UNIVERSITY OF POONA
(North Group)



Our Football Team



Athletics & Others



# अजिंठा

## मराठी विभाग

वर्ष ६ वें ) १९५२ ( अंक ६ वा

### माझी मराठी

जैसी हरळांमाजी रत्नकिळा । कीं रत्नामाजी हिरा निळा ।
तैसी भासांमाजी चोखाळा । भासा मराठी ॥
जैसी पुष्पांमाजी पुष्प मोगरी । कीं परिमळांमाजी कस्तुरी ।
तैसी भासांमाजी साजिरी । मराठिया ।
पखियांमध्यें मयोरु । रूखियांमध्यें कल्पतरू ।
भासांमध्यें मानु थोरू । मराठियेसी ॥
तारांमध्यें बारा रासी । सप्तवारांमध्यें रविससी ।
यां दिपिचेआं भासांमध्यें तैसी । मराठिया ॥

— फादर स्टीफन्स

# किति सुंदर पूर्णिमा !....

ढगांत लपलें बिंब शशीचें
कुठली मग पूर्णिमा !
उदास छाया वदनिं तुझ्या या
कुठला मग चंद्रमा ।

दुसरी रमणी हसली खुलली
माझ्या संगें मधुर बोलली
मत्सर-ज्वाला हृदयिं भडकली

धूमपटल कां त्वरित मुखावरि
पसरी घननीलिमा ?

खूप भांडलों आज सकाळीं
शद्वांची मुळिं वाण न पडली
गडगडाट अन् वृष्टिहि झाली

अजुनि कलुषता मनीं राहिली
काय तिचा कालिमा ?

देशावरल्या ओढ्यासम मन
क्षणांत कलहें खळखळतें पण
ओसरतें झणि, का मग चिंतन ?

रमणी ना ती ? माझि मावशी !
बघ हसला चंद्रमा
मेघ पळाले, विश्व उजळलें
किति सुंदर पूर्णिमा !

—ग. ह. तारळेकर.



# जीवनानंद ( लघुकथा )

ले.– म. पु. वर्तक.
कलाविभाग – प्रथमवर्ष.

ओढून ताणून बळेंच आणलेलं उत्साहाचं वारं झरझर ओसरून गेलं. कॉलेजजीवनांत बाळगलेलं जीवनाविषयींच्या आशांचं धुकं पार मावळून गेलं. जीवनाविषयींच्या आशाआकांक्षांची हिरवी पालवी पिवळी होऊन गळूं लागली अनू हवा निघून गेलेल्या नू फुग्याप्रमाणे मरगळलेल्या मनाने वामनराव स्टेशनच्या दादरच्या पायऱ्या उतरूं लागले. एकएक पाय खाली टाकत, जीवनांतील सुखांना लाथाडत, आशाआकांक्षांचा चक्काचूर करीत, मनोरथांचा कपाळमोक्ष करत !

पुन्हा त्याच विषण्ण मनाने वामनराव चालूं लागले. गर्दीत मिसळले. सारी ऑफिसं, शाळा सुटल्या होत्या. सकाळीं चारा शोधायला गेलेलीं पाखरं घरट्याकडे परत फिरावीत तसल्या ओढीनं माणसं घराकडे परत होतीं. कारकून, मजूर, नौकर हमाल, विद्यार्थी, विद्यार्थिनीं ! एक न् दोन ! सर्वांना सारखीच घाई होती, सर्वांना सारखीच ओढ होती. हो ! ओढ ! घराकडे जायचं ! दिवसभरच्या कामानं शिणून गेलेलं हें शरीर जेथ विसावतां येईल अशा चार भिंतींच्या घराकडे जाण्याची सर्वांची घाई चालली होती. ही ओढ वामनराव आज सात वर्षें समजूं शकत नव्हते. एवढ्या ओढीने ही माणसं जातात तरी कुठे ? घराकडे ? काय आहे घरीं ? घर आहे का यांना ? कां आपल्यासारखंच भग्न मनो--रथांच्या पायावर उभारलेलं एकादं पडकं मंदीर--

वामनराव तसेच तुटकपणें पुढे सटकले. जवळच्या हॉटेलांतील गाण्याच्या कर्णमधुर रेकार्डस ! कपबशांचा खणखणाट ! ‘ एक चाय ! दो मिसळ ! एक रुपिया चार आना ! ’ पैसे मोजण्याचा आवाज, चकचकणाऱ्या पेल्यांतून उसळणारीं फसफसणारीं पेयं! विनोदांचे इमले, हास्याचे फवारे अन् हे सारं ऐकून वामनरावांच्या तोंडून निघणारे सुसकारे !

इंद्रपुरीलाही लाजवील अशा वैभवांत दिमाखाने तळपणारी मुंबापुरी मागे टाकून वामनराव आता चौपाटी कडे आले होते. जवळून एक कॉलेजविद्यार्थीविद्या-र्थींनींचा तांडा गेला अन् कसला तरी मादक सुगंध वाऱ्याबरोबर आला. पण उमलणाऱ्या फुलांच्या सुगंधानं आकांक्षांनीं फुलणाऱ्या हृदयांना आनंद होतो. जळत्या हृदयाचा मनुष्य—

फुलांचं रसग्रहण अग्नी कसा करूं शकेल ? त्या साठी एकादा भ्रमरच--

वामनरावांना वाटलं सात वर्षांपूर्वी आपणही असेच एका कॉलेज विद्यार्थी विद्यार्थीनींच्या तांड्यांत सामील होतों. सात वर्षांपूर्वी आपलं हृदयही अशाच आशांनी फुललेलं होतं ! पण आज--

आकाशांत उंच उडणाऱ्या पतंगाची दोरी तुटावी अन् वाऱ्याबरोबर असंबद्ध हेलकावे खात तो आकाशांत गरगरावा तसं भूतकाळाच्या तावडींत सापडून त्यांचं मन असंबद्ध हेलकावे खात होतं.

चौपाटीवर ते आले आणि एका ठिकाणीं येऊन बसले.

सारी चौपाटी माणसांनी फुलून गेली होती. प्रत्ये-काच्या चेहऱ्यावर एकच भाव ओसंडत होता. आनंद ! ओढ ! आसक्ती ! जीवनाविषयीची विलक्षण आतुरता ! दिवसभरच्या कामांत शिणलेले हमाल ! हास्यविनोद करणारे कॉलेजकुमार ! तारुण्यानं मुसमुसलेल्या युवती ! एकांतांत गोष्टी करण्यासाठी आलेलीं प्रेमी युगुलं ! ह्या साऱ्यांच्या आनंदांत भर घालणारं तें रम्य वातावरण ! जीवनाविषयींच्या नव्या आशांचा संदेश देत पुढे येणारा समुद्र ! वामनरावांना आपल्या एकटेपणाची अधिकच

तीव्रतेने जाणीव झाली. क्षणमात्र त्यांनी डोळे मिटले अन् आतापर्यंत वर्तमानकाळ आणि भूतकाळ ह्यांच्या मध्यावर ताटकळणारं अन् भूतकाळांत डोकावण्यासाठी आसुसलेलं त्यांचं मन पूर्णपणें भूतकाळांत डुंबूं लागलं।

सात वर्षांपूर्वी ते फर्ग्युसन कॉलेजांत इंटर आर्ट्सच्या वर्गांत होते. त्यावेळचें तें जीवन। तें कॉलेजांतील वातावरण। सायकलवरच्या त्या सहली। प्रोफेसरांचीं तीं व्याख्यानं। कॉलेजांतलें तें गॅदरिंग। तीं नाटकं अन् आपल्याबरोबर काम केलेली ती उषा सप्रे। केवळ्याने दचकले ते। हो। उषा सप्रे।

कॉलेजांतल्या नाटकांत उषा सप्रे नायिकेचें काम करणार आहे हें कळल्यावर—

इतर वस्तूप्रमाणे नायकही रेडीमेड मिळूं शकत त ह्याचा अनुभव प्रोफेसरांना आला होता। तिच्या बरोबर काम करण्यासाठी नायकांची उडालेली ती झुंबड—

त्यावेळीं ह्याच पठ्ठयाने तो मान पटकविला होता. आपलं नांव नायक म्हणून ज्या दिवशीं जाहीर झालं त्यावेळीं उषा सप्रेने ज्या दृष्टीने आपल्याकडे पाहिले ती दृष्टि—

कालिदासाच्या नाटकांतल्या एकाद्या नायकाभोंवतीं नसतील इतक्या नायिका आपल्या भोंवती गुंजारव करीत होत्या. किती तरी आशाआकांक्षांनीं आपलं हृदय त्यावेळीं फुलून निघत होतं. आपण खूप शिकूं, मोठे वकील होऊं, बंगला बांधूं अन् मग एकाद्या गोड नायिकेला जवळ घेऊन नवरा राजा आणि नवरी राणी – पण—

मनुष्याने उभारलेल्या आशांचे इमले पाडून टाकण्यांत दैवाला मोठी मजा वाटत असते. त्याच वर्षी आपले वडील वारले आणि कुटुंबांतला सर्वांत मोठा मुलगा ह्या दृष्टीने कुटुंबपोषणाची सारी जबाबदारी आपल्यावर पडली आणि मग—

सारे आशांचे इमले दूर लोटून एका कचेरीची वाट आपल्याला धरावी लागली. कारकून। कारकून। कधीही न सुटणारा हा उपसर्ग आपल्यामागे लागला आणि—

कमळांत जोंपर्यन्त मध असतो तोपर्यंत त्या भोंवतीं गुंजारव करतात. एकदा तो मध गेला म्हणजे— मोहक वातावरणावर खूप सार्‍या नायिका सूर्योदयाबरोबर चंद्रकमळं लुप्त त्याप्रमाणे लुप्त झाल्या होत्या. आपल्या गोड स्वप्न केव्हांच संपलं होतं. स्वप्न! ते उठले। ते जागे झाले! त्यांना वत्सला आठवली. वर्षांपूर्वीच वत्सलेशीं त्यांचा विवाह झाला. खोली आणि ५५+३५ एवढ्या पगारांत जाणारा तो संसार। ५५+३५। त्यांना विलक्षण आली. धावत जावं आणि ५५+३५ पगार त्या साहेबाचा गळा दाबावा असं त्यांना वाटलं! दुःख! आपल्या या ५५+३५ च्या जीवनांत आनंद निर्माण होणार आहे?

खरर्! करर्! कसल्या तरी विचित्र वामनराव भानावर आले. त्रस्त मुद्रेनं त्यांनी पाहिलं।

डोकं दुखत असलेल्या मनुष्याच्या गुलाब पाण्याचा शिडकाव व्हावा तसं त्यांना वाट

समोर पांचदहा हातांवर एक फुगे विकणारा होता. निळे, पिवळे, हिरवे, नकशी काढलेले, फुगे त्याजवळ होते अन् तो वाजवून दाखवत खर्र्! खर्र्! ' कोई बी उठाव। एक पैसा!' त्याजजवळ एक भिकारीण उभी होती. मुलगा तिच्या कडेवर होता. मूर्तिमंत दारिद्र्याचं प्रतिनिधी। एका फाटक्या सदर्‍याशिवाय त्या अंगावर कुठलेंही वस्त्र नव्हतें. आणि तीं कधीहि न विंचरलेले केस, लज्जारक्षणाच्या निरुपयोगी ठरूं पाहणारं फाटकं लुगडं, उभ्या पाण्याचा स्पर्श न झालेली तिचीं वस्त्रं, धुळीनं झालेलीं त्यांचीं तीं तोंडं। पण तरीहि त्यांच्या आनंद होता. भीक मागून आणलेल्या त्या पैशांतून मुलाला एक फुगा विकत घेतला होता.

वामनरावांनी पाहिलं. तीं दोघंजण समुद्राकडे ती भिकारीण समुद्राच्या लाटांकडे बोट दाखवत



मुलाला खेळवीत होती, रिझवीत होती, फुगा वाजवून दाखवीत होती अन् तो मुलगाही समुद्राकडे बोट दाखवीत बोबडं बोलत होता. सार्‍या जगानं उपेक्षा केलेल्या आणि भिकेच्या कमाईवर जगणार्‍या मायलेकरांचं तें प्रेम—

वामनराव ताडकन् उठले. जीवनांत करीत असलेल्या चुकीची त्यांना प्रथमच जाणीव झाली. ही भिकारीणही आपल्या मुलाला रिझविते आणि आपण—

वसंत आणि सुधा! त्यांना आपल्या मुलांची आठवण झाली. शाळेंत चांगला अभ्यास करून शाबासकी मिळवणारा वसंत आणि घरीं जातांच आपल्यास गोड पाप्यांची खंडणी आनंदाने देणारी सुधा! जगाने लाथाडलेली ती भिकारीण! पण तरीही तिला आनंद वाटत आहे. तिच्या हृदयांतील वात्सल्यांतूनच तिच्या आनंदाचा जन्म झाला आहे. त्या भिकारणीला जें कळूं शकलं तें आपल्यासारख्या सुशिक्षित माणसाला—

आनंद! आपलीं मुलं हाच आपल्या जीवनांतला आनंद नाही का? आणि आपल्या जीवनांतली ही सुधा लाथाडून आपण वेड्यासारखे मृगजळामागे धांवत होतों. आणि मुळींच कुरकुर न करतां यशस्वीपणें संसाराचा गाडा हांकणारी आपली पत्नी वत्सला. तिला आपण कितीसं सुख दिलं? आपल्या जवळून वहाणारा आनंदाचा हा झरा—

वामनराव ताडकन् उठले आणि घराकडे निघाले. समुद्रावर गर्दी होती. चौपाटी माणसांनी फुलली होती. रेकॉर्ड्स् वाजत होत्या. तिकडे त्यांचें लक्ष नव्हतें. ५५+३५ पगार देणारा साहेब त्यांच्या खिजगणतींत नव्हता. कॉलेजांतल्या स्मृती त्यांना अडवूं शकत नव्हत्या. उषा सप्रे म मिळाली तरी त्यांची त्यांना आतां खंत वाटणार नव्हती. त्यांना आता एकच पाहिजे होतं। एकच ओढ होती. आपल्या जीवनांतल्या आनंदाचा रसास्वाद घेण्यास ते निघाले होते. वत्सला, वसंत आणि सुधा ह्यांच्याशिवाय सारं जग त्यांना आतां शून्यवत् होतं.

ते घराकडे निघाले. दारांत वत्सला वाट पहात उभी होती. आयुष्यांत अगदी पहिल्यांदाच लांबून तिच्याकडे पाहून त्यांनी स्मित केलं. आल्याबरोबर सुधाचा पापा घेतला आणि कोट काढीत ते म्हणाले "उठा! लवकर आटपा! आज आपल्याला सिनेमाला जायचंय बरं!"

हा आनंद कुठून आला हें वत्सलेला कांहीच कळेना. ती वेड्यासारखी त्यांच्याकडे पहातच राहिली.

बाहेर मुंबापुरींतील धांवपळ, गडबड, धांदल सुरू होती. रहदारी चालू होती. खणखणाट चालू होता दूर लांबवरच्या एका बंगल्यांतून रेकॉर्ड ऐकूं येत होती.

'ओ जानेवाले हंसते हंसते जीना ऽऽ'

सात वर्षांनंतरच प्रथमच वामनरावांनी त्या गाण्याचं रसग्रहण केलं।

---

★ आपल्या झेंड्याच मधला भाग पांढरा आहे. त्याचा काय अर्थ? पांढरा रंग प्रकाशाचा, साधेपणाचा निदर्शक आहे. आणि वरील अशोकाचें तें चक्र काय सांगतें? तें सद्गुणाची, धर्माची खूण आहे. या झेंड्याखालीं काम करतांना आपण धर्ममय राहूं, सत्यमय राहूं असा याचा अर्थ आहे. आपल्या वर्तनाचीं हीं सूत्रें असूं देत. आज आपणाला सर्व बाजूंनी आव्हान आहे. धैर्याने तें आव्हान आपण स्वीकारले पाहिजे नाही तर आपण मागे राहूं. या चक्राचा आणखी अर्थ आहे. चक्र म्हणजे गति. हें चक्र सांगतें कीं गतिमान राहा. डबक्यांत बसून राहूं नका. केशरी रंग त्यागाचा व नम्रतेचा निदर्शक आहे. आणि हिरवा रंग म्हणजे हरित श्यामल भूमातेचा. या ध्वजांखाली उभे राहून सेवानिवृत्तीने व निरंहकापणाने आपण पृथ्वीवर स्वर्ग निर्मू या.

—डॉ. राधाकृष्णन्

# नको असलेल्या भेटी

## ( लघुनिबंध )

लेखकः— वि. ह. नेमाडे, प्रथम वर्ष कलाविभाग

आपण बरोबर साडे अकराला कॉलेजमधे पोहोचूं अशा विचाराने मी सव्वा अकरालाच सायकलीवर स्वार होत असे. परंतु फारच थोड्या वेळां मी कॉलेजला साडे अकराला पोहोंचलों असेन अन् बहुतेक वेळां माझा पहिला तास बुडाल्याचेंच माझ्या जास्त स्मरणांत आहे. याला कारण तुम्ही माझ्या सायकलीला दोषी ठरवाल ! परंतु माझी सायकल जरी उत्तम नसली तरी दोष देण्याच्या लायकीची पण नाही ! "मग कां हो तुमचा पहिला तास बुडतो ?" असें तुम्हीं ओघानेच विचारणार ! त्याला कारण सायकलीला मधे लागणारीं स्टेशनें ! अहो आगगाडीला ठराविकच स्टेशनें लागतात. स्टेशनाशिवाय ती थांबणार नाहीं. पण माझ्या साय-कलीला तर स्टेशन चुकतच नाही, परन्तु नको असलेलें स्टेशन सुद्धा घ्यावें लागतें ! अशा तऱ्हेने रोज नवीन नवीन स्टेशनें माझ्या रस्त्यांत तयार होत असतात ! मग कां नाही होणार मला उशीर ? अहो थांबायची तयारी असते कुणाची ? पण मारून मुटकून आपले थांबावेच लागतें ! न थांबले तर उगीचच त्या व्यक्तीचा रोष अन् दोनचार शेलकी विशेषणें ऐकूनच घ्या कशाला? इकडे तास बुडूं नये म्हणून धडपड अन् तिकडे 'रोष'. शेवटीं तास बुडाला तर परवडला पण हा रोष नको असें नक्की करून थोडें त्या गृहस्थाशी मला बोलावेंच लागे. कॉलेजची वेळ झाली आहे, मला वेळ नाही असं दर्शविण्याकरिता मी मुद्दाम 'पाहुण्या' चें लक्ष घड्याळाकडे वेधीत असें. पण एका 'भेटकऱ्या' ने मला साफ शब्दांत सांगितले, "अहो मला माहीत आहे तुम्हाला कॉलेजला जायचें तें ! उगीच कॉलेजचे तास बुडून होणारें नुकसान तुम्ही मला सांगूं नका. नाही तरी कॉलेजचे विद्यार्थी किती 'रेग्युलर' असतात हें आम्हाला ठाऊकच आहे म्हणा !" कॉलेजच्या विद्या-र्थ्यांचे गुण त्यांनी आणखी उघळूं नयेत म्हणून मला त्यांच्याशीं अर्थातच भेटावे नि बोलावे लागत असे.

नको असलेल्या भेटीची खरी खुमारी तेव्हां येते जेव्हा त्या भेटीमधून कांही काम आपल्या ... लट येतें. माझ्या गांवचे गृहस्थ मला एके दि... अचानक भेटले असें म्हणण्यापेक्षां त्यांनीं मुद्दामच ... हटकलें, 'अहो मि × × ×' तुम्हीं आमच्या गांव... असून एका छोट्याश्या कामाकरिता मला एवढा ... व्हावा ? ते अमुक अमुक बंदुक लायसन्स क्लार्क तुम... अगदीं परिचयाचे आहेत. तेव्हा ......" श्रीमानांना ... बंदुकीचा परवाना हवा आहे व तोहि माझ्यामार्फत, ... मतितार्थ मी तावडतोब ओळखूं शकलों व त्याला ... लावावें म्हणून "बरं बघतों" असं मला नाईलाजा... म्हणावें लागलें.

दुसऱ्या दिवशीं अगदींच सकाळीं स्वारी ... म्हणून माझ्या घरीं हजर ! भेटकरीहि किती मोक... भेट घेत असतात हा एक त्यांचा गुण मला ... कळला. शिष्टाचाराला धरून त्याला एक कप चहा ... प्राप्तच होतें. चहा वगैरे आटोपल्यावर मला नाईला... त्या क्लार्ककडे जाणें भाग पडलें. तिथं गेल्यावर ... साहेबांकडून अशी माहिती कळली कीं, सदर श्रीमं... परमिट दिलेलें आहे, पण त्यांनी बन्दूक अजून घे... नाही. म्हणून ती मुदत दोनदां पुढे ढकलली. मी ... विकत घेतों असं सदर श्रीमंतांचं म्हणणं आहे. ... आतांपर्यंत बन्दूक स्वस्तांत मिळाली नाही म्हणून ... न घेण्याचा व्यवहार त्यांनी साधला होता. व तिस... चान्स मिळावा म्हणून माझ्याकडूनहि एक ... ते श्रीमंत साधूं पहात होते. भाऊसाहेब मला ... "अहो, अशा महाजनकींमधे तुम्हीं कशाला पडता ... अशा तऱ्हेने उपदेशामृताचे घुटके व त्या नको अस... भेटीचे चटके सहन करीत मी क्लार्क साहेबांच्या ... निघालों.



'चटका' शब्दाचा मी उपयोग केला खरा; पण खरा चटका मला एका भेटीमुळें बसला. भर वेगांत मी मेन रोडने जात होतों. तेवढ्यांत "अहो मि × ××" अशी हांक मला ऐकूं आली. नेहमीचा प्रसंग म्हणून मला थांबणं भाग पडलें. थांबलों तसा तो गृहस्थ जवळ आला. अन् अगदी परिचित आवाजानं म्हणाला, "भाऊसाहेब, आपण विसरलां असाल पण मी तुम्हाला कसं विसरेन ? आपल्याच पुण्याईने दोन घास सुखाचे खात आहे माझी सेवा ——" गृहस्थ थोडासा परिचयाचा होता पण तो परिचय अगदीं कुचकामीं होता ! वाटलें कीं, आपलीच याला ओळखण्यांत चूक होत असावी. म्हणून मी त्याच्या मागोमाग हॉटेलमध्ये प्रवेश केला. प्रवेश करतांनाहि हॉटेलच्या मॅनेजरने मला नमस्कार केला. त्या भेटकऱ्याबरोबर आणखी दोनतीन गृहस्थ होते. चांगले ५ रुपयांचें बिल करून आम्ही बाहेर पडलों. मला मॅनेजर ओळखतात ह्या गोष्टीचा त्या पाहुण्याने फायदा घेतला व आम्ही बाहेर उभे राहिल्यावर तो कायसेसे मॅनेजर जवळ बोलला. मी अर्थातच त्या गोष्टीत रस घेतला नाहीं, तीच माझी चूक झाली. त्या गोष्टींत काय रस होता हें मला एका महिन्यानंतर कळलें. सदर हॉटेलच्या मॅनेजरनी मला एके दिवशीं मिनतवारीने विचारले, "भाऊसाहेब, एक महिना होऊन गेला. आपल्याकडील पांच रुपयांचें बिल अजून चुकतें झालें नाही. तेव्हां आतां मेहेरबानी——" त्याचें वाक्य पुरें न होऊं देतांच मीं विचारलें, "कसलें बिल ?" मॅनेजरच्या सांगण्यावरून मग माझ्या डोक्यांत प्रकाश पडला ! नाइलाजाने मला पांच रुपये काढावे लागले. हा पांच रुपयांचा चटकाच नाही तर काय ?

ह्या 'चटक्या' च्या वर आणखी एक पायरी आहे. ह्या 'नको असलेल्या भेटी' मुळे ठरलेल्या भेटींचा खेळखंडोबा होत असल्यामुळे मनाला जी चुटपूट लागून राहते ती सर्वोच्च पायरी ह्या 'नको असलेल्या भेटी'ची होय. मिस् × × × च्या आमंत्रणा-वरून, बरोबर सव्वादोनला पोहोंचता यावं म्हणून मी दोनालाच सायकलीवरनं भर वेगांत त्या रस्त्यानं निघालों. मुद्दामच आडवळणाचा नि बारीक सारीक गल्ल्यांचा रस्ता मी निवडला होता. रस्त्यानं कुणी भेटणार नाही नि ठरलेली भेट यशस्वी होईल या शंभर नंबरी विचाराने मी मोरे खुशींत जात होतों. तितक्यांत "अहो मि.XXX" म्हणून मला दुसऱ्या तालावरून आरोळी आली. कुठून आरोळी आली हें मी न समजल्यासारखें करून उगीचच इकडे तिकडे पाहून ( अर्थात् दुसऱ्या मजल्याकडे न पाहातां ) निसटण्याचा प्रयत्न केला. परंतु बंदुकीचा बार व्हावा नि त्या आवाजा सरशीं सावज झपाटावं तसाच मी दुसऱ्यांदा झालेल्या खण खणीत आवाजानं झपाटला गेलों आतां मात्र बहिऱ्याचं सोंग आणणं निसर्गाच्या विरुद्ध होतं. नाइलाजानं मला को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या दुसऱ्या मजल्यावरच्या ऑफिसांत शिरावं लागलं.

"कां हो × × × सर, आमची हाक इतकी बेमोल !" जोशी सर रागाचा लटका आव आणित म्हणाले.

"तसं नाही हो ऽ — —" मी समजूत पटवूं लागलों.

जोशीं सर पुढे बोलूं लागले. "कर्ज काढायचं आहे हो चारशें रुपये नि त्याकरितां तुम्हांला जामीन करावयाचे आहे. हा घ्या टाक अन् व्हा जामीन मला."

नाइलाजाने मला जामीन व्हावें लागलें. कारण कसंहि झाले तरी जोशी सर माझ्या चांगल्याच परि-चयांतले होते. त्यानंतर त्यांनी चहा आणविला आणि आग्रह करून मला पाजला. नाइलाजाने मिस् X X X च्या घरच्या चहाची आठवण हा चहा पितांना करून चहाची गोडी साधली. पण ती गोडी या चहाला कधी येणार तरी का ? ठरलेली भेट किंवा मनांत असलेली भेट कधी झाली आहे का या जगांत ?

खरंच ! ह्या नको असलेल्या भेटीपेक्षां जर पाहिजे असणाऱ्या भेटी इच्छा प्रकट करतांच व्हायला लागल्या तर किती बहार होईल नाही ? आज पैशांची फारच गरज आहे. अशा वेळीं जर XXX मित्र भेटला तर काम होऊन जाईल. असा विचार करतों आहे तोंच सदर मित्र भेटावा व आपलें पैशांचे काम व्हावें. आज एक शिकवणी ठरवायची आहे तर पालक भेटला व शिकवणी ठरली अशा विचारांतच असतांना

पालक भेटावा व इच्छेप्रमाणे शिकवणी ठरावी. त्या पेक्षांहि सरस भेट म्हणजे, रात्रीचे नऊ वाजले आहेत, बाहेर झक चांदणें पडलें आहे. थंडीची मादकता अंगास झोंबते आहे. अशा वेळीं जर XXXX बरोबर असती तर आपण फिरायला गेलों असतों. काय मजा आली असती ! अशा विचारांतच असावें नि मुद्दाम फिरण्यासाठीं म्हणून XXXX ने आपल्याला चला म्हणावें ! खरो-खरच नुसत्या कल्पनेनेच अंग रसरसतें ! मग [illegible] तच जर पाहिजे असलेल्या भेटी झाल्या त[illegible] बहार होईल जीवनांत ! परंतु ज्याप्रमाणे इ[illegible] गोष्टी या जगांत होत नाहीत त्याप्रमाणे इच्छित[illegible] होणें कसं शक्य होईल ? ह्या जगांत आपल्या [illegible] ' नको असलेल्या भेटी 'च जास्त !

---

# आलीस तूं माझ्या घरीं

( छंद : देवीवर )

आलीस तूं माझ्या घरीं
उंबरठा उजळला
तुझ्या स्नेहाळ दृष्टीने
आलें चैतन्य घराला ॥१॥

आलीस तूं माझ्या घरीं
दाही दिशा तेजाळल्या
तुला पाहूनी शुभांगे
मनीं चांदण्या लाजल्या ॥२॥

आलीस तूं माझ्या घरीं
फुलें फुललीं बागेंत
पारीजात हसुनीया
करी तुझेंच स्वागत ॥३॥

आलीस तूं माझ्या घरीं
सर्व सुखें घेऊनीया
आला आंब्याला मोहोर
तुला देखोनी हर्षला ॥४॥

आलीस तूं माझ्या घरीं
उधळीत हास्यफुलें
सुगंधाने ग त्यांचिया
मन माझें धुंदावलें ॥५॥

आलीस तूं माझ्या घरीं
लावाया ग सांजवात
फुलें प्रीतीचा ग दीप
हृदयीच्या मंदीरांत ॥६॥

आलीस तूं माझ्या घरीं
वाद्यें वाजलीं मंगल
सोनीयाच्या पावलानं
घर माझं उजळलं ॥७॥

आलीस तूं माझ्या घरीं
दीप घेऊनी तेजाचा
प्रकाशांत उज्ज्वल त्या
फुलें संसार प्रीतीचा ॥८॥

— जयवंतकुमार



# मानाचं मंदील

## ( लघुकथा )

लेखक— राजा महाराज ( द्वितीय वर्ष, कला )

फाड् ! फडाड् !! फाड् !! तिसरा बार झाला. दरवाजाजवळ एकच गर्दी जमली. त्या गर्दीतहि विश्वासरावांचा गडी विठू आणि शिवा पवाराचा मुलगा जिवा आपापले सांड घेऊन अगदी खिडकीजवळ आले. विठू सर्वांच्या अगोदर आपला सांड आंत कुदविणार इतक्यांत ते जनावर बुजलं आणि गरकन् मागं फिरलं. तेव्हढ्यांत जिवानं चपळाई करून आपला सांड आंत कुदविला. आंत कुदल्यानंतर त्यानं जो सांड मारला तों सर्वांत प्रथम तोच जहागिरदाराच्या वाड्यांत येऊन पोहोंचला. वाड्यांतील स्त्रियांनी त्याच्या सांडाची पूजा केली. त्याला गंधटिळा लावला. आणि ' मानाचं मंदील ' त्याच्या हातांत दिलं.

' जिव्या ! ' तेथे लगेच दुसरा आलेला विश्वास-रावांचा गडी विठू किंचाळला, " मंदील खाली ठेव. नाहीतर धन्यास्नी सांगून फोडून काढीन. "

" अरं जारं. शिवा पवाराची अवलादबी काय कमी नाय ! " जिवानं मागं फिरतांना आपला सांड त्याच्या अंगावर घातला.

विठू थोडक्यांत बचावला. नाहीतर चेंगरलाच गेला असता. जिवा दौडतच घरीं आला. त्याला पाहून त्याची बहीण पारु आनंदानं उड्या मारूं लागली. त्याच्या आईच्या डोळ्यांतून तर आनंदाश्रू टपकूं लागले. लेकराचं कौतुक, मग ते लहान असो मोठं असो, कोणत्या आईला वाटत नाही ? तिने जिवावरून व बैलावरून मीठ-मोहऱ्या ओवाळून टाकल्या. तांब्याभर पाणी ओवाळून टाकलें. त्याला गंधटिळा लावला, ओवाळलं, आणि त्याच्यासाठी ' इडा-पिडाचं राज्य जाऊन बळीच्या राज्याची ' प्रार्थना केली. शिवबाही एव्हाशी घरीं आला. म्हाताऱ्याचा चेहरा आनंदानं चमकत होता. ओठ आनंदानं थरथरत होते. त्याला पहातांच जिवा त्याच्या पायावर जाऊन पडला. म्हाताऱ्यानं पोराला हात लावून उठवला, छातीशी लावला. आणि त्याच्या तोंडून उद्गार बाहेर पडले, ' औक्षवान् हो पोरा ! '

फेटा बांधल्यामुळे जिवा फारच रुबाबदार दिसूं लागला होता. आधीच रंगानं गोरापान गडी आणि तशांत डोक्यावर राजेशाही मंदील. त्यामुळं तो एखाद्या खानदानी घराण्यांतील राजबिंड्या तरुणासारखा दिसूं लागला. त्याची छाती भरदार होती. अंगकाठीनेही गडी मजबूत. तालमींत कमावलेलं शरीर होतं. ' बाबा, विश्वासदादाकडं जायचं नव्हं का बैल पूजायला ? ' ' व्हय पोरा. तूं हो पुढं. येतोंच मी मागून तुझ्या. ' शिवबा म्हणाला आणि जिवा विश्वासरावांच्या वाड्या-कडे बैल पळवित निघाला.

विधानपूरचा पोळा म्हणजे त्या गांवचें एक आकर्षण होतें. तेथला पोळा पहाण्यासाठी लांबलांबचे लोक तेथे येत. विधानपूरची रचना म्हणजे शिवकालीन एखाद्या किल्ल्याजवळ असणाऱ्या गांवाप्रमाणेच होती. गांवाच्या मधून वहाणाऱ्या अम्रावतीमुळे खालचा गांव आणि वरची पेठ असे त्याचे दोन भाग झाले होते. खालच्या गांवच्या चहूबाजूने कधी काळीं बांधलेला तट अजूनहि चांगल्या स्थितींत दिसे. कुठं एखादं भगदाड पडलेलं दिसायचं तेवढंच !

त्या तटाला पश्चिमेकडे तोंड करून असलेले उत्तर व दक्षिण बाजूला दोन मोठे भव्य आणि लाकडी दरवाजे होते. त्या दरवाजांना जमिनीपासून माणसाच्या कंबरेइतक्या अंतरावर डाव्या फळीला एक एक खिडकी होती. त्या खिडकींतून एकावेळीं एक बैल अथवा माणूस

जाऊं शकेल इतकी ती रुंद होती. पोळ्याच्या दिवशीं हे दरवाजे दुपारीं सूर्य पश्चिमेला 'शेलभर' कलला कीं बंद होत असत. आणि बाहेर अमावंतीच्या पात्रांत गांवांतील झाडून सारे बैल जमत. जो तो आपल्या बैलाला सजवून दरवाजाजवळच्या गर्दींत आणून उभा करी. दरवाजा लावलेला. खिडकी फक्त उघडी. माण--सांचेंही जाणं येणं जवळ जवळ बंद होई. खिडकीजवळ २।३ गांवकरी उभे रहात. आणि सूर्य अस्तास जाण्याला 'दुशेरभर' दिवस राहिला म्हणजे बंदुकीचे तीन बार होत. तिसरा बार होताच आपण व आपला बैल असें एकदम आंत कुदायचे. आणि त्या दोन्ही दरवाजांना समान अन्तरावर असलेल्या जहागिरदाराच्या वाड्यांत जायचं. अशा तऱ्हेने दोन्ही दरवाजांतून जे प्रथम कुदतील व त्यांतूनही जो वाड्यांत प्रथम येईल त्याला त्या वर्षाचं 'मानाचं मंदील' मिळत असे. अन् दुसऱ्याला नारळ--करदोडा.

गेलीं ३।४ वर्षें हें 'मानाचं मंदील' विश्वास--रावाकडे येत होतं. सालाबादप्रमाणे यंदाहि विश्वास--रावांचाच पोळ पोळा जिंकील असें सर्वत्र बोललें जात होतें. विश्वासराव हे विधानपूरांतील एक श्रीमंत जमीनदार होते. गांवांतील इतर जमीनदारांपेक्षा त्यांचा व्यवहार जोरांत चाले. त्यांची कुळं इतरांपेक्षा जास्ती. त्यामुळे इतर व त्याचे कुळसुद्धां जणूं काय त्यांचे 'मारलेले' होते. तशांत त्यांना चांगले चांगले पोळ पाळण्याचा फार नाद. त्यांच्याजवळ उत्तमोत्तम पोळ पहावयास मिळत. इतक्या बाजूंनी समर्थ असल्याने गेल्या ३।४ वर्षांत त्यांच्या विरुद्ध जायचे कुणींही साहस केलें नव्हतें. पण यंदा घडलं तें निराळंच! शिवा पवाराच्या, त्यांच्या एका कुळाच्या मुलानं तें साहस केलं होतं!

विश्वासराव मोरे संतापाने लाल झाले होते. पोळा फुटल्यानंतर ते तडक घरीं आले. आणि ओट्यावर बसलेल्या मैनेला 'कुणी आलं तर मी निजलों आहें असं सांग.' एवढं सांगून धाड् धाड् वरच्या मजल्या-वर निघून गेले. बिचारी मैना! तिला आपल्या पित्याच्या रागाचं कारणच समजेना. वडिलांना इतकं रागावलेलं तिनं कधीच पाहिलं नव्हतं. पण बिचारीला

काय ठाऊक कीं तिच्या आनंदाचं कारण हेंच त्यांच्या रागाचं कारण आहे. जिवानं पोळा जिंकला हें ऐकून तिला फार आनंद झाला होता. ती आता त्याच्या लच विचार करीत होती. 'दादा, हायती ना घरांत?' अंगणांत सांड घेऊन जिवा उभा होता. आनंदाची बातमी 'दादांना' सांगावी म्हणजे ते आपली प्रशंसा करतील या अपेक्षेने तो आला होता.

त्याच्या प्रश्नाने भानावर आलेल्या मैनेने त्याच्या कडे पाहिलं. आपला प्रियकर आपल्यासमोर उभा आहे हें पाहून ती लाजली. तशांत आज त्याचा नूर निराळा होता. त्या पोषाखांत पाहून तर मैना क्षणभर गोंधळली. पण ते वर न दिसूं देता ती म्हणाली, 'झोपले वरती. पण थांबा हं...!' असं म्हणून ती पूजेचं सामान घेऊन आली. आणि पूजा करूं लागली.

लाल पैठणींत मैनेची शुभ्र कांती अतिशय सुंदर दिसत होती. जिवा तिच्या हालचालीकडे एक सारखा पहात होता. जशी कांही त्याने मैना कधीच पाहिली नव्हती.

'असं वेड्यावानी काय बघतायसा टक लावून माझ्याकडं? कुणी पाहिलं तर काय म्हनल?' या मैनेच्या प्रश्नानें तो भानावर आला.

'आ ... काय म्हनलंस! पन आरशांत ... बघाया का कुनाश्नी भ्यावं लागतं? मी माझं ... आरशांत बघत होतों.' जिवा हंसत म्हणाला.

'कांहीतरीच तुमचं!' मैनाला त्याचं बोलणं ... गुदगुल्या झाल्या होत्या.

'हं, घ्या ही साखर. करा गोड तोंड!' ... हातांत साखर घेऊन म्हणाली तिला अतिशय आनंद झाला होता.

'उं हूं! टाक कीं माझ्या तोंडांत. तरच ...' जिवा 'आ' करीत म्हणाला.

'हें काय असं? घ्या म्हणतें ना. कुक्कुलं ... नाही कांही तुम्ही?' मैना रागाचा आविर्भाव ...



म्हणाली. 'नाहीं घेणार. तूं तोंडांत टाकशील तरच घेईन. नाहींतर चाललों कसा?' जिवा म्हणाला.

आता मात्र मात्रा लागूं पडली. मैना लगेच आव-र्जून म्हणाली, 'बरं घ्या. भारीच बाई तुम्ही!' जिवा हांसत हांसत निघून गेला.

ओट्यावर आलेल्या विठूने हें पाहिलें. आपल्या मालकाची मुलगी एका कुळाच्या मुलावर प्रेम करते हें त्याला सहन झालें नाही. खूप चिडला तो मनांतून जिवावर.

दोन तीन दिवसांनी शिवा पवाराला विश्वासरावा-कडून बोलावणं आलं. त्याचं कारण शिवानं ताडलं. एक प्रकारें त्याच्या मुलानं मोठा गुन्हाच केला होता. शिवा पवार एक कुळ! जातीचा झाला म्हणून काय झालं? पण एवढी शिरजोरी?

'काय रे शिवा, ये असा.' विश्वासरावांच्या आवाजांत पुरेपुर तिरस्कार भरला होता.

'जी दादा.' म्हणून शिवा ओट्यावरच एका बाजूला बसला.

'तुझा मुलगा फारच चढला म्हणे! मला कालच विठूनं सांगितलं. तुझ्या जिवानं काल आमच्या मळ्यां-तील गवत कापून आणलं. कशाची ही हिम्मत? थोडी आपुलकी दाखविली तर लागले डोक्यावर बसायला. हें पहा, आपल्या कर्जाची लवकर व्यवस्था कर.' सुपारी कातरीत ते म्हणाले.

'दादा, शपथ घेऊन सांगतों कीं माझा जिवा न्हाओ असं करणार.' शिवा कळवळून म्हणाला. 'शपथा म्हणजे काय रस्त्यावरचे दगड वाटतात तुम्हाला? कुणीहि उचलावे नी फेकावे. मानाजीराव आणि त्यांचा नौकरहि साक्षी आहे या गोष्टीला. सांभाळ हं! माझ्याशीं गाठ आहे!' विश्वासराव रागाने म्हणाले, मानाजीरावाचं नांव काढतांच शिवा सारं कांही समजला. हें कारस्थान मानाजीरावांचेंच असलें पाहिजे अशी खात्री झाली. मानाजीराव विश्वासरावांचा द्वेष करतो हें

तो जाणून होता. विश्वासरावांच्या रागाचा मात्र असा फायदा घेण्यांत येईल याची मात्र नव्हती त्याला पूर्वी कल्पना. मानाजीराव एक कारस्थानी व्यक्ति होती.

'मानाजीरावांचा गडी सांगतुया आन् तुम्ही ऐकतां धनी? आपल्या पायाची आन घेऊन सांगतों धनी कीं माझं आणि माझ्या पोराबाळाचं बरवाईटबी झालं तर मी सहन करीन पन देवापाशीं तुमच्यासाठीं दुवाच मागीन.' शिवा पाया पडून म्हणाला.

'तें कांही मी जाणत नाहीं. तुझ्या मुलाला आवर. वाया जाईल नाहीतर!' विश्वासराव आंत निघून गेले.

शिवाही उठला. अतिशय वाईट वाटत होते त्याला. आसवांनी त्याचे डोळे भरलेल्या घागरीप्रमाणे झाले होते. गुन्हा नसतांना विश्वासरावांनी त्याच्यावर तोंडसुख घेतले होते. गांवांत एक प्रामाणिक व्यक्ति म्हणून तो ओळखला जाई. विश्वासरावाला तो साक्षात् देव मानी. पण त्याच देवाने आज त्याला दुखविलें होतें. चालताचालतां तो मनाशींच विचार करीत होता. त्याच्या-मनांत एक पुसट शंका चाटून गेली. या संधीचा फायदा घेऊन आळ आणण्याशठीं मानाजीराव विश्वास-रावाचं अगर जिवाचं बरं वाईट तर करणार नाही ना! यापुढे मात्र जपून राहिलं पाहिजे. असं त्यानं मनाशीं ठरविलं. घरीं आल्यावर जिवाला त्याने तसं बजावलंही!

रात्रीची काळी कुट्ट वेळ. कारस्थानी लोकांना नव्यानव्या कारस्थानाची कल्पना देणारी रात्र. जिकडे तिकडे सामसूम झालें होतें मानाजीरावांच्या वाड्यांतील अंधार अधिकच भेसूर दिसत होता. आंतल्या खोलींत तो विठूशीं हळुहळू बोलत होता. कोपऱ्यांतली पणती आपल्या अस्तित्वाला पारखी होत होती.

'विठू,' मानाजीराव हळुहळू बोलूं लागले, 'मी मध्यरात्रीला येईन. दारावर टिक्-टिक्-टिक् असे तीन आवाज काढीन. नंतर तूं दार उघड. मात्र मी येण्याच्या अगोदर वाड्यांत चहुकडे वाळलेलें गवत पसरून ठेव. मी आल्यावर करायचें तें पुढे करूं. मात्र ध्यानांत ठेव हं! बार उडालाच पाहिजे.' विश्वासरावांच्या विठूला विश्वासांत घेऊन कारस्थान

रचलं जात होतं. मानाजीरावांना विश्वासरावांच्या इस्टेटीवर फार डोळा होता. ती मिळवितांना विश्वास-रावांची मैनाहि आपल्या मुलाला करून घ्यावी अशी त्याची इच्छा होती. ती विश्वासरावांजवळ त्याने बोलू-नही दाखविली. पण विश्वासरावांनी ती नाकारली होती. म्हणून त्याचा हा बदला घेण्यांत येणार होता. नांव मात्र दुसऱ्याचेंच येणार होतें. विठू गुपचूप बाहेर पडला. आणि कुठं तरी टिटवीनं टिव् टिव् केली. विठू घाबर-लाच मनांत. पण तसाच धीर धरून निघाला तो.

आग! आग!! आग!! विश्वासरावांच्या वाड्याला आग लागली होती. कुणी लावली याबद्दल कांही तर्कटं करीत होती. कुणी आंतलं सामान बाहेर काढीत होते. कुणी आग विझविण्याचा प्रयत्न करीत होते. आग लागून बराच वेळ झाला असावा. कारण वाडा चहूबाजूंने घेरला गेला होता.

त्या गर्दीच्या एका बाजूला विश्वासरावांना एका खाटेवर आणून निजविण्यांत आलं होतं. त्यांना शिवा-नेंच उचलून आणलं होतं. विश्वासरावांना त्याच्या खोलींत खांबाला बांधलेलं होतं. आगीची ओरड ऐकू-तांच शिवा आणि जिवा धावले होते. शिवानं विश्वास-रावाला बाहेर काढल्यानंतर तो त्यांच्याजवळच बसून होता. शेजारीच गोंधळलेली मैना फडक्याने विश्वास-रावांना वारा घालीत होती. जिवाचा मात्र पत्ता नव्हता. विश्वासराव अत्यवस्थ होऊन पडले होते. 'हरामखोर. ...म्हणे मुलगी दे ...... आग ......लावतो... नाही का...भेकड...नीच...पाजी...काय कर... ...मुळीच देणार नाही...' असें ते अधून मधून ... होते. कुणालाच कांही कल्पना होईना.

इतक्यांत दोन माणसांना कांखेत घेऊन ओ... ओढीत जिवा बाहेर येतांना दिसला. बाहेर ... त्याने दोघांना जमिनीवर टाकले. 'कोण विठु ... मानाजीराव!!' लोक आश्चर्याने उद्गारले.

मानाजीरावाचें नांव ऐकताच विश्वासरावांनी ... उघडले. त्यांनी शिवाला आणि जिवाला हाक मा... सर्वजण शांत झाले. आग थंडावत होती.

'शिवा–जिवा–' विश्वासराव हळूहळू ... लागले. त्यांना दम लागला होता. जणूं कांही शेवट... सांगणं, "क्षमा करा मला– टाकून बोललों मी. ... देवमाणसं. आज माझा नी माझ्या पोरीचा जीव ... विला. त्या नीचाचं कारस्थान त्यालाच भोवलं. मी ... थोड्या क्षणाचा सोबती आहे. पण... माझी ... विनंती ऐका... नाही म्हणूं नका... शिवा! ... ही एकुलती एक ठेव, मैना, मी तुझ्या जिवाला देत ... सांभाळ हं तिला. मैना बाळ..........!'

विश्वासरावांना एकदम उचकी आली. ते ... झाले ते कायमचे.

---



" एक शब्द बोलूं नकोस, कांने फार आखूड व्हायला लागले आहेत तुझे "

व्यंगचित्रकारः— श्री. खानझो...



# कळतं पण—

( लघुनिबंध )

लेः— कु. सरोज देशमुख ( तृतीय-वर्ष, कला-विभाग )

एकादी गोष्ट आपण अगदी न कळत करून जातों आणि मग ती विचाराअंतीं फारशीं मनाला पटणारी नसेल तर स्वतःला दोष देतों. माझेंहि परवा अगदीं असेंच झालें. फिरावयास जातांना अगदी न कळत माझे पाय रामाच्या देवळासमोर क्षणभर थांबले. आणि हात नमस्कार करण्यास वर गेले. मग मात्र माझा मलाच राग आला. माझ्यांतला बुद्धिवाद जागा झाला आणि तार स्वराने म्हणूं लागला, " परमेश्वर काय फक्त दगडी मूर्तींतच आहे? तो चराचर सृष्टींत भरून राहिला आहे. दगडाच्या मूर्ती खुळ्या लोकांसाठी आहेत. दगडी मूर्ती म्हणजे कांही देव नव्हे. देव ही एक सर्वशक्तिमान् प्रेरणा आहे. " माझें मन थोडा वेळ अगदी बावचळून गेलें. " खरंच ह्या सर्व गोष्टी आपल्याला पटतात. मग कां बरं आपले हात न कळत वर उचलले जातात? " मला मोठा प्रश्न पडला. पण त्याचें उत्तर मात्र ताबडतोब सांपडलें. माझ्यांतली संस्कारक्षमता विजयी स्वराने हांसत होती. बालपणा-पासून सर्वांना देव म्हणून निरनिराळ्या मूर्तींना वंदन करतांना आपण पाहतों. मूर्तिपूजेचे कित्येक सोहळे आपल्या आसमंतांत घडतात व त्याचा अप्रत्यक्ष-पणें किती तरी परिणाम आपल्या मनावर घडतो. मूर्ती म्हणजे जर देव नव्हे तर तिला नमस्कार केल्या-खेरीज पुढे जायला काय हरकत आहे? पण मनाला तसें कित्येकदां बजावूनहि रोज फिरावयास जातांना माझे हात जोडले जातात. आणि पुढे गेल्यावर मी स्वतःला दोष देऊं लागतें.

आपल्या मनांतली देवाबद्दलची भावना ही तर किती तरी पवित्र असते. त्यामुळे ती आपण झुगारून देऊं शकलों नाहीं तर नवल नाही. पण रोजच्या व्यवहारांतील अगदी सामान्य गोष्टीसुद्धा आपण निव्वळ संस्काराचें प्राबल्य म्हणून करीत असतों. पुष्कळदां या कृतींचें वैयर्थ आपल्याला जाणवत असतें. पण म्हणतात ना, कळतें पण वळत नाही. तशी आमची गत होते. परवांचीच गंमत! माझा एक दूरचा भाऊ आमच्याकडे आला होता. हे महाशय स्वतःला फार सुधारणावादी म्हणावयाचे. पूर्वापार चालत आलेल्या गोष्टीवर तर त्याचा फार कटाक्ष असायचा एकदां कसला तरी उपवास होता. उपवासाच्या या खुळावर तो कोरडे ओढूं लागला. " काय वेडगळ आहात तुम्ही लोक! म्हणे बटाटा चालतो नि कांदा चालत नाही. मिरची खायची आणि कोथिंबीर मात्र वर्ज्य. सगळ्या भाज्या एकाच जमिनींतून पिकलेल्या. मग हें चालतें नि तें चालत नाही, हें कसें काय?" मलाहि त्याचे विचार पटले. पण त्याची जरा गंमत करावी म्हणून मीं म्हटलें, " जाऊं दे रे भाऊ, आम्ही वेडगळ तर वेडगळ! तूं आगला हॉटेलमध्ये जाऊन झकपैकी " नॉन-व्हिजिटेरियन " जेवण जेवून ये." तेव्हां मात्र तो चांगलाच गडबडला. स्वतःला जेमतेम सावरून घेत म्हणाला, " अं—अं—तशी कांही हरकत नाही. पण आज मला जरा बरं नाही. हॉटेलचें अन्न सोसायचें नाही." ही बरं नसण्याची सबब अगदीच खोटी होती. उपवासावर जरी त्याचा विश्वास नव्हता तरी त्याच्या इतकें विरुद्ध जातांना मन कचरूं लागलें. त्याच्या घरांत आसपास, जें आजपर्यंत पाळलें गेलें होतें त्याचा जो परिणाम त्याच्या मनावर झाला होता तो आड येऊं लागला.

आपल्या मनावरच्या संस्कारांचें प्राबल्य म्हणून आपण स्वतः तर कित्येक गोष्टी करतोंच; पण इतरांनीहि त्याच्याविरुद्ध गेलेलें आपल्याला फारसें पटत नाही. मध्यंतरी एक दिवस आम्ही मैत्रिणीमैत्रिणी सिनेमाला गेलों होतों. शो सुरू व्हावयास अजून अवकाश होता. अर्थातच आमच्यापुढे एक फॅशनेबल जोडपें बसलें होतें.

त्यांतल्या बाईकडे आम्ही अगदी निरखून बघूं लागलों. आमच्यापैकी एकीने हळूच विचारलें "कोण ग?" "कोण जाणे! कोणीतरी नवीन ऑफिसर आलेले दिसताहेत." दुसरी कुजबुजली. आमची ही कुजबुज त्या बाईने ऐकली असावी. तिने चटकन् मागे वळून पाहिलें. आम्ही जरा ओशाळलों अन् गप्प बसलों. पण त्या बाईने मागे पाहिलें तेवढ्यांत एक गोष्ट आमच्या सर्वांच्या नजरेंत भरली. ती म्हणजे तिने कुंकू लावलें नव्हतें. "इश्श! फॅशन करावी, पण म्हणून कांही कुंकवाला रजा नको द्यायला!" मीं हळूंच म्हटलें. अन् ते सगळ्यांना पटलेलें दिसलें. खरं म्हणजे कुंकू लावण्याचा आणि स्त्रीच्या सौभाग्याचा परोपरीने कांही संबंध नाही हें आम्हाल पटलेलें होतें. पण एका हिंदू सुवासिनीने कुंकू लावूं नये, हें मात्र कोणालाच रुचलें नाही. पाश्चात्य स्त्रियांनी कुंकू लावावें असा विचारहि कधी मनांत येणार नाही. पण आमच्या स्त्रियांनी कुंकू न लावण्यांत वाईट कांही नाही हें पटलेलें असलें तरीहि तें मोठेसें बरें वाटत नाही. पूर्वीच्या सुवासिनी कुंकू लावल्याखेरीज आरशांत तोंड पहात नसत. या प्रकाराची उजळणी दर घरीं थोड्याफार प्रमाणांत होत असणार, व या संस्काराचा परिणाम म्हणूनच कीं काय आमच्या पिढीला कुंकवाचें महत्व झुगारून देतां आलेलें नाही.

पूर्वीपासून बघत आलेल्या किंवा ऐकत आलेल्या कांही गोष्टींचे इतके दृढ संस्कार आमच्या मनावर झाले आहेत कीं प्रसंगीं त्या गोष्टींच्या विरुद्ध ओरड केली तरी पुन्हा आपण मूळ पदावर येतों. माझी एक मैत्रीण सांगत होती. "अग, आपल्या वर्गांतली ती शुभा होती ना, ती त्या अमक्या अमक्याच्या इतकी नादी लागली आहे, कीं कांही विचारूं नकोस. दोघंही घरच्यांना, बाहेरच्यांना कोणालाच किंमत देत नाहीत. हवं तशीं वागतात" "कमाल झाली! तो एक पुरुष आहे; पण हिला कांही वाटायला पाहिजे." मी चटकन् बोलून गेलें. दुसऱ्याच क्षणीं माझ्यांतली आधुनिक तरुणी जागी झाली आणि म्हणूं लागली, "कां, पुरुष आणि स्त्री असा भेद कां म्हणून? स्वैराचाराबद्दल दोष दोघांनाहि द्या." पण हे सगळे मागाहून सुचलेले विचार होते. आपल्या समाजांत फार पूर्वीपासून पुरुषांना अमर्याद स्वातंत्र्य दिलें जातें. व तें आपल्या ... अंगवळणीं पडलें आहे कीं त्यांत कांही गैर आहे ... सरावाने वाटेनासें झालं आहे स्त्रियांनी मात्र ... मर्यादेच्या पुढे जातां कामा नये अशी आप... समजूत झाली आहे. व स्वैरपणे वागणें हा पु... मालकी हक्कच असल्याप्रमाणें आपण बोलत... याचें कारण इतकेंच कीं पुरुषांनी कांहीही केलें ... क्षम्य आहे असें अप्रत्यक्षपणें आपल्या मनावर ठ... गेलें आहे.

अगदी साध्या गोष्टींत आपण संस्कारप्रा... विशिष्ट तऱ्हेने वागतों. पण त्यांत निदान ... आयुष्याचा तरी फारसा प्रश्न नसतो. पण अगदी ... तटीचा प्रसंग आला तरीहि माणसाची संस्कार... आडवी आल्याखेरीज रहात नाही. असे कांही ... असतात कीं ह्यांत पूर्वसंस्कारांचें महत्व मान... चितच नव्हे तर दुःखकारक होतें. पण तरीहि ... रांनी आपलें मन इतकें अगतिक बनलेलें अ... त्यांच्याविरुद्ध सामान्य माणूस सहसा जाऊं शकत ... पुनर्विवाहाला आजच्या काळांत हसणें हेंच हास्य... ठरेल. पण तरीहि किती पुनर्विवाह आपल्या ... होत आहेत? फारच थोडे! आपल्या अल्पवयी ... आयुष्यभर रडत बसावें असें कोणत्या सहृदय ... वाटत असेल? आपण स्वतः लावून वाढविले... जरी कोणी उपटून टाकूं लागला तरी आपल्या... होतें. मग स्वतःच्या मुलीच्या जीवनाचा ... झालेला कोणत्या मातापितरांच्या काळजाचा ... घेतल्याखेरीज राहील? तिची जीवन... वृक्षाश्रयाच्या अभावीं कोलमडून पडत ... त्यां दिसत असते. तिला पुन्हा एखाद्या बळकट ... आधार देणें जरूर आहे हें त्यांना पटत ... पण... ...पण... ... ... अल्पकालापूर्वी बांधलें ... तिचें मंगलसूत्र काळपक्ष्याने झडप घालून नेलें ... मोकळा दिसणारा तिचा गळा पाहून त्यांच्या ... दुःखाग्नीचा डोंब उसळलेला असतो. ह्या ... पुनर्विवाहाने मंगळसूत्र अडकविलें नाहीं, तर किती ... नरपशु त्याच्या भोंवती मोहरूपी कपटपाश ... हें सारें कळत असतें पण वळत मात्र नाहीं. ... बालविधवा मुलीचा पुनर्विवाह करून द्यावयास ...



जण तयार होतील? स्त्रीच्या नशिबांत वैवाहिक जीवनाचें सुख असलें तर तिला पहिला पतीच जन्मभर लाभतो. तो जर दुर्दैवाने लाभला नाही तर तिने या जीवनांतील सर्व सुखें वर्ज्य मानून पुण्यसंचय केला पाहिजे, अशी पूर्वीच्या लोकांची समजूत होती. पूर्वीच्या काळीं विधवांना किती कष्टाचें, अपमानाचें अन् भावनाशून्यतेचें जीवन जगावें लागे हें कांही अपरिचित नाही. आता त्यांची स्थिती कांहीशी सुधारली असली तरी पूर्वसंस्कारांची पकड इतकी घट्ट आहे कीं समाज फारसा दोष देणार नाही हें माहित असूनहि आपल्या मुलीचा पुनर्विवाह करून देण्यास लोक कचरतात. विधवांच्या विषयीं त्यांच्या पूर्वीसारख्या रानटी कल्पना नसतात, परंतु जे आपल्या पूर्वजांनी केलें नाही तें करणें संस्कारक्षम मनाला कठीण वाटतें. घरच्या लग्नसमारंभांत एका काळोख्या खोलींत एक जुनेरं नेसून बसलेली आजी, पणजी त्यांनीं बालपणी पाहिलेली असते, व त्यामुळे तसेंच नव्हे तरी त्याच तऱ्हेचें जीवन हेंच विधवेचें जीवन असें त्यांचें एक मन बजावीत असतें, व त्याच्याविरुद्ध जाण्याचें धैर्य त्यांना होत नाही. मग त्या विधवेचें जीवन बरबाद झालें तरी हरकत नाही.

आपल्या आप्तांपैकीं एकाच्या जीवनमरणाचा प्रश्न आला तरीहि जर संस्कारक्षमता आड येते, तर मीं तरी माझ्या मनाला कां दोष द्यावा? संस्कारांचें इतकें कांही प्राबल्य सामान्य माणसाच्या जीवनांत आहे कीं तो नकळतच त्यानुसार वागतो. मग माझे पाय रामाच्या देवळाजवळ क्षणभर थबकले व माझे हात जोडले गेले तर त्यांत दोष देण्याजोगें तरी काय आहे?

---

## उद्‌बत्ती

शोभे मान्दिर भव्य, सुंदर तसें चित्तां हरी सत्वरी
मूर्ती मोहक रत्नमंडित अशी, विद्युद्दिवे ते छतीं
चित्रें रम्य किती तिथें विलसाति ते खांबही शोभती
नाना रंगित झुंबरें, चमकती घंटा रुपेरी वरी
उद्‌बत्ती मधु सौरभीं जळतसे मूर्तीपुढें मान्दिरीं
देई मन्द सुगंध जाळुनि तनू; आत्मार्पणीं दंग ती
घेता दर्शन कौतुकें कुणि वदे 'घंटा किती शोभती!'
'चित्रें, दीप किती मनोहर'! अशी कोणी प्रशंसा करी
उद्‌बत्ती जळुनी जनां सुखवुनी गेली विझोनी जरी
आनंदें परि अल्प कौतुकहि ना केलें तियेचे कुणी
जें जें भव्य, विशाल, आणि विलसे तेजाळ त्या पाहुनी
जाती नेत्र दिपून होत स्तुतिचा वर्षाव कीं त्यावरी

× × ×

लाभे कौतुक ना तयां जनसुखां सर्वस्व जे खर्चिती
औदार्यें उसन्या जगीं खल परी सन्मान्यता पावती

वामन बोंडे
कला विभाग – प्रथम वर्ष.

# नाटकाची तालीम

## ( एकांकिका )

लेखकः— विश्वनाथ जोशी, ( तृतीय वर्ष विज्ञान )

[ पडदा वर उचलला जाण्यापूर्वी एकजण बाहेर येतो; आणि म्हणतो "प्रेक्षकहो, आतापर्यंत आपण अनेक नाटकें पाहिलीं असतील. पण 'नाटकाची तालीम' पहाण्याची संधी आपल्यापैकीं फारच थोड्या जणांना लाभली असेल; नाही ?……नाटक बसविणारे ते तालीमबाज आणि तो त्यांचा तालीमखाना पहावयाचा आहे तुम्हाला ?……मग थांबा. थोड्याच वेळानंतर 'नाटकाची तालीम, हा जो नाट्यप्रवेश येथे करण्यांत येणार आहे, त्यांत पहा काय काय दिसतें तें……… नाटकाची तालीम—!!!——" येवढं बोलून तो आंत जातो,…… आणि लागलीच पडदा वर उघडतो ]

( स्थळः—'अरुण'ची खोली ! त्याचा मित्र 'वसंत' एका खुर्चीवर बसलेला आहे, आणि अरुण अस्वस्थपणें खोलींतच येरझाऱ्या मारीत आहे )

अरुण– छे ! छे ! लेकाचे इथून तिथून सारे टोळभैरवच्या टोळभैरव, पण मान तर पहा किती आहे एकेकांचा ! बरोबर आठ वाजतां 'नाटकाच्या तालमी'ला सुरवात होईल. असं अगदी बजावून सांगितलं होतं. आतां साडे आठ वाजून गेलेत, पण…… एकाचा तरी पत्ता आहे का पहा अजून !!! डॅम इट्—! ह्या लोकांना काय वाटतं, आम्हाला कांही धंदे नाहीत म्हणून आम्ही हीं नाटकं करतों—?………

वसंत– अरुण, सार्वजनिक काम म्हटलं म्हणजे हें असं चालायचंच.

( बाहेर दारावर कुणीतरी धक्के मारत असल्याचा आवाज येतो. ) कोण आहे ?

अरुण– मला वाटतं बहुतेक तेच आले असावेत. ( मोठ्याने ) या ! या. उघडंच आहे दार.

( दार ढकलून, मनोहर आणि अरविंद प्रवेश करतात. दोघेही वेळेबाबत अगदीच बेफिकीर आहेत )

अरुण– काय हो महाशय आत्तां वाजले वाटतं आठ ? अं.

अरविंद– ( मनोहरला उद्देशून ) अरे मना, लेकाचा असा दम भरतो आहे कीं, जसं पगारी नटच नेमलं आहे ह्यानं आपल्याला.

अरुण– ( चिडून ) अरविंद, दम भरण्याचा प्रश्न हा. पण कितीही केलं तरी 'सामाजिक जबाब… आहे ही. काय, समजतां काय रे तुम्ही स्व…

अरविंद– ए हे पहा बुवा, आमचा समज… काढणार असशील ना — तर आत्ता… खोलीच्या बाहेर. तुमचं तें नाटक गेलं… अन् तुम्ही पण गेलात………

वसंत– अरविंद, ए अरविंद, अरे असं डोकं फिर… सारखं काय बोलतोस रे ?— तुम्हाला… झालाय थोडा उशीर तर निदान आता… बसायचं ……अरुण, — मला वाटतं, … आता नाटकाच्या तालमीला सुरवात … म्हणजे निदान हें नाटक तरी होणार नाही…

अरुण ठीक आहे. पण कोणतं सुरू करायचं आ… … हं … मला वाटतं, त्या 'शब्दकोड्या… नाटकाला सुरवात करावी आता…… … आला आहे कां ?

वसंत– हेमा नाही आला अजून……पण…… प्रवेशांत त्याचं कांही विशेष काम नाही; सुरवात करायला कांहीच हरकत नाही.

अरविंद– ( उसळून ) कोण म्हणतो हरकत नाही… …माझी हरकत आह. माझा विरोध आहे… जेव्हा पहावं तेव्हा ह्या अरुणचंच घोडं पु… ते कांही नाही. मी म्हणतों, आतां त्या… कोड्या' ऐवजीं 'मुलाखती'चंच नाटक… पाहिजे आधी.

## आमचे कलावंत

देवमाणूस



(डावीकडून) बसलेले : कु. पराडकर, कु. कोथूरकर, प्रा. सौ. तारळेकर, प्रा. तारळेकर, श्री. हळबे, श्री. नूलकर.
( सहाय्यक ) ( दिग्दर्शक )
उभे : श्री. जोशी, श्री. चौबळ, श्री. खानझोडे, श्री. वर्तक, श्री. शुक्ल

नाटकाची तालीम




वसंत : मान आणि पॅन्ट दोन्हीही वर करतो आहे बेटा पण आवाज मात्र……?
[ श्री. जोशी, श्री. ताम्हाणे, श्री. चौबळ, श्री. प्रधान ]

## नटराज



[ चित्रकार : वसंत पवार ]



अरुण– हे पहा अरविंद, कुणाचं एकाचं तरी ऐकायलाच पाहिजे. माझं ऐकायचं नसेल तर ही जबाबदारी तूं घे. आम्ही सगळे तुझं ऐकायला तयार आहोंत. नाटक करायची मला कांही हौस नाही येवढी; समजलास ?

वसंत– अरविंद, गप रहा म्हणून सांगितलं ना ? जरा कुठे नाटकांत काम करणार आहेस म्हणजे कांही उपकार नाहीस करीत त्याच्यावर तूं ! अरुण, नाटकाच्या बाबतींत अरविंदच्या तंत्रानं चालायचं म्हटलं म्हणजे त्याचे तीन तेरा वाजायला कांही फारसा वेळ लागणार नाही. तेव्हा आपलं, हें काम तुम्हीच सांभाळलं म्हणजे ठीक होईल.

अरुण– बरं आहे. करूं या आपण आता सुरवात. अरविंद, तूं आता स्टेजच्या त्या बाजूला उभा रहा पाहूं. तूं स्वतः एक पका मवाली आहेस—

अरविंद– हे पहा बुवा, परत आपलं.........

अरुण– अरे असा रागावतोस काय ? ' मवाली ' काय मी खरोखरीचा म्हणालों तुला ?-- अरे आपल्या नाटकांतला.

अरविंद– हं हं, मग कांही हरकत नाही, आता चालूं द्या तुमचं.

अरुण– तूं आता तुझी भूमिका समजावून घे पाहूं आधी. तूं ह्या ' मनोहर ' ला— म्हणजे आपल्या नाटकांतल्या प्रभाकराला ह्या नाटकाच्या प्रारंभींच पैशाच्या बाबतींत फसविलेलं आहेस——

मनोहर– अरे पण अरुण,--नाटकांतच कशाला ?-- प्रत्यक्ष काय कमी फसविलं आहे ह्यानं मला ?

अरुण– ते जाऊं दे रे बुवा. तो प्रश्न खाजगी आहे. हं करा सुरवात.

( मनोहर आणि अरविंद अभिनय करण्याच्या आविर्भावांत उभे राहतात आणि मग अरविंद स्टेजच्या एका बाजूनें चालत येण्याचा अभिनय करतो. )

मनोहर– ( नाटकातलें भाषण सुरू करतो ) — कोण ? कोण ते ?— दिनानाथ, आज शब्दकोड्याचा निकाल लागणार होता ना ?—लागला कां तो ?--

अरविंद– लागला कीं.—

अरुण– होपलेस ! ! अरे मना, तूं येवढा शब्दकोड्याचा निकाल त्याला विचारतो आहेस, अन् तुझं बोलणं येवढं मिळमिळीत असून कसं चालेल ? तुझ्या बोलण्यांत कशी अधीरता पाहिजे, उत्सुकता पाहिजे. परत करा.

मनोहर– अधीरता पाहिजे ?— उत्सुकता पाहिजे ?— ठीक आहे...... ( आवाज बदलून ) दिनानाथ, आज शब्दकोड्याचा निकाल लागणार होता ना ? लागला का तो ?

अरविंद– लागला कीं. पण पांच चुका निघाल्यामुळे सगळा घोटाळा झाला बघ.

मनोहर– घोटाळा झाला. घोटाळा झाला. हात रडतोंड्या ! एक शब्द देखील बोलूं नकोस आता. नेहमीच कसा रे घोटाळा होतो तुझा ?

अरवींद– झाला खरा चुकून; पण प्रभाकर, त्याला काय करणार ? त्यांच्या त्या उभ्या शब्दांच्या सूचक विधानांत त्यांनीं लिहिलं होतं;-' दुसऱ्याच्या स्वाधीन करण्यापूर्वी नीट विचार करावा '— रात्रभर खूप विचार केला मी. अन् तिथं लिहिला ' मान ' पण उत्तरांत त्यांची निघाली आहे-' कान '—बोल आतां. कांहीं इलाज आहे कां ह्याला ?

मनोहर– हो. आहे ना चांगला इलाज ! लेका, दरवेळीं फुशारकी मारतोस कीं, डोकं माझं अन पैसे तुझे! ते कांही नाही दिनानाथ; आठ एंट्रिज करितां मागे माझ्या जवळून घेतलेले ते चार रुपये टाक पाहूं आधी इथं.

अरविंद– चार रुपये द्यायचे तुला ? काय रे अरुण, प्रत्यक्ष प्रयोगाच्या वेळी स्टेजवर खरोखरच मीं ह्याला चार रुपये द्यायचे कां ?

अरुण– हो अर्थातच. तेवढंच हुबेहुब दिसेल ते.

अरविंद– मग आपण नाही बुवा हें काम करत.

अरुण– कां रे ?

अरविंद– ' नाटकांत लागणारं सामान ज्याचं त्यांनीच आणायचं' असं तूंच नव्हता का म्हणालास परवा.

अरुण– बरं मग ?

अरविंद– मग काय ? अरे, ह्याला नाटकांत द्यावे लागणारे चार रुपये माझ्या खिशांतूनच मला द्यावे लागणार कीं.-!!! नाटकांत काम करूनच्या करून वर हा चार रुपयांचा भुर्दंड कोणी सहन करायचा बुवा ?

अरुण– काय अजब माणूस आहेस अरविंद तूं ! अरे,

कितीही केलं तरी नाटक आहे हें. नाटक संपल्यावर काय हा चार रुपये तुझे तुला परत करणार नाही ?

अरविंद- आपला नाही बुवा विश्वास बसत ह्याच्यावर.

अरुण- बरं, मग मना असं केलं तर ? नाटक सुरू होण्याच्या आधीं तूंच ह्याला चार रुपये देऊन ठेव. तो तुला नाटकांत परत करीलच.

मनोहर- छे ! छे ! अरे अरुण मी का ह्याला ओळखत नाही ?— अन् हा लेकाचा जर माझ्यावर विश्वास ठेवीत नाही, तर मी तरी ह्याच्यावर कां विश्वास ठेवू ?— तरी एवढंही करून तुझ्या म्हणण्याप्रमाणे जर समजा मी ह्याला आगाऊ चार रुपये देऊन ठेवले तर नाटकांत कां होईना पण हा ते परत करील हे तरी कशावरून ? पैसे माझ्या हातावर ठेवण्याची वेळ आली की, हे राजेश्री स्टेजवरून पळायला देखील कमी करणार नाहीत…… छे ! छे ! आपण ह्याला एक दिडकी सुद्धा द्यायला तयार नाहीं.

अरविंद- बरं, तें जाऊं दे मना. तूं मला दिडकी देऊं नकोस. अन् मी ही तुला दमडी देत नाही. पण काय रे अरुण तेवढा भागच कट केला तर ?—

अरुण- शाब्बास ! तुमच्या रसिकतेपुढे तर आता आपण अगदी हात जोडलेत बुवा ! हें पहा अरविंद, तुमचा जरी एकमेकावर विश्वास नसला तरी माझा तुमच्यावर विश्वास आहे. नव्हे, ठेवणं भाग आहे. तेव्हा मीच तुला नाटक सुरू होण्यापूर्वी चार रुपये देऊन ठेवीन म्हणजे झालं.—

अरविंद- सुंदर ! छान ! ह्याला म्हणतात डोकं.— पण हें पहा अरुण, नाटक संपल्यानंतर पैसे वसूल करण्याची जबाबदारी तुझी तुझ्यावर रे बुवा. नाहीतर मागावून म्हणशील की……

अरुण- कांही म्हणणार नाही मागावून. मग तर झालं ? आता दुसरा प्रवेश.

वसंत- अरुण,— पण मला एक शंका आहे. पहिल्या प्रवेशांत ह्या दोघांचें भाषण चालू असतांना माझी एन्ट्री इकडून आहे. पण नंतर जातांना मी कुठून जायचे ? इकडून कीं तिकडून ?

अरुण- इकडून जा नाही तर तिकडून जा. पण वसंतराव, दुसऱ्या प्रवेशाला परत 'स्टेज' वर या म्हणजे झालं.—



वसंत- वा ! वा ! स्टेजवर येणार नाही म्हणजे …

अरविंद- तसं नाही. पण नाही तर तुम्ही … बसाल तिथं प्रेक्षकांत. तुमचं काय सांगावं !

अरुण- बरं, पुरे आतां ! पुढला प्रवेश ! … दुसऱ्या प्रवेशांत तूं परत ह्या प्रभाकरच्या … पैसे मागण्यासाठी येणार—अर्थात् ते तो … रतो—हं ! चला सुरू करा पाहूं आतां !

[ मनोहर आणि अरविंद पुन्हा नाटकाच्या … शांत बसतात… ]

मनोहर- छे ! छे ! दिनानाथ, शब्दकोड्यांसाठी … आता माझ्या जवळून पैसे मिळू … कल्पनाच तूं आता सोडून दे पाहूं.

अरविंद- काय म्हणतोस काय तूं हें प्रभाकर ! … शक्य आहे हें ? काळ्याकुट्ट मेघांनी सर्व … भरून गेलं असतांना देखील जलवृष्टी होणार … हें कसं संभवनीय आहे ?

मनोहर- दिनानाथ, तुझ्या ह्या कवित्वाची … भुरळ पडेल असं कदापिही वाटूं देऊं … आता मुकाट्यानं होतोस घराबाहेर की,…

अरविंद- प्रभाकर-प्रभाकर—!

अरुण- ( मध्येच ) कट्—! अरे अरविंद, ह्या … नाथ तुझा इतका अपमान करतो,—तुला … बाहेर घालवितो—निदान तेव्हा तरी … बोलण्यांत इतकी आर्द्रता पाहिजे, … इतकी तीव्रता पाहिजे कीं, ह्या प्रभाकरा… त्या प्रेक्षकांच्या अंतःकरणाला कसा पीळ … पाहिजे नुसता. पुन्हा कर.

अरविंद- ( आवाज चढवून ) प्रभाकर—प्रभाकर …

अरुण- छे ! छे ! आवाज उंच करण्याऐवजी … मानच उंच करतो आहेस कीं तूं.

वसंत- मान—आणि—पॅन्ट; दोन्हीही वर करा … बेटा…पण आवाज मात्र……

अरविंद- अे वश्या, तूं नकोस मध्ये चोंबडेपणा कर … तुझा आहे कां मोठा आवाज ?…

वसंत- हो. हो. चांगलाच मोठा आहे.

अरविंद- मग हें पहा, असं कर. नाटकाच्या वेळी … दे मला ' प्ले बॅक ' ओरडण्याच्या बाबतीत … इकडे नुसती मान वर करीन स्टेजवर … तिकडे तूं ओरड मागून… ' प्रभाकर—' …



मनोहर- हें पहा अरुण, या राजेश्रीला एका मुलाचं नांव घेऊन ओरडायचं आहे म्हणून घशाबाहेर धड आवाज देखील निघत नाही आज. तेंच मुलीच्या नांवाने ओरडायला सांगितलं.— म्हणजे पहा कसा ठणाण् कोकलतो ते. अरे ह्याच ' प्रभाकरच्या ' ऐवजीं एकादी ' प्रभावती ' असती तिथं, म्हणजे नसती पडली ह्यांना ' प्ले बॅक ' ची गरज.

अरविंद- तसं नाही रे बाबा. पण मी जर आत्तापासून असा गाढवासारखा ओरडायला लागलों -'प्रॅक्टिस' च्याच वेळीं,—तर ऐन नाटकाच्या वेळीं घसा नाही का बसणार माझा--?—

अरुण- अहो हें पहा— आज कांही तुम्ही हें नाटक करण्याच्या मनःस्थितींत दिसत नाही मला. तेव्हा नंतरच करूं हें आपण.

अरविंद- उत्तम-- उत्तम— ( जायला निघतात. )

अरुण- अरे पण माझं म्हणणं तर ऐकून घेशील कीं नाही सगळं ? ह्या ऐवजीं तुम्हाला ती परवाची… ' पवित्र बंधन '… ही नाटिका करावी लागेल आता. कबूल आहे कां ?

अरविंद- ती करायला कांहीं हरकत नाही रे… …पण त्यांतलं तें सुरवातीचंच वाक्य असं लांबलचक आहे, मालगाडीच्या डब्यासारखं,— तेवढं तूं म्हणून दाखव म्हणजे झालं.—

अरुण- नाटकाला फक्त तीन दिवस राहिले आता, आणि तुम्ही अजून आपले पहिल्या वाक्यावरच अडला आहांत कीं,--! बरं तो कागद आण पाहूं इकडे— आणि हें बघ, मी वाचून, दाखवितों तुला; - तूं नीट लक्ष दे हं. ( कागद वाचूं लागतो. )…… दोन मनांचं मीलन घडवून आणणारा--दोन जीवांना एकत्र आणणारा-- एक महान प्रसंग ह्या नात्याने लग्नाचं महत्व फारच मोठं आहे— ह्यांत शंका नाही. पण लग्नाला हा मोठेपणा कांहीं उगाच प्राप्त झालेला नाही. आपले माता-पिता-आणि बंधू भगिनी- ह्या सगळ्यांच्या प्रेमळपणाचा नाइलाजानं त्याग करून आणि मोठ्या कष्टानं तीं नातीं स्वतःला विसरावयास लावून ज्यावेळीं पुन्हा पुन्हा ती सद्गदित झालेल्या आपल्या आईच्या खांद्यावर मस्तक ठेवून ढळढळा रडते, त्याचवेळीं तो देखावा पाहून उचंबळून आलेल्या आपल्या मनाला 'स्त्री'च्या ह्या महान त्यागाची खरी किंमत समजते. स्त्रीच्या ह्या अद्वितीय त्यागांतूनच समाजाची एक विशिष्ट बांधणी तयार झालेली आहे आणि मनुष्य हा मनुष्य म्हणून घेण्यास पात्र ठरला आहे.

अरविंद- अरे ! ! हें काय वाक्य कीं, ब्रेनगन् मधून फटाफट बाहेर पडणाऱ्या गोळ्या —?— काय आहे तरी काय हें ?…… छे ! छे ! अरुण अरे असले ' सिरीयस ' प्रवेश कसे आवडतील रे लोकांना ? त्यापेक्षां मी म्हणतों एकादा विनोदी प्रवेश बसवा ना.

अरुण- तें ठीक आहे रे. पण विनोदी प्रवेश किनई फार कठीण असतात बघ.

अरविंद- हट्,- अरे- कठीण कसले आले आहेत ? वाटलं तर विनोदी पात्राची हमी मी घेतों- मग तर झालं —?— असा प्रेक्षकांना हंसवून सोडीन की पहातच रहाल तुम्ही.

वसंत- अरे पण अरविंद- प्रेक्षकांना हंसवून सोडविण्यासाठी तुला विनोदी प्रवेशाची रे काय गरज-?— स्टेजवर आल्यानंतर प्रेक्षकांकडे पाहून पॅन्ट एकदा अशी नुसती वर केलेस तूं कीं हास्याचे नुसते फवारेच उडतील बघ.

अरविंद ए. ए — तूं कां रे पण मघापासून आमच्यांत येवढी लुडबुड करतो आहेस ?— उगाच असा मधे मधे बोलत नको जाऊस हं— आवडत नाही मला ते.

वसंत- अहो महाशय, तुम्ही येवढी दादागिरी करतां आहांत, पण…ॲक्टिंग कशाशी खातात हें तरी ठाऊक आहे कां तुम्हाला ?

अरविंद- म्हणजे-? तुला काय वाटतं—मी कांही नाटकांतून कधी कामं केलीं नाहीत कीं काय ?-अरे, तूं तर ह्या फडतूस अरुणच्या फडतूस नाटकाचंच घेऊन बसला आहेस.—पण मागे एकदां आमच्या कॉलेजनं गॅदरिंगच्या वेळीं-' सत्यवान-सावित्री '- हें नाटक केलं होतं बघ. त्यांत तर मी ' हिरॉईन ' ची भूमिका केली होती.

वसंत- अं…; काय म्हणतोस,—' स्त्री पार्ट ' केला होतास तूं ! ' सावित्री ' चं काम केलं होतंस तूं ? नवलच आहे मोठं.

अरविंद- अरे हें तर कांहीच नाही. नवल तर ह्याच्या पुढेच आहे. नाटकांत ' सावित्री ' चं काम करण्याची आपली तयारी होती...पण त्यासाठी माझी एक जबरदस्त अट होती.—मी सावित्रीचं काम करणार होतों, पण—

वसंत- पण काय ?—सत्यवानाचं काम एकाद्या मुलीनं करावं अशी तुझी अट होती कीं काय ?

अरविंद- काय बोलतो आहेस काय तूं हें वश्या ? अरे मुली जर आमच्या बरोबर नाटकांत काम करायला तयार झाल्या असत्या तर...मीच नसतों कां ' सत्यवान ' झालों ? पण मुली नाटकांत काम करायला तयार नव्हत्या, बरं दुसरी मुलं कोणी सावित्रीचं काम करायला पुढे धजतील म्हणावं तर शपथ—! शेवटी प्रोफेसरांनी झक मारत आमची अट कबुल केली...!!

वसंत- खरंच ? पण तुझी अट काय होती रे ?

अरविंद- मी त्यांना सगितलं—हें सावित्रीचं काम करायला आपण तयार आहोंत...! पण वडील हयात असल्याकारणानं नाटकांत देखील मिशी उतरवणं आपल्याला जमणार नाही.

वसंत- मग ? मिशी ठेवूनच सावित्रीचं काम केलंस की काय ?

अरविंद- अरे ऐक तर खरं. ह्या मिशांच्या पायीं तर सगळा घोटाळा झाला पुढें. ऐन नाटकाच्यावेळीं मेक-अप झाल्यानंतर कुणीतरी आमच्या मिशा दिल्या उडवून.

वसंत- मग ?—

अरविंद- मग काय ? स्टेजवर गेल्यावर मिशा नाहीत हें जेव्हा माझ्या लक्षांत आलं; आणि वडिलांची ती रागीट मुद्रा जेव्हा कां माझ्या नजरेसमोर आली म्हणतां— तेव्हां स्टेजवरच मी रडून रडून जो आकांत केला— जो आक्रोश केला तो ऐकून प्रेक्षकांना वाटलं,— यमानं क्रूरपणें सत्यवानाला मारलं— म्हणूनच ही सावित्री ढळढळां रडते आहे. पाषाणहृदयीं यमाच्यां अंतःकरणाला दयेचा पाझर फोडण्यासाठी ही सावित्री दुःखाच्या हुंदक्यांचे सुरुंग लावीत आहे असा प्रेक्षकांना भास झाला. मग काय महाराज, नाटकांत मिळालं आम्हाला पहिलं बक्षिस आणि घरीं गेल्या[वर] वडिलांकडून दुसरं. तेव्हांपासून बक्षिस मिळवू[न] नाटकांत काम करणं सोडून दिलं आहे पहा आ[म्ही]

वसंत- हं— मग कांहीं प्रश्न नाही महाराज, तुम[च्या] ॲक्टिंगबद्दल.

अरुण- अरे कसली आली आहे ॲक्टिंग कपाळ[ाची] त्या यमापुढे जर हा असा ढळढळां रडला अ[सेल] तर त्या यमाला हसूं आलं असेल ह्याच्या रड[ण्यावर] आणि त्या हंसण्याच्या भरांतच त्याने सत्यवा[नाला] परत केलं असेल!

अरविंद- बरं ते जाऊं दे. ते विनोदी प्रवेशही [...] खड्ड्यांत....मीं किनई काल ऐतिहासिक नाट[...] कांही प्रवेश वाचले पहा. सुंदर आहेत ते. ते [...] तर ? तो पावन खिंडींतला बाजीप्रभू—

अरुण- ...आपल्या स्टेजवर कसा आणायचा ही[च] पंचाईत आहे. अरे ही ऐतिहासिक आणि पौरा[...] णिक नाटकं,— पोषाखाच्या नि देखाव्या[च्या] अभावीं करणं जमत नाही बघ. आणि म्ह[णून] असे कांही प्रवेश उत्तम असूनही गाळावे [लागतात] मला.

अरविंद- अरे अरुण, मग असं केलं तर ?— उत्सवांतले करमणुकीचे कार्यक्रमच गाळले तर [...]

अरुण- आता मात्र कमाल झाली हं अरविंद [...] अरे असे कसे रे तुम्ही लोक ?-- स्वतः [...] हानें पुढे येऊन करावंसं वाटतंच नाही का तुम्हा[ला] म्हणे, उत्सवांतले करमणुकीचे कार्यक्रम [...] तर ? बोलले.- बाळ्या बोलत नाही, बोलत [...] आणि बोलला तर म्हणे मांडवाला आ[...] लागत नाही ?--- ते कांही नाही, अरविंद '[...] कितीही ' सिरियस, असलं तरी आपण ते [...] करणार-- करणारच. चला. करा बरं [...] पहिल्यापासून--

अरविंद- काय म्हणतोस... पहिल्यापासून सुरवात[...]
( अरविंद कपाळाला हात लावून झटकन [...] बसतो, मनोहर त्याला उठविण्याचा प्रयत्न [...] येवढ्यांतच पडदा पडतो.-- )

( या एकांकिकेचा प्रयोग कॉलेजच्या स्नेहसंमेल[नांत] करून दाखविण्यांत आला होता. )

---



# दुःखाच्या शोधांत फिरणारीं माणसं

## ( लघुनिबंध )

ले :— कु. शकुंतला जोशी, ( द्वितीय वर्ष, कला विभाग )

' रविवारची लोकसत्ता ' आणली नाही म्हणून काका माझ्यावर खूप चिडले होते. " हिचं आपलं नेहमीचं ठरलेलं आहे. एक काम सांगितलं अन् वेळेवर झालंय असं कधी आठवत नाही. तरी जातांना तुला बजावलं होतं ना ग मीं ! पण तुमच्या त्या गप्पांच्या गलबल्यांत सांगितलेल्या कामाची आठवण रहायला पाहिजे ना ?"

" अहो पण काका........ "

" कांही बोलूं नकोस. तूं काय, बनवाबनवी करून मोकळी होशील. पैसेच नेले नव्हते, त्या बाजूला गेलेंच नव्हतें मी, एक अन् दोन ! सबबींना काय तोटा तुझ्याजवळ ? "

काकांचं बोलणं पुरं झाल्याशिवाय आपल्या बोलण्याचा निभाव लागणार नाही हें समजून शहाण्यासारखी मी गप्प बसून राहिलें, काका किती वेळ बोलत होते कुणास ठाऊक. पण त्यांचें रागावणें जरा थंड झाल्यावर मी बोलण्याचा धीर केला.

" काका, मला किनई, आजचा नवशक्तीचा अंक हवा होता. एक महत्वाचं व्याख्यान आलंय त्यांत. अन् नवशक्ति आणली म्हणून काय झालं ? वर्तमानपत्रांतल्या बातम्या काय निराळ्या असतात ? आजच्या दिवस वाचा नवशक्तीच "

झालं काकांचं बोलणं पुन्हा सुरू. बऱ्याच वेळानं माझ्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला. अस्सं ! काकांना ' साप्ताहिक भविष्यासाठीं ' लोकसत्ता हवी होती तर. माझी कुठलीच सबब चालण्यासारखी नव्हती. कारण काकांना पाहिजे असणारं भविष्य कांही नवशक्तींत नव्हतं. मी त्यांना न सांगतांच झटकन् बाहेर पडलें अन् लोकसत्ता आणून त्यांच्या हातांत दिली. झटकन्—पहिल्या पानावरची ठळक बातमी देखील न पहातां— त्यांनी भविष्याचं पान उघडलं अन् क्षणार्धांत मेष राशीचं भविष्य पाहण्यांत ते गर्क होऊन गेले. मधूनच ते आनंदानं बसल्या ठिकाणीच उडी मारीत किंवा रडवा चेहरा करून सारखे एकीकडे कुठे तरी पहात बसत.

मला इतकं हसूं आलं त्यांचं ! पण त्यांच्यासमोर अन् त्यांच्या या भविष्याच्या वेडाला हंसायचं ! बाप रे ! पुन्हा त्यांच्या तोंडाच्या तोफेच्या भक्ष्यस्थानीं पडावं लागलं असतं मला. मीं चटकन् तेथून काढता पाय घेतला. काका किती वेळ भविष्य वाचीत बसले होते कुणास ठाऊक !

मला खरंच कळत नाही, ही माणसं आपलं भविष्य जाणून घेऊन काय मिळवितात. बहुतेकांच्या वाट्याला, मला नक्की वाटतं, सुखापेक्षां दुःख येत असेल. या ज्योतिष्यांना काय ? एकदां ठराविक कांही तरी भविष्य वर्तविलं म्हणजे ते मोकळे होतात अन् वाचणारी माणसं मात्र ग्रहांच्या फेऱ्यांत सांपडून चिंता करीत बसतात. परवाच मीं एका भविष्यवेड्या माणसाची गोष्ट वाचली. त्याला म्हणे एका ज्योतिष्यानं सांगितलं कीं, अमुक अमुक दिवशीं मध्यरात्रीं तूं एका भयानक अपघातानं मरशील म्हणून. आपलं जीवन कुणाला नकोसं झालंय का कधी ? तो माणूस तरी त्याला अपवाद कसा असणार ? पण भविष्याचं इतकं वेड अन् त्यावर इतका गाढ विश्वास होता त्याचा की, त्या रात्रीच्या शेवटच्या क्षणापर्यन्त कांही एक अपघात झालेला नसतांना केवळ भविष्य खोटं ठरेल या भीतीनं त्यानं स्वतःचा खून करून घेतला. मला खरा तो एका भयंकर अपघातानं. भविष्य वर्तविणारा ज्योतिषी मात्र सुखानं झोंप काढीत असेल त्या रात्रीं. त्याला कल्प—

नाहि नसेल एका जीवाच्या हत्येला आपण कारणीभूत आहोत म्हणून. मग आता तुम्हीं सांगा, या माणसाच्या मूर्खपणाला हंसावं की रडावं ? किती नाहक प्राणास मुकला तो. बिचारा ! अपघाताची वाट तरी पहायची होती त्यानं. पण.........पण भविष्य खोटं ठरतं असतं तर ?

आमच्या शेजारीं एक माणूस राहतो. बिचारा असाच आहे अशिक्षित. त्याच्या भविष्याच्या वेडाचं खरंच मला इतकं कौतुक करावंसं वाटतं ! रोज फिरून घरीं येतांना त्याच्या बरोबर एकतरी उपटसुंभ ज्योतिषी असतोच. प्रत्येकाला तो, ' मला मूल कधी होणार ? ' म्हणून विचारतो अन् प्रत्येक ज्योतिषी त्याला तुला ' अमुक अमुक वेळीं पुत्ररत्न लाभेल.' असंच सांगतो. प्रत्येक ज्योतिष्याचं भविष्य खरं झालं असतं तर मला वाटतं त्याच्या घराचं आजपर्यंत गोकुळ झालं असतं. पण आजपर्यंत त्याला एकहि मूल झालं नाही. अन् तरीहि त्याचं हें वेड कांही सुटत नाही. मला अगदी दया येते त्या माणसाची. वाटतं त्याला सांगावं, 'बाबा रे, कशाला या भलत्या नादीं लागतोस ? ' पण म्हणतात ना ' आशा अमर असते. ' मला तरी काय करायचंय त्याला निराश करून ? पण कधी कधी मात्र त्याला खूप हंसतें मी.

विचार करून पाहिल्यावर वाटतं, त्याच माणसाला हसण्यांत काय अर्थ आहे ? बोलून चालून तो अशिक्षित. कुठल्याहि प्रकारचे संस्कार त्याच्या मनावर झालेले नाहीत. पण चांगल्या सुशिक्षित, सुसंकृत माणसांची तरी काय हीच कथा असते. माझा एक मामा आहे पुण्याला. चांगला बडा ऑफिसर आहे; पण त्यालाहि ह्या ज्योतिषाचं असं अनिवार वेड आहे कीं कांही विचारूं नका. त्याच्याकडे केव्हाही जा, तो सदा शनि, मंगळ, गुरु यांच्या फेऱ्यांत सांपडलेला असतो. ग्रहांपेक्षा हे ज्योतिषीच त्याच्यामागे लागलेले असतात. गांवांत कोणीहि नवा ज्योतिषी आला कीं, त्याचा पहिला आश्रयदाता आमचा मामा. अशा कितीजणांना आश्रय देऊन त्याने किती जन्मांची पुण्याई सांठवून ठेवली आहे कुणास ठाऊक ? यांतली कितीं भविष्यं खरीं झालीं आहेत असं त्याला विचारलं तर शोध करूनहि त्याला होकारार्थी उत्तर देतां येत नाही. कित्येकवेळा तो मला पत्रांतून त्याच्या ज्योतिषांनी वर्तविलेलीं भविष्यं [illegible] वितो. त्यात एक ज्योतिषी एक सांगतो तर [illegible] बरोबर त्याच्या उलट. म्हणजे एकानं जर सांगितलं [illegible] तुम्हाला झकपैकी प्रवासाचा योग आहे तर [illegible] सांगतो, ' प्रवास टाळा, तुम्हाला या महिन्यांत [illegible] आहे. ' तळीरामची वैद्यकीय तपासणी चालू [illegible] डॉक्टर अन् वैद्य यांच्या निदानांत जसं जमीन [illegible] नाचं अंतर होतं तसंच या ज्योतिषांच्या [illegible] असतं. मी त्याला ह्याचेच लेखी पुरावे सुद्धां [illegible] आहेत. पण दरवेळीं तो असं कांही उत्तर देऊन [illegible] करतो कीं, आपलं आइस्क्रीम कसं झालं नाही [illegible] विचार करण्यांतच माझा वेळ निघून जातो.

माझ्या नित्य परिचयांतच इतके भविष्यवेडे [illegible] कीं माझं अगदीं ठाम मत बनत चाललं [illegible] की, [illegible] माणूस, भविष्यावर थोड्याफार प्रमाणांत [illegible] ठेवतोच. कांही अगदीं उघड उघड, लपवाछप[illegible] प्रकार न करतां ठेवतात तर कांहीना भीति वाटते, [illegible] हंसतील असं वाटतं अन् म्हणून ते गुपचूप [illegible] भविष्य पाहातात. बाहेरून नास्तिकपणाचं प्रदर्शन [illegible] आपण इतरांहून वेगळे आहोंत असं भासवि[illegible] अनेक लोकांना रात्रीं लोकांच्या चोरून मारुतीला [illegible] करतांना अगर मुंजाला प्रदक्षिणा घालतांना मी [illegible] आहे. तीच गत ह्या चोरून भविष्यावर विश्वास [illegible] णाऱ्या लोकांची. आमचे अण्णाच नाही का ? [illegible] लोक त्या दिवशीं आमच्याकडे चहाला येणार, [illegible] आम्ही अण्णांनाहि बोलावणं धाडलं. पण त्यांचं [illegible] जरा काम आहे ' असं उत्तर आलं. मी [illegible] महत्वाचं काम आहे तें पहायला म्हणून [illegible] घरीं गेलें. तों त्यांचं आपलं एकच उत्तर. [illegible] दिवस नको, मग पुन्हा कधी तरी येईन. ' मी[illegible] त्यांचा पिच्छा सोडला नाहीं. शेवटीं, मोठ्या [illegible] वारीनं त्यांनी एकीकडे तोंड करून [illegible] " आज माझ्या राशींत अपघात आहे, [illegible] कर............" वगैरे वगैरे. [illegible] दाबून मी तेथून सटकलें. दुसरें दिवशीं [illegible] गेलें तर हे आपले सगळ्यांच्या चोरून, [illegible] कडच्या खोलींत ' आजचं भविष्य ' वाचीत [illegible] मी खोलींत प्रवेश करीत म्हटलं, ' काय अण्णा, [illegible] आहांत ना ? कालचं भविष्य खोटं ठरलेलं [illegible]



एकाद्या चोराला मुद्देमालासकट पकडलं असता त्याचा चेहरा कसा होत असेल याची मला त्या दिवशीं बरोबर कल्पना आली. कोणालाहि न सांगण्याबद्दल त्यांनी माझ्याकडून वचनहि घेतलं.

त्या दिवशीं तर काकांनी माझ्यावरच प्रयोग करायला सुरवात केली. ' तुझी रास कोणती ग बेबी ? " कांही माहीत नाही बुवा मला."—मीं म्हटलें.

" छेः बुवा ! काय तुम्ही ह्या पिढीचीं मुलं ! कॉलेजांत शिकतां अन् म्हणे रास माहीत नाही स्वतःची यांना. " -- काका म्हणाले. " कॉलेजांत राशिभविष्याचे पाठ नाही देत आम्हांला. " असं उत्तर अगदी ओठांवर आलं माझ्या. पण न जाणो आणखी कोणाकोणाचा उद्धार होईल काकांकडून या भीतीनं मी गप्प बसलें. काकांचं बोलणं चालूंच होतं कितीतरी वेळ. म्हणून मला कांही कांही वेळा इतकी भीति वाटते, न जाणो ही इतकीं भविष्यवेडीं माणसं माझ्या भोंवती पसरली आहेत कीं, एखादे दिवशीं मी शनि, गुरु, मंगळ यांच्या कचाट्यांत सांपडेल. मग पुढचीं भेसूर चित्रं मला दिसूं लागतात अन् भीतीनं गपकन मी डोळे मिटून घेतें.

अन् हे सारे ज्योतिषी अपुरे पडतात म्हणूनच कीं काय बाजारांतहि ठिकठिकाणीं कुंडल्या मांडून बसलेले ज्योतिषी मला दिसतात. त्यांची तर चंगळच असते. केवढी गर्दी असते त्याच्या भोंवतीं ! त्या दिवशीं मी अन् माझी मैत्रीण त्या गर्दींत घुसलोंच. एक माणूस ज्योतिष्याला नमस्कार करून आपलें भविष्य विचारीत होता. त्या ज्योतिष्यानं त्याच्या जवळून पैसे घेतले अन् आपल्या पाळीव कबुतराला समोर ठेवलेल्या पाकिटांपैकी एक उचलायला सांगून तें त्या माणसाच्या हातांत दिलें. त्या पाकिटांत लोकांचीं ' भविष्यं ' होतीं म्हणे. त्या माणसाच्या नशिबीं काय आलं तें पहायला मात्र आम्ही तिथं थांबलों नाहीं.

या साऱ्या भविष्यवेड्या लोकांना मला ओरडून सांगावंसं वाटतं, कां म्हणून विश्वास ठेवतां तुम्ही या कधीहि खऱ्या न होणाऱ्या भविष्यांवर ? आपला भविष्यकाळ उज्ज्वल करण्याचं सामर्थ्य अन् त्याकरतां लागणारी बुद्धि देवानं तुम्हाला दिली असतां त्याचं असं विकृत स्वरूप कां डोळ्यापुढें उभं करतां ! काय बरं आनंद मिळतो त्यांत तुम्हाला ? दैवांत असणारें झाल्याशिवाय रहाणार नाही हें जर तुम्हांला पटतं तर तें जाणून घ्यायची ओढ तुम्हांला का ? अज्ञानांत किती सुख साठविलेलं आहे याचा अनुभव घेऊन पहा. तुम्ही आनंदी बनाल. उगीचच आपलं भविष्य जाणून घेऊन आयुष्यांतल्या येणाऱ्या प्रत्येक क्षणाची चिंता करण्यांत काय अर्थ आहे ? " मला वाटतं जगांतलीं निम्मीं दुःखं या भविष्यवेड्या लोकांनीच उत्पन्न केलीं आहेत. भविष्याची चिंता करणं म्हणजे वर्तमानकाळाशीं— आपल्या परिस्थितीशीं बेइमानी करण्यासारखं आहे. या धकाधकीच्या काळांत आधीच सुख माणसाकडे पाठ फिरवून बसलं आहे. त्यांत उठल्या सुटल्या आपल्या भविष्याची चिंता करणारा माणूस जीवनांत आहे तेवढा तरी आनंद चाखूं शकेल का ? अन् असंच जर चालूं ठेवलं तर जीवनावर अन्याय केल्यासारखं होईल.

या साऱ्या भविष्यवेड्या लोकांच्या गर्दींतून मला एका झाडाखालीं निवांतपणें बसलेला उमरखय्याम दिसूं लागतो. त्यांच्या समोरच्या कागदावर भरभर शब्द उमटत असतात. मी जवळ जाऊन पहाते.

' मृत होय ' काल ' नी ' उद्यां ' अजून अज्ञात.
जर ' आज ' गोड किती प्रिति त्यांची करिशील ?

त्या ओळी ह्या लोकांना दाखवायला म्हणून मी येतें अन् ... अन् काय हीं सारी माणसं आपल्या कुंडल्या मांडून चिंताक्रांत बसलेलीं मला आढळतात.

आपला भविष्यकाळ उज्ज्वलच आहे अशी कल्पना करण्यांत किती सुख असतं. माझ्या भविष्याचे इमले उभारतांना मी इतकी तन्मय होतें कीं क्षणभर या जगाचाहि मला विसर पडतो. अन् या साऱ्या भविष्यवेड्या लोकांची कींव येते अगदीं !

माणूस सुखाच्या शोधांत फिरतो म्हणतात. मी तरी या भविष्यवेड्या लोकांना ' दुःखाच्या शोधांत फिरणारीं माणसं ' असंच म्हणणार ! मग लोकांनी कांहीहि म्हटले तरी चालेल.

---

# दी भारत एजन्सीज्

महात्मा गांधी रोड
जळगांव पू. खा.

३१, फोरबस् स्ट्रीट,
कीर्ती बिल्डिंग, मुंबई

स्लाव्हीया, स्कोडा, नॅशनल, रस्टन, इंग्लिश पीटर, जर्मन ड्युज, यानमार, डायहात्सू, सॅन्डर्स, क्रेज, इत्यादि सर्व प्रकारचीं लहान मोठीं
डिझेल एन्जिन्स
: तसेंच :
पॉवरीन व केरोसीन तेलावर चालणारी, जॅप, सी. एम्. सी., वीसकॉन्सीन, मार्लो ऑटोडीझल इत्यादि कंपन्यांचे फिरते पंपिंग सेटस्
" BRYCE " कंपनीचे फ्युएल पंपस् व नॉझल्स वरील सर्व प्रकारच्या एन्जिन्सचे स्पेअर पार्टस नेहमी तयार मिळतात.
" गार्डनर डेन्व्हर " कंपनीचे अमेरिकन सेन्ट्रीफ्युगल पंपस्, रबरी होस पाईप, चक्क्या, रबर बेल्टींग, पुल्या, व इतर सर्व प्रकारची शेतीकरितां लागणारी आधुनिक उपकरणे यांचे खानदेशांतील एकमेव विक्रेते.
आमच्या भव्य शो रुमला भेट द्या.




# बग्याचा रोमान्स

लेः— राजा वायकोळे ( चतुर्थ-वर्ष, कला-विभाग )

कॉलेजमध्ये बग्या म्हणजे आमची अेक मोठीच करमणूक होती. प्रोफेसरांचा ' त्रास ' केव्हां संपतो आणि बग्याची मजा केव्हा करायला मिळते असं आम्हाला होऊन जात असे. कांहीं म्हणा, बग्यामुळे कॉलेज जीवनाला रंग चढला होता यांत शंका नाही. आमच्या कॉलेजला कॉलेज ब्ल्यूची मोठीच चणचण होती, ती बग्याने पूर्ण भरून काढली आणि आमचें कॉलेजचें जीवन बरेंच सह्य केलें. बाकी बग्या कधीं कॉलेज हिरो झाला असता हें आम्हालाच काय पण त्याच्या जन्मदात्या माता-पित्याला देखील वाटलं नसेल. एक गरीब सालस मुलगा म्हणून ते त्याची वाखाणणी करीत तर आम्ही पट्टीचा ' तात्या ' म्हणून त्याची टिंगल करीत असूं.

पण जीवनाला कोड्याची उपमा देणारा खचित प्रगल्भ बुद्धीचा प्राणी असला पाहिजे, तर मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात या म्हणीचा शोधक तितकाच निर्बुद्ध असला पाहिजे, असं बग्याचं कॉलेजचरित्र ऐकल्यावर तुम्ही निश्चित म्हणाल.

आणि जीवनाची मजा त्याच्या गूढतेंत आहे हें कांहे खोटं नाही.

आमची आणि बग्याची ओळख झाली इंटरच्या वर्गांत. आणि ती सुद्धा कशी तर त्याची टिंगल करून. त्यावेळचा बग्या म्हणजे अेक साध्या कापडाचा धुतल्या मुळे सुरकुतलेला लांब्या बाह्यांचा शर्ट घातलेला-पांढरी लांब विजार आणि शंभर नंबरी रेझरनी तुळतुळीत केलेल्या गोट्यावर काळी टोपी घालणारा ' आबा ' होता. कावरी बावरी नजर, घाईघाईंत चालण्याची तऱ्हा आणि प्रश्नाचें उत्तर देतांना ' झोक तोल तोल ' प्रमाणे होणारा अंगविक्षेप ! प्रोफेसरांपासून पोरीपर्यंत तो विनोदाचा विषय होऊन बसला होता. विद्यार्थ्यांत मिसळण्याचें कधी त्याने धाडस केलं नाहीं की पोरीशी बोलण्याचं तर राहोच पण चोरून पहाण्याचं देखील पाप केलं नाही.

इतका सच्छील प्रवृत्तीचा मुलगा परंतु त्या बिचाऱ्याला अेक छळणारा शनी आमच्या दोस्तांत होता. तो म्हणजे रंग्या पुटपुटे ! प्रोफेसरांचं लक्ष नाही हें पाहून रंग्या खुशाल त्याची टोपी काढून त्याचा गोटा कुठे गोंजार, तर त्यावर तबल्याचा प्रयोग कर किंवा उगीचच पेन्सील त्याचेवर घासून तिला टोंक आणण्याचा आव कर, केव्हा केव्हा खिशांतले फुटाणे नेम धरून त्या डोक्यावर टचाटच मार असे अनेक प्रयोग करून त्याला भंडावून सोडी. बिचारा बग्या हें हंसतमुखानं सहन करी.

अेके दिवशीं तर रंग्याने कमाल केली–बग्या मुलांचा त्रास चुकवण्याकरता मुलीच्या बाकामागे बसला होता. कारण तो बाक प्रोफेसरांच्या जवळ असल्यामुळे तितकासा त्रास तिथे होत नसे. रंग्याही त्याचे शेजारीं बसला होता. परंतु रंग्याने त्या दिवशीं त्याला कांही अेक त्रास दिला नाही याचेंच आम्हाला आश्चर्य वाटलें. तास सुटला आणि प्रोफेसर निघून गेले. विद्यार्थिनी जाण्यास निघाल्या–तों काय–मुला–मुलींत हास्याचा प्रचंड कल्लोळ उठला. ... नेहमीं गंभीर नि विचारशील दिसणाऱ्या एका मुलीच्या पदरला बग्याच्या सदऱ्याची गांठ मारून ठेवलेली. बग्या तर त्यामुळे गोंधळून गेलाच पण ती पोरगी सबंध आयुष्यांत जितकी लाजणार नाहीं तितकी त्या दिवशीं लाजली.

परंतु त्या प्रकारानंतर बग्या उरलेल्या फर्स्ट टर्मला हजर राहिला नाही. तो कुठल्या गांवाला गेला हेंही पण कळलं नाही. – आम्हाला त्याचा विरह मात्र चांगलाच जाणवला.

x x x x

दुसरी टर्म उजाडलीं आणि कॉलेज नियमित सुरू झालं. आणि काय आश्चर्य ! बग्याची न ओळखूं येणारी स्वारी वर्गांत हजर. नीट कापलेले केस पोमेड लावून

चापून बसवले होते, चष्म्याला सोनेरी फ्रेम, खालीं वूलनचा काळा सूट व वर सिल्कचा कडक इस्तरीचा शर्ट, हातांत सुंदरसं घड्याळ, पायांत पॅालिश केलेला बूट व वर बूटमोजे-अगदी अपटुडेट ! सारं कॉलेज आश्चर्यानं थक्क झालं. मुलं अकमेकांना नेत्रखुणा करायला लागली तर मुलींचे नेत्रबाण त्याचेवर पडूं लागले ! त्याची इतकी छाप पडली कीं रंग्यालासुद्धा त्याची चेष्टा करायची छाती झाली नाही.

त्या दिवशीं सायंकाळीं आम्ही दोस्त त्याचे खोलीवर कॉफी उकळण्यासाठी गेलों. तों काय आश्चर्य ! त्याच्या खोलीचा कायापालट नेत्रोद्दीपक भासला. पलंगा वरच्या गादीवर हिरव्या चौकटीचा बेडशीट—मेजावर सुंदर टेबल क्लॉथ, भिंतीवर 'लेस्ली हॉवर्ड' ह्या 'रोमिओ ज्युलिअेट' फेम आंग्लचित्रतारकेचा भव्य फोटो टांगला होता. बाजूचे भिंतीवर काश्मिर, स्वित्स-लॅंडमधील सुंदर निसर्गदेखाव्याच्या तसबिरी—सारी मांडणी अगदी कलात्मक होती. रंग्याने कॉफी पितां पितां मेजावरील पुस्तकें पाहिली 'How to win friends and influence people', 'Gentle art of dealing with fair sex' हें सारं पाहून आम्ही थक्कच झालों.

रात्रीं झोपायचे वेळीं देखील बग्या विषयीचेच विचार आमच्या चर्चेचा विषय होता. शेवटीं 'आपल्या कॉलेजांतील विमल कर्वे या कॉलेजसुंदरीशी बग्याला स्नेह करायला सांगायचे म्हणजे आपल्यालाही जास्त मजा मारण्याची संधि मिळेल असा आम्ही बेत केला. दुसऱ्या दिवशीं ही कल्पना त्याला सांगायचे अगोदरच आमचा इच्छित हेतू पूर्ण होत असलेला दिसला.— बग्याची स्वारी विमल कर्वे जवळून पपप, टटट करीत नोटस् Exchange करतांना दिसली ! आम्हाला समाधान वाटलं. अवढी बनेल पोरगी पण बग्याच्या रुबाबापुढं फिकी पडली. प्राण गेला तरी कुणाशी बोलायची नाहीं, उलट कांही विद्यार्थ्यांची टर उडवायला तिने कमी केलं नव्हतं. विद्यार्थ्यांशी भांडण्यांत पटाईत. अॅटम बॉंब नुसता ! कॉलेजला मोठ्या तोऱ्यांत मोटर सायकलवरून यायची आणि तुच्छतापूर्वक मुलांकडे पहात Ladie's Room मधें जयाची.

अेका व्यक्तीमध्ये मात्र ती 'इंटरेस्ट' घेत ती म्हणजे पालीचा तो गोरा नि छकड्या प्रो त्याच्याशी ती पालीच्या अडचणी विचारत दुसऱ्या कांही...! पण बग्याने त्याला प्रतिस्पर्धी उभं राहाण्याचा चंग बांधला—नि आम्हाला वाटलं. आम्ही बग्याला उत्तेजन देऊं लागलों आम्हाला 'फिस्टा' देऊं लागला.

साऱ्या कॉलेजचा नूर पालटला. त्या कर्वेचं आणि बग्याचं नियमित बोलणं, फिरणं, सुरू झालं. कधी कधी दोघं अम्पायर हॉटेलच्या चढतांना दिसूं लागली विमल बग्याचे आम्हाला पडूं लागली. पाली प्रोफेसरपेक्षा ती बग्याशीच बोलूं लागली इंग्लिश व अमेरिकन पुस्तकांतील त्याने चांगलेच अवगत केलेलें दिसलें.

या सर्व गोष्टींचं कर्वेच्या मैत्रिणींना मोठं वाटलं. नि अेकीनं विचारलं देखील— 'काय ग त्या टटट, पपप करणाऱ्या 'रामशास्त्री' नारायणाशी काय दोस्ती केलीस? कांही विशेष

"तसं कांही नाही ग, त्याच्या नोटस् होत्या म्हणून मागितल्या तर त्या दिवसापासून लागली चिटकायला ! बरं आपल्याला गरज घ्यावं लागतं त्याच्या कलानं." पण तिच्या मैत्रिणी पटलं नाही व कांही तरी पाणी मुरतंय निश्चित वाटूं लागलं !

X X X

असेच पुष्कळ दिवस मजेंत गेले. बग्या सिगरेटच्या' धूम्रवलयांत मोठ्या बढाईनं "मी जिंकलों ! मी जिंकलों ! आता बघा उडतों कीं नाही !— अशी काय लागूत अरे आपण पोरं हिंमत करीत नाही तोंवर

"मग थोड्याच दिवसांत तुझ्या ओठांवर तिच्या गालांवरचा गुलाबी तर !" रंग्या वात्रटपणें म्हणाला.

आम्ही खदखदां हंसलों व वाटलं जिंकणार ! अेके दिवशीं आमच्या कानावर बातमी

अेका रविवारीं बग्याने तिला साडेसातला 'हनीमून पार्क' मधे भेटण्याचे आमंत्रण दिलं, तें आनंदानं स्वीकारलं !



शहराच्या मध्यभागांतील ती बाग अतिशय रम्य होती. प्रेमी युगुलांचं तें मीलनाचं ठिकाण होतं. तेथील बाक हे गर्द हिरव्या वेलीच्या मांडवाखाली ठेवले होते. अेका बांकापासून दुसरा बांक कधीं दिसत नसे. प्रवेश द्वारांच्या दिव्यांचा फक्त अंधुक प्रकाश तेथपर्यंत जाई. मधल्या कारंज्यांत 'ओलेती' स्त्रीचा पुतळा होता. साऱ्या सुगंधी फुलांनी वृत्ती नुसत्या मोहरून यायच्या !

ठरल्याप्रमाणे कर्वे अगोदरच तिथं जाऊन बसली व बग्याची ती सारखी वाट पाहूं लागली.

इकडे बग्याने सारी साग्रसंगीत तयारी केली. अतिशय झोंकदार पोषाख केला. आरशापुढे उभं राहून तिच्याशी बोलण्याच्या भाषणाची तालीम केली. पुन्हा अेकदा केसांवरून हळुवार कंगवा फिरवला. चेहऱ्यावरील भाव पुन्हा पुन्हा न्याहाळत गुणगुणूं लागला—

'जादू भरे नयनोंसें दिल होगया दिवाना
मैंने तुझे दिल देके जीत लिया तेरी कसम'
जादु भरे.........

चेहऱ्यावर झक्पैकीं स्नो पावडर — ओळखूं येणार नाही अशा बेताने फासली— निरनिराळ्या पोझेसमधे उभं राहून परत आरशांत बघितलं आणि परत गाण्याची लकेर छेडली—

'पंछी बन मे पिया पिया गाने लगा
सखी हाथोंसे दिल मेरा जाने लगा।'

सगळीकडे त्याला वसंत दिसूं लागला. त्याने घड्याळांत पाहिलं आणि त्याच्या कोकिळेला साथ देण्यास निघाला—

रविवारचा बाजारचा दिवस ! रस्ता नुसता फुलून गेला होता. भेळवाले -- खेळणीवाले ओरडत होते पण त्याला त्याची दाद नव्हती.

जगाचा गलबला
जगांत सोडून
नादांत अगम्य
टाकीत पावला
बेहोष चालला !

त्याच्या डोक्यांत सारखे हेच विचार सुरू होते. गेल्याबरोबर प्रथम आपण काय करावं ? तिची थोडीशी गंमत करायला हवी. नि लगेच अेक गोड कल्पना त्याला सुचली--

हळूंच तिच्या मागून जावं नि तिचे डोळे झाकावे आणि नंतर ती हात सोडवण्याचा प्रयत्न करून म्हणेल—

'प्रीत कभी छिपकर नहीं रहती
दिलकी बात नजर ही आजाती।'

किंवा कदाचित 'काढ सख्या गळ्यांतील तुझे चांदण्याचे हात' असं म्हणेल !

ह्या कल्पनेने त्याच्या चेहरा फुलला. त्याला दुरूनच विमल बांकाला पाठ टेकवून बसलेली दिसली. तो तिचे पाठीमागून हळू हळू जाऊं लागला...

विमल समोरील रस्त्याकडे पहात होती. सारखी तीं विचार करीत होती— 'अजूनि कसा येइना
जिवाचा जिवलग माझा !

इतक्यांत तिच्या गळ्यांत हातांचा विळखा पडला. आणि काय ! साप चावल्याप्रमाणे ती किंचाळली—'मेल्या बेशरम...दुसऱ्याच्या बायकोच्या अंगावर हात टाकायला लाज नाहीं वाटत ? पकडा पकडा हो ह्या निर्लज्जाला." ती मोठमोठ्याने ओरडूं लागली.

बग्या गर्भगळीत होऊन धूम पळूं लागला. 'पकडा पकडा' अगदी अेकच गिलका सुरू झाला. बाजूच्या लोकांनी त्याला फाटकापाशीं घेरले. आणि काय चमत्कार ! पालीचा प्रोफेसर नि विमल कर्वे त्या गर्दीत बग्याला दिसलीं. आणि त्यांना पाहून तर 'अेक दिलके टुकडे हुअे हजार' अशी बग्याची अवस्था होऊन गेली!

दुसरे दिवशीं आम्हाला कळलं कीं कर्वेने आपल्या मोलकरणीला तिथें बसवून ठेवलं होतं नि स्वतः प्रो० दिघ्यांबरोबर बाजूला लपून राहिली होती.

'स्त्रीजात तेवढी निमकहराम ! विधात्या, कशाला या सुंदर जगांत ही हरामखोर जात पैदा केलीस ?" असं 'पुण्यप्रभाव' मधील सुदामच्या आवेशांत म्हणत बग्या एखाद्या कम्युनिस्टाप्रमाणे का फिरत असतो त्या मागील रहस्य हें आहे.

# असोशिएटेड ट्रेडर्स

**महात्मा गांधी रोड, .... जळगांव पू. खा.**

नॅशनल एको, इंग्लिश एको, मुलार्ड वगैरे मेकचे सर्व प्रकारचे रेडिओज्,

**सर्व तऱ्हेचे इलेक्ट्रीकचे सामान,**

लॅाऊडस्पीकर्स, जनरेटर्स, इत्यादिसाठी आमचेकडे पहिल्यांदा

**चौकशी करा अगर समक्ष भेटा.**

***एकवेळ अनुभव हीच खात्री.***



# पी. एस. जी. इन्डस्ट्रियल इन्स्टिटयुट

**कोइमतूर यांची**

— सर्व प्रकारची शेतकी अवजारे —

उसाचे चरक, पंपस्, नांगर, उफणणी यंत्रे, प्रेरणी यंत्रे वगैरे सामान

तसेंच " क्रुसॉनु " जपान ऑईल इंजिन इत्यादिसाठी

भेटा अगर लिहा—

**डेक्कन इन्जिनिअरिंग ॲण्ड ट्रेड सर्व्हिसेस**

गणेश बिल्डिंग, माहिजी बाजार,

**जळगांव पू. खा.**




# वखार— ( लघुनिबंध )

लेखक:— द. वि. वाणी ( प्रथम वर्ष कलाविभाग )

माझ्या खोलीशेजारी एक वखार आहे. माझ्याकडे येणारी प्रत्येक व्यक्ति " श्री. बढे यांची जळाऊ लांकडांची वखार; येथे जळाऊ लाकूड स्वस्त व किफायतशीर भावाने मिळेल—" असं लिहिलेली फळी वाचतेच वाचते! किंबहुना त्यांचे डोळे आपोआप तिकडे वळतात. ती फळी वाचल्यावर, येथून लांकडं विकत घ्यावी असा विचार एकाच्याही डोक्यांत येत नाही ती गोष्ट निराळी! पण नवीन पाट्या दिसल्या कीं आपण नकळत वाचतोंच त्या! पोथ्यापुराणांवरील व देवादिकांवरील विश्वास उडाल्यामुळे निष्काम भक्तीने निर्गुणोपासना करायला ह्या पाट्या बऱ्या आहेत बिचाऱ्या, नाहीं? हें इतरांच्या बाबतींत ठीक आहे, पण ही वखार तर माझी शेजारीण! बहुतांशीं आजकाल लोक आपल्या घरांतील आंतील भागाचं दर्शन आपल्या शेजाऱ्यांना होऊं देत नाही! अशा प्रकारचा दुष्टपणा आमच्या शेजारिणीच्या अंगीं खास नाही हं!

अभ्यासांत मन लागत नसलं, शहरांत हिंडायचा कंटाळा आला असला कीं मी गॅलरींत उभा रहातों. अर्थातच माझ्या डोळ्यासमोर ह्या वखारीशिवाय दुसरं कांही नसतं. प्रथमच मला त्या वखारींतील टेबलखुर्चीचं दर्शन घडतं. सर्पणाचा स्टॉक जर संपला तर तो वखार मालक या टेबलखुर्चीस, अगदी सर्वसाधारण लोकांच्या भावांत विकावयास मागेपुढे पहाणार नाही इतकी त्याची ' सर्व्हिस ' आहे. टेबलावर एक वही, व जिच्यांत शाई नाही अशी दौत पडलेली असते. टांक आपल्या मूळ जातिबांधवांच्या घोळक्यांत दडी मारून बसलेला असतो. अशा स्थितींत मालक त्या वहीवर कधी लिहितो कुणास ठाऊक! नंतर या टेबलखुर्चीचे बालपणापासून असलेले सहवास-सोबती दृष्टीस पडतात. व ते म्हणजे कांटा, पारडीं, आणि वजनें! हे सारे तीसचाळीस वर्षांपासून मालकाची सेवा करीत असावेत. यांच्यांत संपवाला कम्युनिष्ट निर्माण नाही झाला अजून!

पण उदारमनाचे शेटजी त्यांना वर्षांतून आठ दिवस रजा देतात सरकारी अधिकारी कांटें, वजनें, तपासायला येतात तेव्हा! हे सारे सामान त्यानं मागच्या जन्मांत विकत घेऊन ठेवलें असावें! गृहस्थाश्रमांत पदार्पण करणारे नवविवाहित तरुण-तरुणी लवकरच सर्व सोयींनी सुसज्ज माडी पहावयास लागतात! कां? तर म्हातारड्यांची बिगार नको! आणि घरांतील जुनीपुराणी भांडीकुंडी बायाच (कारण पुरुषांना वेळ नसतो अन् बायांना धीर नसतो.) बाजारांत जाऊन कमींत कमी किंमतींतही विकून येतात. अशा जमान्यांत या जुनाट सामान बाळगणाऱ्या विशाल मनाचं कौतुक वाटतं!

आणि नंतर ते लाकडांचे मोठमोठे ढीग दिसतात. त्यांचे ते अक्राळविक्राळ आकार पाहून प्रथम प्रथम तर भीतीच वाटे मला! अशा ठिकाणीं एखादी विस्तवाची ठिणगी आली तर? वखारीचा मालक विमा उतरविण्यास चुकला नसेलच, पण आजूबाजूच्या घरवाल्यांचं अतोनात नुकसान होईल. पण असं सहसा घडणार नाही अशी माझ्या मनाची मी समजूत घालतों. तरीही मनांत शंका येते, " कुणी सांगावं, काळाच्या तडाख्यांत......... एक दिवस......... " नकोच ती कल्पना!

मालक नेहमी आपल्या नोकरांकरवीं इकडची लाकडं तिकडे अन् तिकडची इकडे करतो. त्यावेळीं मला तर अशुद्ध व्यवहाराचा संशय येतो! देशी तुपांत डालडा किंवा दूधांत पाणी मिसळलें आहे कीं काय हें पहाण्यासाठी अधिकारी नेमणाऱ्या म्युनिसिपालिटीने धावड्यांत खैर किंवा खैर जातीच्या लाकडांत बोरीचें लाकूड मिसळलें आहे की काय हें तपासण्यास अधिकारी कां नेमूं नये? कां शहरांतील लोक भूगोल शिकलेले आहेत तेव्हा त्यांना लाकडाची जात ओळखता येत असेल असा म्युनिसिपालिटीचा कयास आहे? अर्थ-

शास्त्रज्ञ श्रीमंत असलाच पाहिजे असं म्हणण्यासारखंच होईल असा कयास करणं म्हणजे ! हो ! शहरांतील लोकांना फुलांच्या अन् फळांच्या जाती ओळखायला सांगा ! या ' ठोकळ्यांच्या ' जाती ओळखायचो त्यांना काय गरज ? त्या ओळखायचें काम, तो बघा वखारीच्या मागील बाजूस लाकूडतोड्या आहे, तो अचूक करील.

त्याच्या हाताचे नि पोटऱ्यांचें काय पिळदार स्नायु आहेत ! अन् छाती तरी काय भक्कम ! आणि त्याच्या बांधेसूद शरिरावरून निघणाऱ्या धारा ! त्याच्या श्रमामुळे प्रसन्न होऊन त्याच्या शरिरांतील देवाचा अंश त्याला आंतून अभिषेक तर करीत नाही ना ? पण छे ! जो देव त्याला पोटभर भाकरी देत नाही तो अन् त्याच्यावर अभिषेक करील ? अशक्यच ! उलट त्याचें दुःख व्यक्त करण्यास दोन डोळे अपुरे असल्यामुळे त्याला विधात्याने ' असंख्याक्षणा ' केलं असावं अन् आपल्या या असंख्य डोळ्यांवाटें अश्रू ढाळून आपलें दुःख जगांस दाखवीत असेल. हा लाकूडतोड्या मणोंगणती लांकूड फोडतो. अन् ते फोडतांना उडालेले झिलपे गोळा करून ठेवतो. शेटजी कुठे बाहेर गेले कीं त्याची मुलगी येऊन ' झिलपेहरण ' करते. रानातून लांकडं आणायची म्हटली तर त्याची इकडे मजुरी जाते म्हणून त्याला हा मार्ग पत्करावा लागतो. शेटजी आल्यावर विचारतात, " झिलपे कमीं कां ?" अन् गरिबीने लाचार झालेला लांकूडतोड्या उत्तर देतो, " चाय पी रहा था तबतक लडके आये और झिलपे लेके भाग गये." मग मालकाचा राग घालविण्याकरता तो गिऱ्हाईक पटविण्यांत मालकांस मदत करतो. "लकडी सुकीसड है, बिनधोक ले जावो. " असं करण्यांत तो एका दगडांत दोन पक्षी मारतो. एक म्हणजे मालकांस खूष करतो व दुसरं म्हणजे तेवढीच त्याला विश्रांती मिळते. " एकच भाव " या आपण लावलेल्या फळी-प्रमाणे आपल्याला पैसे मिळाले या आनंदांत शेटजी आपला राग विसरून जातात.

लांकूड मोजल्यावर गिऱ्हाईक मालकांस पैसे देतो, अन् पुढच्या तयारीस लागतो. आणि ती म्हणजे लांकूड घरीं पोंचविण्याची व्यवस्था करणें. गिऱ्हाईक नेहमीचेच असेल तर तो तेथेच असलेल्या एकदोन मुलांना गाडी भरावयास एकदम सांगतो. पण नवशिक्या असला ... त्या मुलांनी मागितलेले पैसे देण्यास कचरतो. ' ... स्वतः घेऊन जाईन, आपल्याला कामाची लाज कशाला ! ' अशा स्वावलंबनाच्या बाता मारायला लागतो. पण ... पोरांनी मानसशास्त्राचं ( अर्थातच गिऱ्हाईकांच्या ) ... अनुभवाने मिळवलेलं असल्यामुळे ते या ' देशभक्तांच्या ' बातांवर विश्वास ठेवीत नाहीत. तो गिऱ्हाईक ... लांबही असलं तरी जवळ असल्याचं सांगतो तर ... जवळ असलं तरी ती मुलं लांब असल्याचं सांगतात ... शेवटीं गिऱ्हाईक लवादाकडे अर्थात शेटजीकडे जातो ... गिऱ्हाईक सर्वसाधारण असला तर शेटजी, " ... त्यांचे रेट ठरलेले आहेत." असं सांगून त्याची बोळवण करतो. तर एखादा पोलीस असला तर " ले जाओ ... नजीक तो है. " असं सांगून त्यांचाही सौदा पटविला ... अन् अंडरवेअर व हाफपँटस् घातलेली अन् तोंडात ... विडी असलेली ती छचकडी सरपणाची ती गाडी ओढ... तात. सरपण टाकून आल्यावर मालक त्यांना बारीक... रीक कामें सांगून आपली दलाली ( गिऱ्हाईकांचा ... त्यांचा सौदा पटविण्याची ) वसूल करून घेतो. ... निष्ठूर असतात हे लोकं !

त्यांच्या निष्ठूरपणाचे कित्येक दाखले देतां येतील ... कोणी सणाच्या दिवशीं मेला, त्याच्या नातेवाईकांना ... सामान्य माणसांना कितीही वाईट वाटत असलं तरी ... वखारमालकांस आनंदाच्या गुदगुल्या होतात. ... एक गाडी सरपण खपते ! व तेंही जास्त किंमतीला ... कोणी कितीही गरीब असो, हा अशावेळी पावलं... कमी घेणार नाही. दोनचार बोडकीं माणसं दिसली ... याने भाव वाढविलाच समजा ! ... दिवशीं असे गिऱ्हाईक आला ... नाही तर आपल्या कमाईतील अपूर्णता त्याला ... कोणाच्या मृत्यूची बातमी ऐकल्यावर " वाईट ... हो " असे उद्गार तोंडांतून काढतील. पण ... मनाचा ठाव घेतला तर ? आनंद !! असे हे ... हृदयीं मालकलोक असतात. पण त्यांना कल्पना ... कीं, एखाद्याच्या मृत्यूमुळे आपलं जें सरपण ... जातं अन् अपणास दोनचार रुपये मिळतात ... आपण आनंद मानतों तेंच सरपण आपल्या देहाची ... राख करणार आहे !!



पण त्या वखारीच्या मालकाचीच गोष्ट कशाला ? मजुरांना पिळवटून श्रीमंत होणारे गिरणीमालक, कुळांचें रक्त शोषून पुष्ट होणारे जमीनदार यांना तरी आपल्या या भवितव्याची जाणीव कुठे असते ? ' आगगाडी व जमीन ' या कुसुमाग्रजांच्या काव्यांतील आगगाडी प्रमाणे त्यांना तरी जमिनीचें आक्रंदन कुठे ऐकूं येतें ? पण शेवटीं जमीन संतापाने थरारूं लागल्यावर

उलटी पालटी होऊन गाडी ती
हजार शकलें पडलीं खालतीं !

अशी ज्याप्रमाणे गाडीची अवस्था झाली तशीं आपली होण्याचा संभव आहे ही त्यांना वेळीच जाणीव झाली तर ?

छे ! पण असं झालं तर या वखारींतच स्वर्ग निर्माण व्हावयास कितीसा उशीर ?

---

★ संसार म्हणजे एक धकाधकीचा खेळ आहे. त्यांत लागायचंच, खरचटायचंच, पडापडी व्हायचीच. एखादे वेळेला जखमसुद्धां व्हायची. पण म्हणून चिडून तो खेळ टाकून का शहाण्या माणसांनी जायचं ? नव्हे, उलट, आणखी उत्सुकतेनं, वाढलेल्या ईर्षेनं, आणखी विस्तृत दृष्टीनं त्या खेळांत घुसलं पाहिजे. असं केल्यावर सुखासाठी अरण्यांत जायला नको, तें सदैव आपल्याजवळच आहे.

—ना. सी. फडके

## हवीस मज तूं—

हवीस मज तूं, तशीच अगदी
साधी भोळी निर्मल बाला
अनुभूतीचा हात जोंवरी
अजुनी तुजवर नाही पडला

हवीस मज तूं, तशीच अगदी
मुग्ध कोवळी कळी उमलती
अनुभूतीच्या मादकतेची
जोंवर झाली नाहि संगति.

हृदय तुझें निष्पाप तशी तनु
वदन तुझें निर्व्याज, तसें मन
दुरावलिस तूं मला तेंधवा
अनुभूतीचा येता तो क्षण

मला पाहुनी दूर राहसी
नयनवचांनी उत्तर देशी
हृदय परी तळमळतें माझें
पाहुनि तव ही नव मखलाशी

स्वर्गांतिल तूं मूर्ति अप्सरा
जरी आज झालीस मेनका
सहवासाच्या तुझ्या, मोहने !
एक क्षणाचा मी असे भुका.

कळावयाला नकोच तुजला
गुपीत माझ्या हृदयांमधलें
नयनांनीं जें तूंच आपुल्या
गुलाबगालीं लिहुन दाविलें

म्हणुनि वाटतें दुरावलों जणुं
कां नि कसें हें सांगू तुजला
हवसि मज तूं तशीच अगदी
पणती मधली ज्योत उज्ज्वला.

राजा महाजन

( कला विभाग, द्वितीय वर्ष )

( टीप:- याच लेखकाच्या ' मानाचे मंदील ' या गोष्टीवर ' राजा महाराज ' असं नांव चुकून पडलें आहे. त्या ठिकाणीं ' राजा महाजन ' असें वाचावें )

# भारत इलेक्ट्रिक ॲण्ड जनरल ट्रेडिंग कंपनी.

पोलन पेठ, आझाद रोड, जळगांव, ( पूर्व खानदेश )

इलेक्ट्रिकल इंजिनिअर्स, कॉन्ट्रॅक्टर्स व जनरल मर्चंटस

आमचेकडे सर्व प्रकारची इलेक्ट्रिक फिटिंगचीं कामें, इलेक्ट्रिक मोटार्स, डायनामो रिवाइंडींग, व रिपेअर्स इत्यादि कामें खात्रीशीर करुन मिळतील. सर्व प्रकारचे इलेक्ट्रिक सामान व मशिनरी किफायतशीर भावांत मिळेल.

अनुभव हीच खात्री.

# जर्मन डयुज डिझेल एंजिन्स्

— आमचेकडे —

★ डयुज, ★ युनिपॉर्न, ★ क्रूपर, ★ पीटर, ★ यानमार,

करुड ऑईल एंजिन्स, व्हिसकॉनसीन एंजिन्स योग्य दरानें मिळतील. त्याचप्रमाणें वरील एंजिन्सचे सर्व प्रकारचे

: सुटे भाग :

हजर मालांतून दिले जातील.

लिहा अगर भेटा:— " रुरल सप्लायर्स "

भादलीकर बिल्डिंग, पोलन पेठ,

जळगांव पू. खा.




# मराठी नवनाट्याचे विशेष.

## ( साहित्यचर्चा )

ले :— वा. ना सारंग ( चतुर्थ वर्ष, कला विभाग )

१८४३ साली कै. भाव्यांनी ' सीतास्वयंवर ' नाटक रंगभूमीवर आणल्यापासून १९३० पर्यन्तचा काळ मराठी नाट्यकलेच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत समृद्धीचा व वैभवाचा मानला जातो. नाट्यविषयाच्या, तंत्राच्या. अभिनयाच्या, संगीताच्या, वेशभूषेच्या, रंगभूमीवरील सजावटीच्या, नाटकगृहरचनेच्या-कोणत्याहि दृष्टीने मराठी नाट्यकलेकडे पाहिलें तर त्या बाबतींत मराठी नाट्याने खूपच प्रगतीचा टप्पा गांठला आहे. असें दिसून येतें.

### मराठी रंगभूमीची अवनत स्थिती.

परंतु १९३० सालानंतर मराठी नाट्यकलेला अवकळा प्राप्त झाली. बोलपटांचें आगमन हें रंग-भूमीच्या अवनतीचें प्रमुख कारण मानलें जाते. थोड्या पैशांत व थोड्या वेळांत मिळणारी करमणूक म्हणून अर्थातच महायुद्धानंतरच्या मंदीच्या काळांत खिसा रिकामा झालेला मध्यमवर्ग बोलपटावर आपली गरज भागवूं लागला. आपल्या यांत्रिक नाविन्याच्या प्रभावामुळे बोलपटांनी रंगभूमीचा प्रेक्षकवर्ग पळविला, नटवर्ग अधिक पैशाच्या लोभाने बोलपटाकडे वळला, नाटकगृहांचें रूपांतर ' टॉकीज ' मध्ये झालें आणि नाट्यकलेच्या पदरीं परिणामस्वरूप वनवास आला.

बऱ्याच अंशीं वरील गोष्ट खरी असली तरी रंगभूमीच्या दुरवस्थेचें खापर सर्वस्वीं बोलपटावर फोडणें योग्य होणार नाही. बोलपट व रंगभूमी ह्यांचीं क्षेत्रें अगदी भिन्न असून बोलपट असूनही रंगभूमीचा उत्कर्ष साधूं शकतो, ही गोष्ट आता स्पष्ट झाली आहे. परंतु परिस्थित्यनुसार आमच्या नाटककारांनी, नटांनी व रंगभूमीच्या चालकांनी आपल्या नाट्यकलेच्या स्वरुपांत उचित बदल न केल्यामुळे हा अनवस्था प्रसंग अधिक तीव्र स्वरूपांत ओढवला, असें म्हणावेसें वाटतें. पहिल्या महायुद्धानंतर जीवनांत जास्त गतिमानता आली व जीवनकलह अधिक तीव्र स्वरूपाचा झाला. अशा परिस्थितींत थोड्या पैशांत, थोड्या वेळांत मिळेल अशी करमणूक जनतेला हवी होती. समाजाच्या ह्या बदलत्या परिस्थितीची जाणीव आमच्या रंगभूमीला फार उशिरा झाली. बोलपटांचें आगमन होण्यापूर्वीच जर आमच्या नाट्याच्या व रंगभूमीच्या स्वरूपांत अिष्ट बदल घडून आला असता, तर रंगभूमीवरचें हें संकट टाळतां येणें बऱ्याच अंशीं शक्य झालें असतें.

नाट्याच्या स्वरूपांत बदल करण्याची जाणीव झाली नव्हती, असें मात्र म्हणता येणार नाही. नाट-काची लांबी कमी करण्याचे प्रयत्न सन १९२३ पासूनच सुरू झाले होते. मामा वरेरकरांनी आपल्या ' तुरुंगाच्या दारांत ' ह्या १९२३ सालीं लिहिलेल्या नाटकाची रचना तीन अंकीं केली आहे. ' करग्रहण ' व ' नवा खेळ ' हीं नंतर लिहिलेलीं त्यांचीं नाटकेंही तीन अंकींच आहेत. आणि १९३० नंतर लिहिलेलें कोणतेंही नाटक पाहिलें तर तें तीन किंवा चार अंकीं लिहिलेलें सांपडेल. अडीच तीन तासांत बसेल, अेवढेंच नाटक असावें, हें सर्व सामान्य तत्त्व आता मान्य झालें झालें आहे, असें समजायला हरकत नाही. वेळेची बचत हेंच नाटकाची लांबी कमी करण्याचें प्रमुख कारण होय. पूर्वीसारख्या पांच पांच अंकीं सहा सात तास चालणाऱ्या नाटकांचा आजच्या बोलपटाच्या जमान्यांत निभाव लागणें शक्यच नव्हतें. म्हणूनच हा अिष्ट बदल नवनाट्यांत घडून आलेला दिसेल. ' अल्प वेळांत करमणूक ' ह्या तत्वाला धरून अलिकडच्या काळांत कांही अेकांकिकाही लिहिल्या गेल्या आहेत. अनंत हरी गद्रे, दया पटवर्धन, रांगणेकर इत्यादींच्या अेकांकिका अलीकडेच लिहिल्या गेल्यात. अेकांकिका ह्या गॅदरिंग, सभासम्मेलनें ह्यांतून करण्याच्या दृष्टीने जरी उपयुक्त वाटल्या तरी सर्वसामान्य प्रेक्षकांचें मनोरंजन करण्याच्या दृष्टीने तीन अंकीं अडीच तीन

तास पुरणारीं नाटकेंच बोलपटांशीं स्पर्धा करूं शकतील व उपयुक्त ठरतील.

तीन अंकीं नाटकांची रचना इब्सेनच्या नाट्य–तंत्राला अनुसरून आपल्याकडे रूढ झाली, असें म्हणता येईल. मराठीचीं प्रारंभीचीं नाटकें हीं संस्कृताच्या धर्तीवर लिहिलीं गेलीं आहेत. कै. किर्लोस्कर ह्यांचें 'शाकुंतल' सात अंकांत रचलें गेलें आहे. किर्लोस्कर, देवल, परशरामपंत गोडबोले आदि नाटककारांनी आपली नाट्यरचना संस्कृत नाट्याच्या आधारें केली आहे. त्या काळांतील कांही नाटकें संस्कृतचीं भाषांतरें आहेत. 'सौभद्र' 'शारदा' आदि नाटकांची रचना पांच अंकीं असून संस्कृतप्रमाणे सूत्रधार–नटी संवाद व पदांची विपुल संख्या अशा नाटकांतून आढळतात. कोल्हटकर, खाडिलकर, गडकरी, वरेरकर आदि त्या नंतरच्या काळांतील नाटककारांची नाटकें साधारणतः पांच अंकांतून विभागलीं गेलीं असून त्यांच्यावर शेक्सपियर, मोलियर, शेरिडन ह्या पाश्चात्य नाटककारांची छाप आहे. आणि अगदी अलिकडचे वरेरकर, अत्रे, रांगणेकर इ. नाटककार इब्सेन, शॉ, मॉम, इ. पाश्चात्य नाटककारांचें ऋण घेऊन आले आहेत, ही गोष्ट आपल्या मराठी नाटकांच्या कथारचनेकडे पाहिलें असता प्रत्ययास येईल.

## प्रवेशरहित अंकांची योजना.

मराठी नवनाट्य लांबीने कमी झालें हें पाहिल्यावर त्याचा दुसरा लक्षांत येण्यासारखा विशेष म्हणजे त्यांतून केलेली 'प्रवेशरहित अंकयोजना' हा होय. अेक प्रवेशी अंकयोजना प्रथमतः मामा वरेरकरांनी आपल्या 'तुरुंगाच्या दारांत' त्या नाटकांत हेतुपुरस्सर केली आहे. देवलांच्या 'शारदे' चा पहिला अंकही अेक-प्रवेशींच आहे. परंतु तो निर्हेतुकपणें अनायासेंच तसा 'निर्मिला' गेला. 'हा अंक अेकप्रवेशी करायचा' म्हणून त्यांनी प्रयत्न केला नव्हता. म्हणूनच त्यांची कलात्मकता विलोभनीय होय. आज जवळ जवळ सर्वच नाटकांतून प्रवेशरहित अंकांची योजना केलेली आढळते. १९३० पर्यंतच्या नाटकांतून (तुरुंगाच्या दारांत, कर–ग्रहण, नवाखेळ सोडून) प्रवेशांची भरमार केलेली आढळेल. अनेक प्रवेशीं अंक असल्याने स्थलैक्य व कालैक्य साधतां येणें अशक्यच होतें. शिवाय प्रयो–गाच्या दृष्टीनेही सुकरता व प्रवाहित्वाला बाध येत होता. अलिकडच्या नाटकांतून अेकच प्रवेशी असल्यामुळे स्थल व काल ह्यांचें अैक्य साधता शिवाय प्रयोगाच्या दृष्टीने सुकरता येते व अेक प्र[illegible] प्रवाहित्व साधलें जातें. मामा वरेरकरांनी 'जिवाशिवाची भेट' बहुप्रवेशीं केली खरी परंतु रंगमंच नसल्यामुळे त्यांच्या प्रस्तुत नाटकाचें प्र[illegible] करण जड जाऊं लागलें व त्यानंतरचें 'दौलत[illegible] त्यांना अेक प्रवेशींच लिहावें लागलें !

## प्रवेशरहित अंकयोजनेचा हेतु स्थलैक्य

पडदा न टाकतांना अथवा प्रवेश न बदल[illegible] तोच प्रवेश चालू ठेवणें ह्याचा अर्थ अंक अेक[illegible] आहे. असा होऊं शकत नाही. अेकप्रवेशीं रचना अत्यंत कौशल्यपूर्ण व कलात्मकरीत्या केली पाहिजे. ती अशी झाली तरच स्थलैक्य साधलें परिणामाच्या दृष्टीनेही ती प्रभावी होईल. नाटकांतून अनेकप्रवेशी रचना केली गेली त्यामुळे त्यांत विविधता व विपुलता आढळते. प्रवेश-रहित अंक योजनेमुळे वरील दोन गुणांना प्रति[illegible] मुकावें लागतें; शिवाय कित्येक वेळीं सामान्य नाटककाराच्या अेक प्रवेशीं अंकाच्या चुकीच्या तीमुळे कृत्रिमताहि निर्माण होते. अंक अेक[illegible] करण्याच्या आग्रहामुळे पुष्कळ वेळां कसा तरी निर्माण करून (— कोणाला आजारी म्हणून, तार पाठवून —) पात्रें रंगभूमीवर बोलवावीं तात व जेवणाच्या अथवा या ना त्या निमित्तानें रंगभूमीवरून घालवावीं लागतात. ही कृत्रिमता होऊं नये व हास्यास्पदता पदरीं पडूं नये म्हणून प्रवेशीं रचना ही अत्यंत कौशल्याची बाब होऊन आहे. फिरता रंगमंच आपल्याकडे उपलब्ध नसल्याने व अेकप्रवेशींच रचना प्रयोगाच्या दृष्टीने सुकर त्यामुळे कथानकरचनेंत अधिक कौशल्य व कला[illegible] दाखविणें व शिथिल नि भोंगळ रचनेला फाटा आवश्यक आहे.

## 'स्वगत व अेकीकडे' या भाषणांची हकालपट्टी

स्वगतांचा अपलाप हा नवनाट्याचा विशेष होय. पूर्वींच्या नाटकांतून स्वगतांची योजना प्रमाणांत झालेली आढळते. स्वगत भाषण हें तेला धरून नाही. आपल्या स्वतःशींच मनुष्य विरळाच सांपडेल ! असें असतांना कै.



स्करापासून स्वगतांची ही परंपरा थेट गडकऱ्यापर्यंत चढत्या कमानींत आलेली आढळते. 'सौभद्रां'त कृष्णाच्या तोंडीं घातलेलीं स्वगतें अप्रयोजक वाटतात. स्वगत भाषण हें स्वताशींच केलेलें असतं ! तें दुसऱ्याला ऐकूं कसें जाणार ? परंतु 'सौभद्रां' तील अर्जुन व सुभद्रा ह्यांचीं स्वगतें अेकमेकांना अैकूं जातात. अेवढेच नव्हे तर तीं अेकमेकांचीं प्रश्नोत्तरें होऊं शकतात, हें पाहून कुणाला चमत्कार वाटणार नाहीं. परंतु ह्या गोष्टीबद्दल आमच्या नाटककारांना आश्चर्य वाटलेलें नाही. विशेष गंमत ही कीं, किर्लोस्करांचें अनुकरण करून देवलांनी आपल्या 'संशयकल्लोळांत' तशाच प्रकारचीं स्वगतें घालायला मुळीच मागेपुढे पाहिलें नाही. खाडिलकरांनी घातलेलीं स्वगतें बऱ्याच ठिकाणीं तितकीशीं अप्रयोजक वाटत नाहीत. त्यांच्या 'सं० विद्याहरणांत' क्वचितच स्वगतांचा आधार घेतलेला आढळतो. गडकऱ्यांनी त्या बाबतींत कमाल मर्यादा गांठली आहे, असें म्हणतां येईल. त्यांनी आपल्या पात्रांच्या तोंडीं पानेच्या पानें स्वगतें घातलीं आहेत. पात्राच्या तोंडीं स्वगत घालणें म्हणजे गडकऱ्यांना पर्वणीच ! त्यांची सारी कल्पनाशक्ति, भाषाचातुर्य त्यांतून प्रकट करण्याची हौसच जणू त्यांनीं भागवून घेतलेली दिसते.

मामा वरेरकरांनी १९२२ सालीं लिहिलेल्या 'सत्तेच्या गुलामांत' प्रथम स्वगतांना फांटा दिला. त्यानंतर वर्तक, अत्रे, रांगणेकर ह्यांनी व अलिकडच्या बहुतेक सर्व नाटककारांनी ह्या अप्रस्तुत प्रकाराला चाट दिलेली आहे. स्वगतांना चाट दिल्यामुळे अेक मोठी जबाबदारी नाटककारावर येऊन पडते, ह्याची दखल मात्र फारशी घेतली गेलेली दिसत नाही. पूर्वी स्वग-तांच्याद्वारें पात्रांचें स्वभावदर्शन स्पष्ट व रेखीव होण्याला मदत होत असे. आज स्वगतेंच काढून टाकल्यामुळे स्वभावरेखनाचें प्रमुख साधन संवाद होऊन बसलें आहे. संवाद व कृति हीं व्यक्तिदर्शनाचीं प्रमुख साधनें म्हटल्यावर त्यांवर विशेष जोर दिला गेला पाहिजे, ही गोष्ट ओघानेच येते. केवळ भाषेच्या दृष्टीने चटकदार संवाद हें कार्य करूं शकणार नाही. त्यांत कलात्मकता, सूचकता, संयम हवा. रांगणेकरांच्या सर्वच नाटकांतून उत्कट व्यक्तिदर्शन झालेलें आहे, असें आढळत नाही. ह्याचें कारण त्याचे संवाद उथळ आहेत. त्यांत सूचकता नाही, कलात्मकता नाही. केवळ भाषेचा सांचेगणा व चटकदारपणा उत्कट व्यक्ति-दर्शनाचें कार्य करू शकणार नाही. अत्र्यांचीं 'घराबाहेर' व 'उद्यांचा संसार' हीं नाटकें सोडलीं तर त्यांच्या बाकीच्या नाटकांतूनही हीच रड आहे उथळ व शिथिल संवाद थोडा वेळ प्रेक्षकांना रिझवूं शकतील पण चटका लावूं शकणार नाहीत, हृदयाचा वेध घेऊं शकणार नाहीत.

स्वगतें अस्वाभाविक म्हणून सोडून दिल्यावर आलेली व्यक्तिदर्शनाची जबाबदारी जशी नाटककारा–कडून सांभाळली गेली पाहिजे, त्याचप्रमाणे पात्राच्या मनांतील भावना प्रकट करण्याअितकें अभिनयकौशल्य नटाच्या ठिकाणीही आवश्यक आहे. मनांत निर्माण झालेल्या भावना अथवा विचार मोठ्याने बोलून दाख-विण्यापेक्षा मूक अभिनयाच्याद्वारें व्यक्त करणें, अधिक कलात्मक समजलें पाहिजे. अेक व्यक्ति दुसऱ्या व्यक्ती-वर अनुरक्त होते तेव्हा ती व्यक्ति मोठमोठ्याने भाषण देत बसत नाही. ती आपल्या प्रिय व्यक्तीचें चिंतन करील, ध्यान करील, तिचा फोटो घेऊन त्याकडे प्रेमादरपूर्वक पाहील, चुंबनें घेईल आणि मनांत निर्माण झालेले भाव आपल्या चेहऱ्यावर दाखवील. आपलें प्रेम शब्दांनी व्यक्त करण्याअैवजी अशा रीतीने कृति व मूक अभिनय ह्यांच्या साहाय्याने प्रकट करणें केव्हाही अधिक कलात्मक होय. आणि म्हणूनच आजच्या रंगभूमीला— नवनाट्याच्या प्रकटीकरणाला अधिक अभिनयकुशल नट हवेत, ही गोष्ट पटण्यास वेळ लागत नाही.

## पदांची परिमित संख्याः

'अतिरिक्त संगीतामुळे रंगभूमीचा ऱ्हास झाला.' असें मत पुष्कळ वेळां अैकूं येतें. ही गोष्ट पुष्कळ अंशीं खरी वाटते. संगीताने अेके काळीं आमच्या रंगभूमीवर अधिराज्य गाजवलें. प्रेक्षक नाटक पाहाण्याकरिता न जातां संगीत अैकण्याकरता जात असत. कै. किर्लोस्करांनी आपल्या 'सौभद्रांत' अेकूण ८५ पदें घातलीं आहेत. किर्लोस्कर व देवल ह्यांनी आपल्या नाटकांतून योजलेलीं पदें कथानकाशी अेकजीव झालेलीं आहेत. विशेषतः किर्लोस्करांचीं पदें अधिक रसोत्पादक व प्रासादिक वाटतात. म्हणून त्यावेळीं संगीत हें रंगभूमीला मारक होऊं शकलें नाही. पुढे कोल्हटकरांनी आपल्या नाटकांत जी पदयोजना केली ती विशेषतः उर्दू रंगभूमीच्या

संगीताने प्रभावित होऊन ! पारशी, बोहरी, मुलतानी इ. मराठी न जाणणारे प्रेक्षक जेव्हा निव्वळ बालगंधर्वांचें सुमधुर गायन अैकण्याकरता नाटकाला येऊं लागले, तेव्हा ह्या धनिक वर्गाला खूष करण्यासाठी आमच्या नटांनी व नाटककारांनी रंगभूमी हें मैफलीचें ठिकाण बनवून टाकले. संगीताचा अेवढा प्रभाव पडला कीं खाडिलकरासारख्या प्रभावी गद्य नाटककारालाही आपलीं नाटकें रसहानि पत्करून 'संगीत' करावीं लागलीं.

बोलपटांचें आगमन झालें नाही तोंपर्यंत अतिरिक्त संगीताची जाणीव झाली नाही. परंतु बोलपट आल्यानंतर व त्यांतील त्रोटक व कर्णमधुर चालींचीं गाणीं आमच्या प्रेक्षकांच्या कानीं पडल्यावर त्यांनी निव्वळ संगीताकरता रंगभूमीकडे जायचें सोडलें व बोलपटाकडे मोर्चा वळवला; आणि संगीतावर जिवंत राहिलेली रंगभूमि मृतवत् भासूं लागली.

संगीत मर्यादातिक्रमण करीत आहे, ही गोष्ट आम्हांला फार उशीरा कळली. मामा वरेरकरांनी आपल्या 'तुरुंगाच्या दारांत' नाटकाची लांबी कमी केली, स्वगतें टाळलीं परंतु रागदारी संगीताला ते फाटा देऊं शकले नाहीत. पदांची संख्या परिमित करून भावगीतांची योजना करण्याचा प्रयत्न वर्तकांनी आपल्या 'आंधळयाच्या शाळेंतून' प्रथम सुरू केला. प्रस्तुत नाटकांत त्यांनी २-३ भावगीतें घालून नवीन पायंडा घातला. तेव्हापासून संगीताची मिरासदारी गेली व ही परंपरा रूढ झाली.

खरें पाहिलें असतां रसोत्कर्ष साधण्याच्या दृष्टीने नाटकांत पदांची आवश्यकता नाही. परंतु कांही गोष्टी प्रेक्षकांची अभिरुचि ओळखून कराव्या लागतात, त्यांतलीच ही अेक गोष्ट होय ! बोलपटांतून योजलेलें संगीत लोकप्रिय झाल्यामुळे तशाच पद्धतीचें संगीत नाटककारांना आपल्या नाटकांत योजावें लागलें. बोलपटांत घातलेलीं गाणीं जशीं कित्येक ठिकाणीं अप्रस्तुत व रसापकर्षक वाटतात; त्याचप्रमाणे आमच्या नवनाट्यांतील संगीतही कित्येक ठिकाणीं रसभंग करणारें झालें आहे. किर्लोस्कर, देवल ह्यांचीं पदें स्पष्ट साधीं, अर्थवाही व रसोत्पादक आहेत. आज जीं भावगीतें घातलीं जातात; त्यांचा कथानकाशीं क्वचितच संबंध असतो. नाटककार पद्यरचना करणारा असला तर तो स्वतःचीं गीतें घालतो, नाहीतर दुसऱ्या कवीचीं गीतें योग्य अथवा अयोग्य ठिकाणीं घ[...] जातात. गाणें कुठे घालायचें ? कोणतें घाल[...] हें अगोदर मुळीं ठरलेले असावें, असें दिसत [...] 'आंधळयाच्या शाळेच्या' पहिल्या अंकांत भाव[...] योजना कशी कृत्रिमरीत्या केली आहे, हें [...] उदाहरणावरून दिसून येअील.

मनोहरः— म्हण. म्हण अगोदर !

बिम्बाः— कोणचं म्हणूं अगोदर ?

मनोहरः— ( जरा विचार करून ) तें प्रे[...] म्हण अगोदर !

आणि मग बिम्बा 'तूं माझी अन् तुझा [...]' हें भावगीत म्हणते. ह्या गीताचा कथानकाशीं [...] संबंध पोहोंचत नाहीं. बहुतेक नाटकांतून [...] गीतांची योजना केलेली आढळते. 'आता म्ह[...] तें त्या दिवशीं म्हटलेलं गाणं ?' अथवा 'अेक [...] गाणं म्हण ना आता.' अशा रीतीने नाट[...] नट अथवा नटीला सूचना देऊन गाणीं म्ह[...] जातात. किंवा अेकदम पडदा उघडल्याबरोबर [...] सुरु होतें. स्वगत गाणें म्हणण्याचीही तऱ्हा [...] ठिकाणीं आढळून येते. अर्थातच त्या गीतांचा [...] नकाशीं संबंध नसतो. रसभंग होऊन अेकतानता [...] नष्ट होते. व परिणामाच्या दृष्टीनेही वैगुण्य येतें. [...]

मग संगीत अजिबात नकोच कां ? अशी [...] निर्माण होतो. ह्याचें उत्तर 'नाटकाची जशी [...] असेल, त्याप्रमाणे संगीताला स्थान द्यावें,' असें [...] येअील. गंभीर प्रकृतीच्या नाटकाला संगीताची [...] आवश्यकता नाही ! संगीत उपकारक न होता [...] कारक होण्याचाच संभव ह्या बाबतींत अधिक ! [...] प्रकारच्या नाटकांतून पदें घालतांना तीं र[...] होतील, अशी खबरदारी घेणे आवश्यक आ[...] बाबतींत भावगीतापेक्षा रसोत्पादक, अर्थवाही, [...] नकाचा परिपोष करणारीं पदें घालणेंच अधिक [...] ठरेल !

## आटोपशीर व चित्तवेधक संवादः

आटोपशीर व चित्तवेधक संवाद नव[...] आणखी अेक विशेष होय. किर्लोस्कर व देवल[...] नाटकांतील संवाद स्वाभाविक, आटोपशीर [...] आहेत. कोल्हटकरांच्या संवादांत चमत्कृति[...]



अतिरेकाने कृत्रिमता आली. काव्यमय कल्पनांचा फुलोरा फुलविण्यांत, कोटिबाजपणा साधण्यांत त्यांनी वास्तवतेकडे दुर्लक्ष केलेलें आढळून येतें. गडकऱ्यांनी पानेच्या पाने अेकेक पात्राच्या तोंडीं भाषण घालून आपल्या गुरूवरही ताण केली. खाडिलकरांचे संवाद बऱ्याच ठिकाणीं चांगले साधलेले आहेत. त्यांत ओज आहे, रसोत्कर्ष साधण्याची शक्ति आहे, गतिमानता आहे. तरी पण बऱ्याच ठिकाणीं ते लांबलेले आहेत व त्यामुळे कंटाळवाणेही झालेले आहेत.

'आंधळयाच्या शाळे' पासून संवादांना नवीन वळण लागलें, असें साधारणपणें समजायला हरकत नाही. तेव्हापासून संवादांत अधिक वास्तवता, सोपेपणा व चटकदारपणा आला. अत्र्यांच्या 'साष्टांग नमस्कार' 'घराबाहेर' 'उद्यांचा संसार' मधील संवाद चित्तवेधक आकर्षक व गतिमान आहेत. 'मी उभा आहे' 'पराचा कावळा' इ. त्यांच्या प्रहसनांतील संवाद बऱ्याच ठिकाणीं उथळ व शिथिल वाटतात. रांगणेकरांचें यश त्यांच्या संवादांतील चटकदारपणांत बऱ्याच अंशीं सांठविलेलें आहे. कंटाळवाणें, लांबचलांब व रुक्ष संवाद त्यांच्या नाटकांतून आढळणार नाहीत. मात्र कित्येक ठिकाणीं सदभिरुचि व सभ्यतेला सोडून संवाद घातलेले आढळतात. 'कुलवधू' मधील बाप्पा, राधाबाई व बनी ह्यांमधील संवाद ह्याचें उदाहरण म्हणून दाखवितां येईल.

संवाद हें व्यक्तिदर्शनाचें प्रमुख साधन आहे. नुसतेच चटकदार संवाद हृदयाचा वेध घेऊं शकणार नाहीत. त्यांच्यांत गतिमानता हवी. कृतिप्रवणता हवी. सूचकता, संयम, कलात्मकता असेल तरच त्यांच्या योगाने उत्कट व प्रभावी व्यक्तिदर्शन होऊं शकेल ! आजच्या बहुतेक नाटकांतून ह्या गुणांचा दुष्काळ आढळतो.

## नाट्यविषयांत नाविन्य, विविधता व व्यापकता

नवनाट्यांत विषयाच्या दृष्टीने व्यापकता आली आहे. पूर्वींच्या नाटकांतून पौराणिक व अैतिहासिक विषयांवरच अधिक भर दिला गेला आहे. 'शारदा' हें पहिलें यशस्वी सामाजिक नाटक ! त्यानंतर कोल्हटकरांनी चमत्कृतिपूर्ण, रहस्यप्रधान नाटकें लिहिलीं. त्यांतही अेखादें सामाजिक तत्त्व गोंवलेलें असें; पण अद्‌भुत व चमत्कृतियुक्त रचनेच्या भाराखाली तें कुठेंतरी दडून बसलेलें असे ! खाडिलकरांनी पौराणिक व अैतिहासिक विषय घेऊन त्या काळच्या राजकीय परिस्थितीचें रूपकाच्या सहाय्याने दिग्दर्शन केलें. चालू सामाजिक विषयावर नाटकें लिहिणारा सिद्धहस्त लेखक म्हणून मामा वरेरकरांचा उल्लेख केला जातो. त्यांनी विधवाविवाह, हुंड्याची चाल, मालक-मजूर संबंध, कोर्टकचेरी, चित्रकार, नृत्यकार इ० विविध विषयांवर नाटकें रचलीं. अत्र्यांनी स्त्रीस्वातंत्र्य, विवाहादि सामाजिक प्रश्न आपल्या नाटकांतून मांडले. रांगणेकरांनीही स्त्रियांचें आर्थिकस्वातंत्र्य, पतिपत्नीसंबंध, कुटुंबसंस्था आदि विषयांवर आपली लेखणी चालविली. राजकीय विषयांवरचें नाना जोगांचे 'सोन्याचे देव' नाटक विशेष उल्लेखनीय वाटतें. पौराणिक नाटकें अलिकडच्या काळांत फारशी निर्माण झालीं नाहीत. 'दुसरा पेशवा' हें शिरवाडकरांचें नाटक वाङ्मयीन गुणांच्या दृष्टीने लक्षणीय आहे. सामाजिक नाटकांचा काळ म्हणून आजच्या काळाचा उल्लेख करतां येईल. आजच्या नाट्यवाङ्मयांत नाविन्य, विविधता व व्यापकता आली आहे.

## नवनाट्यांतील अितर फरकः

नवनाट्याचा विचार करतांना आणखी कांही गोष्टी डोळयांसमोर येतात. पूर्वीं नाटकाचा काळ हा वर्षांनी गणला जात असे. आज प्रत्यक्ष नाटकाचा काळ कमी करण्याकडे प्रवृत्ति होत आहे. 'कोणे अेके काळीं' चें कथानक अवघे २-३ दिवसांत घडलें आहे. 'सोन्याचे देव' चार साडे चार महिने तर 'चित्रशाळा' नाटकाचा काळ अवघ्या बारा दिवसांचा. 'फांस' चें कथानक दोन तीन दिवसांत पूर्ण होतें. 'बोलका ढलपा' ह्या शं. गो साठ्यांच्या नाटकाचा काळ अवघ्या बारा तासांचा आहे. ह्यावरून नाटकाचा काळ कमी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न होत आहेत, ही गोष्ट दिसून येईल.

नवनाट्यांत विनोद हा आनुषंगिक आढळून येतो. पूर्वीच्या नाटकांतून विनोदाकरता विदूषकाची योजना असे. कोल्हटकरांनीं प्रसंगनिष्ठ, शब्दनिष्ठ, स्वभावनिष्ठ विनोदाच्या निर्मितिकरता उपकथानकांची योजना केली. खाडिलकरांचे नमकशास्त्री-चमकशास्त्री व केळकरांचे पिकटंभट्ट-चिकटंभट विनोदनिर्मितीकरताच उत्पन्न झाले आहेत. गडकऱ्यांचे गोकुळ, धुंडिराज त्यांच्या

स्वभावनिष्ठ विनोदामुळेच अमरत्व पावले आहेत. माधवराव जोशांनी 'म्युनिसिपालिटी' हें प्रहसन लिहून स्वतंत्र विनोदी नाटकांचा श्रीगणेशा केला. अन्यांनी पुढे 'साष्टांग नमस्कार' 'लग्नाची बेडी' 'भ्रमाचा भोपळा' आदि प्रहसनें लिहून विनोदी नाटकांची परंपरा पुढे चालविली. रांगणेकरांच्या नाटकांतील विनोद माफक व गालांतल्या गालांत हंसायला लाविणारा आहे. स्वतंत्र विनोदी उपकथाकांची निर्मिती आता मागे पडली असून कथानकाशीं संबद्ध असा माफक विनोद निर्माण करण्याकडे नाटककारांचा कल दिसून येतो.

### मराठी रंगभूमि व तिचें भवितव्यः

आतापर्यंत जें विवेचन केलें त्यावरून मराठी नवनाट्याच्या विशेषांची कल्पना येण्यासारखी आहे. रंगभूमी अधिक वास्तव व आकर्षक करण्याच्या दृष्टीने नाट्यांत हा बदल घडून आला आहे. कालानुरुप रंगभूमीच्या सजावटींतही बराच फरक झालेला आढळून येतो. हल्ली खरी दारे, खिडक्या दाखविणाऱ्या फ्लॅट सीनची योजना केली जाते. नाट्यांतील भावभावनांना परिपोषक होईल अशी पार्श्वसंगीताची योजना व संगीताचे साथीदार पडद्याआड बसविण्याची पद्धत 'नाट्यमन्वंतर' ह्या संस्थेने सुरू केली असून रंगभूमी अधिक आकर्षक केली. नाट्यांत व रंगभूमीवर हे इष्ट बदल घडवून आणल्यावरही आजची रंगभूमि संपन्न व उन्नतिशील आहे असें म्हणवत नाही. 'नाट्यनिकेतन' व 'सर्वोदय कलामंदिराची नाट्यशाखा' ह्या दोन संस्था सोडून दुसऱ्या कोणत्याहि कंपनीची स्थिति समाधानकारक नाहीं. 'मराठी रंगभूमि' 'प्रभाकर नाट्यमंदिर' 'आनंद विलास' इ. मंडळ्या जुन्या नाटकांचेंच प्रयोग करून कसातरी गुजारा करीत आहेत; नवीन नाटकांचे प्रयोग करण्याचे धाडस त्या करीत नाहीत. ज्या महाराष्ट्रांत शें दीडशें नाटक मंडळ्या रंगभूमि गाजवीत होत्या तेथे हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या नाटकमंडळ्या अस्तित्वांत असुन त्यांचीहि स्थिति विशेष आशादायी व उत्साहवर्धक नाही.

त्या गोष्टीला जीं कारणें पुढे केलीं जातात तीं सर्वसाधारणपणें "उत्कृष्ट नाटककार नाहीत, नट नाहीत, नाटकगृहें नाही!" इ. आमच्या नाटककारांनी ह्या वीस वर्षांच्या काळांत जीं नाटकें लिहिलींत तीं अधिकाधिक प्रयोगानुकूल कशीं होतील ही दृष्टी ठेवून! नवना... सर्व बाह्यविशेष त्यांत दृग्गोचर होतात; परंतु नवना... आत्मा त्यांत आढळत नाही. बुद्धिमत्ता, सुसंगत ... प्रमाणसिद्ध विचारप्रणाली, भावनात्मक बुद्धीचा ... उत्कट व प्रभावी व्यक्तिदर्शन, मानवी भावनांची ... आंदोलनें इ प्राणभूत गोष्टींची आजच्या नवना... प्रकर्षाने उणीव भासते. 'अकाद्या सामाजिक प्र... शुद्ध, बौद्धिक, मानसशास्त्रीय भूमिकेवरून ... करायची, उलटसुलट बाजू argument ने ... ळून घ्यायची व सत्याचें कठोर, अनपेक्षित दर्शन ... वून समाजाला धक्का (बौद्धिक) द्यावयाचा ... नवनाट्याचें प्रमुख वैशिष्ट्य दृष्टिआड केलें गेलें ... वरील गोष्टी जोंपर्यंत नाटकांतून आढळणार ... तोंपर्यंत बाह्य बदल कितीही झाले, व प्रयो... जरी तात्पुरती यशस्विता नाटकांना मिळाली ... रंगभूमीला उर्जितावस्था येणार नाही. प्रायोगि... वाङ्मयीन मूल्यांच्या कसोटींला उतरलेलें नाटक ... वाङ्मयांत जमा होऊं शकेल.

अशीं नाटकें आज दुर्मिळ आहेत, ही गोष्ट ... परंतु नाटक हें दृश्यकाव्य असल्याने जर ते रंग... येण्याची शक्यता नसेल, तर नाटककार ... कशाला? नाटककार हे नाटक मंडळ्यांच्या परि... निर्माण होत असतात, हा अितिहास आहे. ... मंडळ्या नाहीत म्हणून नाटककार नाहीत व नट ... त्याचप्रमाणे नाट्यगृहें पोसणाऱ्या नाटक मं... नसल्यामुळे नाटकगृहें बांधील कोण? असें हें दु... निर्माण झालें आहे. ह्यांतून सुटका होण्याचा मा... तरी दृष्टिपथांत नाही. तशांत ज्या मध्यम ... खिशाला चाट बसून हें सर्व होणार, तो मध्यम ... परिस्थितीने अतिशय गांजला आहे. व मनाला ... नसलें तरी हीन अभिरुचीचा भोक्ता त्याला अ... व्हावें लागत आहे. व बोलपटाकडे करमणुकीकरता ... वळवावे लागत आहेत. अशी परिस्थिती अ... मराठी रंगभूमीचें पूर्वीचें वैभव व परंपरा, ह्या ... 'पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य भाविकाळ' ... आठवण करून देऊन आशावादी व प्रयत्नशील ... ण्यास पुरेशी आहे.



# भौंवरा— ( लघुकथा )

लेः— अरुण ज. चौबळ ( तृतीय-वर्ष, शास्त्र-विभाग )

कसल्या तरी आवाजाने दचकून प्रभाकर थांबला. विचाराच्या तंद्रींत आपण रस्त्याच्या मध्यावरून चाललों आहों ही गोष्ट त्याच्या ध्यानांतच नव्हती. इतक्यांत एखाद्या भोंग्यासारखा चमत्कारीक आवाज करीत एक मोटार त्याच्या अगदी जवळून गेली. त्याने घाबरून इकडे तिकडे पाहिलें. समोरून दोनतीन मुलें हांसत खिदळत येत होतीं. ती आपल्यालाच हांसत आहेत, या विचाराने तो जास्तच चिडला. कॉलेजचा रस्ता त्याला नेहमीपेक्षां रूक्ष नि कंटाळवाणा भासूं लागला. मोठ्या कष्टाने, नाईलाजाने व नाउमेदीने तो चालूं लागला. त्याचीं बोटें फाटके खिसे कुरतडीत होतीं व पाय अडखळत, ओढत कॉलेजकडे जात होतें.

त्याचा जीव कॉलेजमध्ये पाय ठेवतांना क्षणभरच घुटमळला. पण शेवटीं तो आपोआप वर्गांत जाऊन बसला. वर्गांतील आपली नेहमीची शेवटची जागा रिकामी बघून त्याने एक निश्वास टाकला, व तो तेथे जाऊन बसला. बाकावरील धूळ पाहून, ती झटकावी असा विचारच त्याच्या मनांत आला नाही, कारण तिच्यामुळे त्याच्या कपड्यांच्या सध्याच्या स्थितींत वा रंगांत फारसा फरक पडणार नव्हता. घंटा व्हावयास अद्याप थोडा अवधी होता. डोळे मिटून तो स्वस्थ बसला असतां त्याच्या नजरे समोरून त्याच्या आयुष्याचा चित्रपट झरझर सरकूं लागला.

त्याच्या घरांत चारच माणसें होतीं. पेन्शन घेतलेले त्याचे दमेकरी वडील, खोकून खोकून त्यांचा जीव घाबरा होत असे. व सबंध रात्रींत त्यांना झोप लागत नसे. तरी पण मुलाला शिक्षण देण्याच्या दुर्दम्य आकांक्षेमुळे ते एका ऑफिसांत ७०-८० रुपयांची नोकरी करीत होते. त्याचा लहान भाऊ रमाकांत हा सहा वर्षांचा असतांनाच पांगळा झाला होता. त्याची तरल बुद्धिमत्ता व कलेची आवड पाहून त्याला अत्यानंद होई पण त्याच बरोबर निसर्गाचा त्याला मिळालेला शाप पाहून प्रभाकर अत्यंत दुःखी होत असे. रमाकांत चार वर्षांचा असतांना त्यांची प्रेमळ आई त्या सर्वांना दुःखाच्या वडवानलांत सोडून गेली होती. राहतां राहिली त्याची मोठी बहीण सुशीला! खूप पैसे खर्चून तिला चांगल्या स्थळीं दिली होती, पण वर्षभरांतच वैधव्याची कुठार मस्तकावर कोसळल्यामुळे ती कायमचीच माहेरी आली बापाच्या कपाळावर आठ्या कोरायला व डोक्यावरचे उरलेंसुरले केस साफ करायला! तिच्या आठवणीने त्याचे डोळे भरून आले—इतक्यांत घंटेचा कर्णकटू आवाज झाला व जागच्या जागींच त्याने थोडीशी चुळबुळ केली.

प्रोफेसर आले व लेक्चरला सुरवात झाली. त्याचें मनापासून लेक्चरकडे लक्ष लागेना. प्रोफेसर न्युटनचे पदार्थविषयक सिद्धांत समजावून सांगत होते. "To every action there is always equal and contrary reaction — Newton's third Law." त्याचें विचारचक्र जोरांत फिरूं लागलें. भोंवऱ्यांत सांपडलेल्या पाचोळ्यासारखी त्याची स्थिति झाली. त्याच्या घरची विचित्र परिस्थिति, त्याच्या भोंवतालचे बेचैन करणारें वातावरण त्याला आढळलें पण क्रियेला, परिस्थितीच्या कृतीला, त्याने कसें तोंड दिलें? What was his Reaction? आपण खंबीर नाहीं, अगतिक आहोंत. दुबळे आहोंत याची त्याला तीव्र जाणीव झाली पण—पण याला धीटपणे कधीं तोंड देता येणार नाही का? त्याचें मन विचारांत जास्तच गुरफटत चाललें. शेवटीं तास संपवून मुलें बाहेर जाऊं लागली तेव्हा तो भानावर आला. त्याला प्रॅक्टिकलसाठी प्रयोगशाळेंत जायचे होतें.

हळूहळू तो ऑफिसवरून नोटीस बोर्डापाशी पोहोचला. मॅचेस, खेळ, वक्तृत्वमंडळ, वाङ्मयोत्तेजक मंडळ, कलोपासकमंडळ वगैरेच्या निरनिराळ्या नोटिसेस फडकत होत्या, पण त्याचें तिकडे लक्षच गेलें नाही. फी

हप्त्याच्या नोटिसीकडे लक्ष जातांच त्याच्या मनांत खळबळ उडाली. गेल्या दोन हप्त्याची फी त्याला भरतां आली नव्हती, व आतां तर तिसऱ्या हप्त्याची नोटीस लागली होती. हप्ता एक तारखेच्या आंत भरा–ही नोटीस पाहून तर त्याला अतिशय राग आला. तो स्वतावर, जगावर, अतिशय चिडला. ह्या नोटिशीच्या चिध्या कराव्या— सगळ्यांना आरडाओरड करून जमा करावें व मध्यम वर्गाच्या दारूण परिस्थितीचें करुण चित्र सगळ्यांच्या समोर बेभानपणें चितारावें, व शेवटीं सैरावैरा धांवत सुटावें असें त्याला वाटलें—पण त्याच्या हातून यांतली एकही गोष्ट घडली नाही.

जातां जातां सहजच तो रीडींगरूममध्ये शिरला. मुलामुलींचे टेबलटेनिस जोरांत चाललें होतें. जगाच्या कटू व्यवहाराची आंच न लागलेल्या त्या भोळ्या, स्वप्न-सृष्टींतच वावरणाऱ्या जिवांचा, तो गोंधळ बघून प्रभाकर जास्तच अस्वस्थ झाला. मध्येच एक लक्ष्मीपुत्र—निळा ब्लेझरचा सूट घालून बेफिकीरपणें सिगरेट ओढत उभा होता. त्याच्या रूपाने जणूं काय श्रीमंत लोकच मध्यमवर्गाला सिगरेटसारखे आपल्या हातात बेपर्वाईने धरून–त्यांना शिलगावून-त्यांना जाळून–त्यांची राखरांगोळी करून, आनंद लुटत आहेत असें त्याला वाटलें. पण मध्यम वर्ग–म्हणजे तो देखील–म्हणजे त्याचीदेखील अशीच स्थिती होणार. तो अतिशय अस्वस्थ झाला. व न कळत प्रयोगशाळेकडे चालूं लागला.

समोरच्याच जिन्यावरून सात, आठ कॉलेज कन्यका हांसत खिदळत उतरत होत्या. त्यांचीं तीं इंद्रधनुष्याच्या सप्तरंगासारखीं चित्रविचित्र पातळें पाहून, त्यांची चेहऱ्यावरची रंगरंगोटी व नजरेंतील चंचल भाव बघून त्याला आपल्या पांढऱ्या कपाळाच्या, फाटक्या, विटक्या पातळांतील सुशीलेची मूर्ती डोळ्यांसमोर दिसूं लागली आपल्या नजरेसमोर कसलातरी धुरकट पडदा पसरत आहे व त्यांत ते सप्तरंग बुडून जात आहेत असा त्याला भास झाला. तसाच तो कठड्याचा आधार घेऊन चढूं लागला. त्या कॉलेज तरुणींच्या घोळक्यांत कशावरून तरी एकदम हंशा पिकला.

चंचल, भ्रमरवृत्तीच्या, कॉलेज
भावरहित करणारा तो ध्वनी त्याला
पडक्या देवालयांत रात्रीं बेरात्री वटवाघळांनी
कर्कश व भेसूर आवाजापेक्षाही कर्णकटू वाटला.

आपण प्रयोगशाळेंत केव्हां पोहोचलों
कळलेंसुद्धा नाहीं. बाकीच्या मुलांनी नुकतीच
सुरवात केली होती. त्याला वाटले कीं आपण
नेहमींच असें मागे पडणार, कुठल्यातरी कोपऱ्यात
कुजत पडणार, त्यापेक्षा आपल्या जीवाचा
सोक्षमोक्ष करून टाकलेला काय वाईट !
शाळेंत निरनिराळ्या रासायनिक द्रव्यांचा उग्र
रलेला होता. त्याला आपल्या घराच्या
खणाची आठवण झाली. तो पांगळा रमाकांत
त्याचे काबाडकष्ट करणारी दुर्दैवी सुशीला- खोल
बेजार झालेले वडील– घरांत कोंडलेला धूर
जीव गुदमरून टाकणारा उग्र दर्प-त्याला सगळ्यांचा
आला. पण आत्महत्येचा विचार मनांत येतांच
कला. त्याच्याडोळ्यासमोर लेव्हल क्रॉसिंग
अथांग विहीर, गरगर फिरणारा नदीचा भोंवरा
...शेवटी त्याची नजर शेल्फवरच्या सल्फ्युरिक
पोटॅशियम सायनाईड वगैरे बाटल्यावरून फिर
त्याने बाटली उचलली, इतक्यांत त्याला सकाळ
आठवला.

वडिलांनी त्याला फीची आठवण केली.
एका धुरकटलेल्या डब्यांतून एक दहा रुपयाची
त्याच्या हातावर ठेवली. इतका वेळ साश्रुनयनांनी
णारा पांगळा रमाकांत खुरडत खुरडत त्याच्या
आला व म्हणाला, “ दादा, तिचे पैसे नकोत
बिचारी मरेमरेंतों दुसऱ्यांचीं कामें करते.
सगळ्यांनाच भडभडून आलें. तिघां भावंडांच्या
संगमांत नोट भिजायला लागली तेव्हां तो
आला. आपण शिकवण्या करत असूनही,
अपुरे पडतात, अशा परिस्थितींत आपल्या
त्यांचा चाललेला एवढा आटापिटा पाहून
झाला. त्याला सुचेनासें झालें—थरथरत्या
बाटली टेबलावर ठेवली. बाहेरच्या व्हरांड्यांत
ण्यापूर्वीची शांतता पसरली होती.

---



# मनाची मुशाफरी— ( लघुनिबंध )

लेखक:— बा. रा. जोशी ( चतुर्थ वर्ष, कलाविभाग )

मुशाफरी ही चीजच कांही और आहे. त्यांतून ती विनाकारण असली तर मग विचारायलाच नको. पण कां नकळे मला मात्र मुशाफरी आवडत नाही. कामासाठी का होईना कुठे जायचें नांव काढलें कीं माझ्या फार जीवावर येतें. माझ्याप्रमाणेच माझ्या मनाची मुशाफरीहि मला आवडत नाही. पण तें कसचें ऐकतें ? प्रवासाला निघायचें तर निदान स्टेशन-पर्यंत तरी जायलाच हवें, पण माझ्या मनाला मात्र घराबाहेर पडण्याचीहि आवश्यकता नाही, इतकेंच नव्हें तर जागेवरून उठायचीहि गरज नाही.

Indigenous Bankers संपवून Reserve Bank चाळावी तों तें पुन्हापुन्हा 'जगतशेटच्या पतपेढ्या' कडे वळतें, 'अर्जुनजी श्रीकृष्णनाथ' नी पाठविलेल्या पैशाच्या गाड्याबरोबर 'ईस्ट इंडिया' कंपनीला धीर देण्यासाठी नवसारी घाटावर उभ्या सारीत जातें, सदा पैशाच्या अडचणींत असलेल्या पेशव्यांना मदत करावी म्हणून 'दीक्षित पटवर्धन पेढी' ला विनवण्या करतें, मीर हबीबने दोन कोट रुपये लुटून नेले तरी काडीचीहि फिकीर न करणाऱ्या फत्तेचंदाच्या सहाव्या वारसाला — गोविंदचंदाला — मिळणारे बाराशे रुपये महिन्याचें पेन्शन पाहून तें विषण्ण होतें, नि समोर नजर जातांच Composition of Reserve Bank बघूं लागतें.

मनाचें असें रेंगाळणें नि एका ठिकाणीं थांबायला सांगितल्यावर झुकांड्या देणें मला अगदी नकोसें होतें. अमक्याकडे जायचे आहे असें कळायचा अवकाश, कीं तें चटकन जाऊन त्याची भेट घेऊनहि येतें, त्याच्याशीं व्हायचें संभाषणहि स्वतःच उरकून टाकतें, त्यामुळे प्रत्यक्ष भेटींत जें सांगायचें तें बाजूलाच राहून भलतेंच कांही तरी सांगितलें जातें. एका विद्वान अध्यापकांकडे कांही शंका वगैरे विचाराव्या म्हणून मी निघालों; अर्थातच त्यांच्या घरीं पोचण्यपूर्वी माझ्या मनाने 'प्रास्ताविक, शंका निरसन, निरोप, आश्वासन' वगैरे संपवून परतायची तयारी केली, इतकेंच नव्हे तर त्यांनी सांगितलेल्या ग्रंथाचें वाचनहि त्याने सुरू केलें, आणि त्यांच्या घरीं गेल्यावर अमुक पुस्तक कसें आहे, 'तमक्यांतला किती भाग चांगला आहे' 'तेवढा सगळा आहे का ?' वगैरे निरर्थक चौकशी करून परत आलों. मनाच्या अशा अगोचरपणामुळेच Montague ने Holidays मध्यें सांगीतलेल्या मानसिक सहलीचा अनुभव घेऊन खऱ्या सहलीचा आनंद गमवावासा मला वाटत नाहीं.

माझ्या एका लांबच्या मामांनी बऱ्याच दिवसापासून त्यांच्याकडे यायचें निमंत्रण देऊन ठेवलें होते. मधून मधून ते पुन्हापुन्हा सूचनाहि करीत, नि माझ्या नेहमीच्या संवयीप्रमाणे मी तें लांबणीवर टाकीत होतों. माझ्या मनानें तर प्रत्यक्ष पाहूनच माझी खात्री करून दिली होती कीं त्या रुक्ष खेड्यांत एक दिवसहि मला थांबतां येणें शक्य नाही. पण पुढे त्यांच्या मुलाचीच मुंज असल्याने मला जावें लागलें. आणि—आणि काय सुटी संपेपर्यन्त मी तिथून परतच आलों नाहीं.

दिवसभर विचार करायला सवड झाली नाही किंवा माझ्या मनाला कुठेच फेरफटका न करतां आला म्हणजे माझी उदासीनता खिन्नता पार कुठे पळून जाते. मनाच्या मुशाफरींत आनंद आहे असें वाटतें पण तो आनंद त्या मुशाफरी इतकाच फोल आहे. किंबहुना गार पाण्यांतून कोमट पाण्यांत बोट घातलें म्हणजे तें पाणी कोमट असूनही गरम लागतें, तसें या मनाच्या मुशाफरींतून परततांच आपलें नेहमीचेंच वातावरणहि अधिक गरम वाटूं लागतें. एवढ्यासाठीच मनाला चांगला प्रवास करतां यावा, त्याची गैरसोय होऊं नये, म्हणून ठराविक स्थळीं मुद्दाम वेळ काढून जाणें मला मुळीच आवडणार नाही. कुणी सांगितलंय उगीचच 'विकत श्राद्ध' घ्यायला ! 'मन हें ओढाळ गुरूं'— त्या 'गुरु' ला हवें तिथे जुंपायचें असलें तर 'त्यांच्या मोकाटपणांत मजा आहे' असे म्हणून कसें चालेल ! मुशाफरी मुशाफरानें करावी, मनाने नाही !

# इकडे लक्ष द्या.

आमचेकडे ग्रामपंचायती, सोसायट्या, बँका, आणि म्युनिसिपालिट्या वगैरे संस्था यांना लागणारे सर्वप्रकारचे

## रबरी शिक्के

पेपर, एक्झरसाईज, व सर्व प्रकारचे जॉबरुलींग, प्लॅस्टिक अक्षरांच्या नांवांच्या पाट्या

पितळी पट्टे, सिले व सर्वप्रकारचे ब्लॉक अत्यंत सुंदर व माफक तयार करून दिले जातात.

भेटा अगर लिहा— **पाटील आणि कंपनी.**

रबर स्टॅम्प्स् मेकर **जळगांव पू. खा.**

शाळा व कॉलेजेस् यांना लागणारे सर्व प्रका चे स्पोर्टस्चे सामान अगदी किफायतशीर भावांत मिळण्याचें खानदेशांतील एकच ठिकाण

# विकास स्पोर्टस् ( इंडिया )

## महात्मा गांधी रोड, जळगांव पू. खा.

आमचेकडे फुटबॉल, व्हॉलीबॉल, कॅरमबोर्डस्, रॅकेटस् व नेटस् इत्यादि सर्व प्रकारचा इंग्लिशमेकचा माल मिळेल. कोहिनूर रबर कंपनीचा रबरी माल मिळेल व ऑर्डरीनुसार लेझीम, डम्बेलस् इत्यादि माल तयार करून मिळेल.

**गिऱ्हाइकांचा संतोष हेंच आमचें ध्येय.**

प्रोपा:- ज्ञानेश्वर इंगळे.




# आक्रंदन— ( लघुकथा )

लेः— भा. न. चौधरी ( प्रथम-वर्ष, विज्ञान-विभाग अ. )

लगबगीने ताटावरून उठून ठोमरे मास्तरांनी कपडे घातले अन् जंगली महाराज रोडच्या बसस्टॉपवर येऊन बसची मार्गप्रतीक्षा करीत ते थांबले. बस क्षणार्धांतच आली अन् ठोमरे मास्तरांना शाळेच्या फाटकांत टाकून चालती झाली. ठोमरे मास्तरांना १० व्या इयत्तेवर पद्याचा तास होता. आणि अजून त्यांच्या तासाला अर्धा तास वेळ होता. एवढ्या वेळांत शिकवावयाच्या भागावर ओझरती नजर फिरवावी म्हणून त्यांनी नव्याने नेमलेलं पुस्तक उघडलं आणि कविता वाचत असतां शेवटच्या ओळींवर त्यांची नजर खिळली.

" येईल का ऐकूं तिला
आक्रंदन हें त्याचें
होइल का सांगा कधी
मीलन त्या दोघांचें "

विजेचा धक्का बसून क्षणिक वेदना व्हाव्या व त्यापासून माणूस एकदम दूर फेकला जावा तसंच ठोमरे मास्तरांचंहि झालं. त्यांचीं गात्रं निर्बल होऊन पुस्तक तसंच जमिनीवर गळून पडलं व चेहऱ्यावर विषण्णतेची स्पष्ट छटा उमटली. त्यांनी खुर्चीचा आधार घेऊन धडधडणाऱ्या छातीवर हात ठेवला. अशा त्यांच्या अंतरंगांतील आंदोलनांत बेल केव्हा होऊन गेली याची त्यांना शुद्ध राहिली नाही. वर्गातील एका मुलाने येऊन " सर पीरिअड् घेतां ना " ? असं जेव्हा त्यांना विचारलं, तेव्हा ते भानावर आले अन् " चल आलोंच " म्हणुन त्याची रवानगी केली.

बालकांना जशी आपल्या आईची ओढ असावी तद्वतच ठोमरे मास्तराबद्दल मुलांना विलक्षण आकर्षण होतं. वर्गातील अत्यंत उनाड पोराला देखील त्यांच्याबद्दल नितान्त आदर वाटायचा. पोर्णिमेच्या शुभ्र चांदण्यांत कितीही वेळ बसून जशी तृप्तता होत नाही, तसंच ठोमरे मास्तरांचा तास संपला तरीहि मुलांचें समाधान होत नसें. आणि याला कारण म्हणजे ती अंतर्बाह्य शुद्ध नि पवित्र, मंद स्मित करणारी उत्साही विद्वान व्यक्तिच !

आज मास्तरांनीं जरा गंभीरतेनेच वर्गांत पाऊल टाकलें. त्यामुळे वर्गांतील खळकर वातावरण क्षणार्धांतच विलीन होऊन सर्वत्र गंभीर शांतता पसरली. मास्तरांनी हलक्या आवाजांतच बोलायला सुरवात केली.

" मुलांनो आजची कविता रम्य तर आहेच खरी परन्तु त्याबरोबरच विचारचक्राला गतिहि देणारी आहे. एक चक्रवाकाचें युग्म ( चक्रवाक दांपत्य ) दिवसभर हृदयाला हृदय लावून, नाचून बागडून आयुष्यांतील जीवनरस स्वैरपणें यथेच्छ सेवन करतात. आणि हें त्यांचें सुख, आनंद व निर्व्याज प्रेम निसर्गाला पाहवत नाही म्हणूनच की काय निसर्ग सर्वत्र निबिड अंधःकार पसरवितो. भेसूर नि उग्र असं रूप रजनी धारण करते. आणि एकमेकांना प्राणप्रिय असणाऱ्या या प्रेमी जोडप्याच्या डोळ्यांत काळाकुट्ट अंधार शिरल्यामुळे, केवळ एका पानाआड असूनहि ते एकमेकांना पाहूं शकत नाहीत. या जोडप्याला भविष्यकाळाची जाणीव नसल्यामुळे ती प्रदीर्घ रात्र विरहाने व्याकूळ होऊन ते पक्षी मीलनाकरता अत्यंत करुण असं रुदन व आक्रोश करून घालवितात. भावनाशील माणसाला दुःख हा संसर्गजन्य रोग जडत असल्यामुळेच की काय कवि ते दृश्य पाहून हळहळतो, आणि या दांपत्याचं मीलन होऊन त्यांच्या हृदयाची तगमग थांबेल की नाही असा प्रश्न करतो. मुलांनो, जगांतहि असंच घडत आहे. हें नीतिशून्य नि निर्घृण जग निष्पाप, कोमल जीवांना असंच खाली खेचून रक्तबंबाळ करतं. परन्तु जगाने माझ्या मार्गांत जरी निखारे पसरून ठेवले तरी मी.........मी........."

मास्तरांचे डोळे अग्नि ओकत होते, चेहरा भेसूर झाला होता. आणि अवयवाचा थरकांप होत होता. घंटेच्या टोलाने ते भानावर आले; आणि आपण हें काय बोलून गेलों म्हणून मनांतून थोडे चरकले देखील ते. " बरं ! बाकीचा भाग पुढील तासाला पाहूं " असं म्हणून त्यांनी वर्गांतून काढता पाय घेतला.

दुखण्याने पछाडलेल्या रोग्यासारखे मास्तर तेव्हाच घरीं येऊन पोहोचले व बिछान्यावर अंग टाकून त्यांनी छपरावर नजर स्थिरावली. तारुण्यांतील विफल प्रेमाने झालेल्या त्यांच्या हृदयाच्या जखमेवरील खपली आज सहजगत्या निघाली होती. अशा विषण्ण मनःस्थितींत भूतकाळांतील जीवनचित्रपटांचीं रंगीबेरंगीं चित्रें त्यांच्या अंतश्चक्षुपुढून भराभर सरकूं लागलीं.

x x x x

सुहास ठोमरे म्हणजे या अफाट जगांत पंख तुटलेला पक्षी होता. वयाचीं पांच वर्षें पुरी होतात न होतात तोंच त्याच्या दुर्दैवी मातापित्यांनी परलोकाचा रस्ता धरला. सुहासला साऱ्या जगांत एकचएक प्रेमाचं माणूस होतं आणि ते म्हणजे त्याची मावशी. मावशीने स्वतःचें दुःख पोटांत घालून सुहासला आपल्या उबे-खालीं जोपासले. पण संकटें येतात तीं सर्व बाजूंनीच. सुहास मॅट्रिक होऊन भावी जीवनाचं यशोमंदीर गाठ-ण्याच्या विचारांत व्यग्र होतो न होतो तोंच एकाएकी मावशीहि जगाला सोडती झाली. आपला एकुलता एक आधारहि काळाने काढून घेतल्यामुळे सुहास अगदीच निराधार झाला. मावशीच्या अप्रत्यक्ष तिच्या घरांत राहणें सुहासला अशक्य झाले. आणि एक दिवस पाणावलेल्या डोळ्यांनी सुहासने जळगांवला अखेरचं वंदन केलं.

आगरकर, टिळक, शिवाजी या महान विभूतीच्या पदधुलीने पूनीत झालेल्या पुण्यनगरींत जाऊन या महान पुरुषांच्या आशीर्वचनांनी जीवनांत कांही करतां आलें तर पाहूं या, या उदात्त हेतूने सुहासने पुण्यांत पाऊल टाकलं. महाराष्ट्राचं, सरस्वतीचं माहेर आणि महान लोकांना जन्म देऊन पुलकित झालेल्या नगरीने सुहासच्या जीवनप्रवाहाला विशिष्ट वळणच दिलं. पार्टटाईम सर्व्हिस आणि मिळविलेल्या स्कॉलरशिप्स्वर कसातरी उदरनिर्वाह करून या ध्येयवान तरुणाने प्रतिकूल परिस्थितीलाहि न जुमानतां पहिल्या वर्गांत बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण करून घेतली. त्याच्या बुद्धीच्या प्रखरतेचा चोहोकडे गवगवा होऊन धन्यवादाचें ऋण त्याच्या पदरीं ओसंडू लागलें.

सुहासला लागलीच हायस्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी मिळाली; आणि त्याच्या जीवनाला थोडे स्थैर्य प्राप्त झालें. डेक्कन जिमखान्यावरील एका लहानशा बंगलींत छानदार खोली घेऊन तो राहूं लागला. [illegible] पुढे पुढे आपल्या रम्य जीवनांत त्याला कसली [illegible] उणीव भासूं लागली. एकटेपणाचा त्याला कंटाळा [illegible] आणि वरचेवर "निष्प्रेम चिरंजीवन तें, जगीं [illegible] ओ[illegible] लाहि मिळतें— धिक् तया।" या [illegible] गंभीरतेने म्हणूं लागला.

आणि एके दिवशीं सुहासच्या इच्छेला दैवा[illegible] दिला. त्याचं सुदैव म्हणा, वा दुर्दैव म्हणा, नवरे [illegible] लांच्या कुटुंबाशीं त्याची ओळख झाली. प्रथमदर्श[illegible] कुटुंबानें सुहासवर प्रेम आणि भक्ति यांचा [illegible] वर्षाव केला. सुहासच्या व्यक्तिमत्वाची त्या [illegible] चांगलीच छाप बसली. नवरे वकिलांची थोरली [illegible] मृणालिनी इंटरच्या वर्गांत शिकत होती आणि [illegible] प्रमोद इंग्रजी आठव्या इयत्तेंत होता. जसजसा [illegible] परिचय वाढत गेला तसतसा सुहास त्यांना अधिक [illegible] हवासा वाटूं लागला. शेवटी प्रमोदची शिकवणी [illegible] नवऱ्यांनी सुहासला विनंती केली व ती त्याने [illegible] मानून मोठ्या आनंदाने मान्य केली.

सुहासला प्रणयाच्या परिपूर्ततेची उणीव [illegible] किंवा नसो परंतु त्याने मनाची तगमग थांबविण्या[illegible] इष्काचा जहरी प्याला जाणून बुजून तोंडाला [illegible] शिकवणीच्या निमित्ताने मृणालिनी व सुहासच्या [illegible] तील प्रेमांकूर नकळत वरवर येत होता. [illegible] राज्यांतील दोन तरुण मनं एकत्र यायला कितीसा [illegible] लागणार ? शेतांतून दमूनभागून आलेल्या तृषार्त [illegible] ओढ जशी पाणवठ्याकडे असावी तद्वतच [illegible] सुहास मृणेकडे धांव घ्यायचा व मृणाहि [illegible] येऊन त्याचं स्वागत करायची. अशा रीतीने [illegible] प्रवाहाप्रमाणे त्यांची प्रीति वाढत गेली. [illegible] प्रसंगनिष्ठ मार्मिक विनोदावर व गाण्या[illegible] मृणालिनी मोहीत झाली होती. व असा[illegible] आपल्या जीवनांत नवचैतन्यमय बगीचा फुलवील [illegible] तिला खात्री वाटत होती. तद्वतच सुहासला [illegible] कीं, आपल्या रुक्ष नि भकास जीवनांत [illegible] सर्वांगसुंदर व सुसंस्कृत मुलगीच गोड [illegible] करून संसारनौका पैलतीरीं पोहचवील. भवि[illegible] तील रम्य सुखस्वप्नें रंगविणारी ही [illegible] फर्ग्युसन हिलवरील चांदण्या रात्रींत [illegible] "प्रेम आणि मरण" या कवितेचें रसग्रहण [illegible] तासन्तास घालवीत.



सुहास मृणालिनीला नेहमी म्हणायचा— "मृणे मला भीति वाटते कीं, आपलं प्रेम पाण्याचा क्षणभंगूर बुद्बुद् तर नाही ठरणार ना ? आपली प्रीति सकाळचं रम्य स्वप्न ठरून, विरून तर नाही जाणार ना ? कारण मृणे लोक म्हणतात त्याप्रमाणे प्रेम हें आंधळं असतं, वेडं असतं. तारुण्याच्या उन्मादांत तरुण मनं सारासार विचार न करतां प्रेमाचं यशोमंदीर गाठण्याचा दुर्दम्य आशावाद बाळगतात. परन्तु जेव्हा हें बाजारी नीति-शून्य जग त्यांच्या मार्गांत अडथळे निर्माण करतं तेव्हा त्या दोन मनांतून एकादं मन असह्य जाचाला कचरतं, आणि ठेंच लागून रक्तबंबाळ झालेल्या पायाच्या वेदना जेव्हा जीवाला होरपळतात तेव्हा तें मन यशस्वी माघार घेतं. आणि दुसरं मन विफल प्रेमाने व्याकूळ होऊन आंतल्या आंत गुदमरतं व जन्मभर करुण असं आक्रंदन करीत बसतं."

त्यावर मृणालिनी केविलवाणी होऊन त्याला निरुत्तर करी— "सुहास, माझ्या घराण्याचा नांवलौकीक, माझी श्रीमंती, माझ्या वडिलांची प्रतिष्ठा, आपल्या प्रेमाला ग्रहण लावील असं जर तुम्हांस वाटत असेल तर तो आपण उगीच बाऊ घेऊन बसला आहांत. Woman like water finds her own level असं जर तुमचं मत असेल तर आजपर्यंतच्या सहवासांत माझ्या अंतःकरणाची हीच कां खोली अज-मावली ? आणि सुहास, दैवाच्या प्रतिकूलतेने तसंच जर कां घडायचं असलं तर माझं मन जागृत असेपर्यंत पतंगासारखी दिव्यावर झडप घालून आत्मार्पण करायला मागेपुढे पाहणारी कच्ची प्रणयिनी नाहीं मी." आणि यावर त्यांच्या डोळ्यांतून ओघळणारे दोन तप्त अश्रू त्यांच्या प्रणयाच्या परिपक्वतेची ग्वाही देत.

मृणालिनीने इंटर पास झाल्याबरोबर शिक्षणाकडे दुर्लक्ष केलें. वसंत ऋतूने बहरलेल्या विस्तृत आम्रवृक्षा-वर, लहानसं खोपटं बांधून सुहासच्या बाहुपाशांत कालक्रमण करण्यास ती आतुर झालेली होती. आणि एक दिवस, मृणालिनीच्या उत्तेजनाने व धीर गंभीर शब्दांनी सुहास मनोनिग्रह करून व सर्व बळ एकवटून नवरे वकीलासमोर गेला व हळूच विनयाने म्हणाला— "भय्यासाहेब, मृणा व मी विवाहबद्ध होण्याचं ठरविलं आहे. आपली जर हरकत नसेल तर आम्हाला आशी-र्वाद देऊन आपल्या थोर पदांची सेवा करण्याची संधि आम्हांस देऊन उपकृत करा."

थोडावेळ वादळापूर्वींची शांतता दिवाणखान्यांत पसरली होती. नवरे साहेबांचा चेहरा संतापाने नुसता लालबुंद झालेला होता. लाव्हारस एकदम उसंबळून बाहेर यावा तद्वतच ते सुहासवर ओरडले— "गाढव कुठला. जिथं खाल्लंस तिथं बेइमानी केली. आमच्या सुखी संसाराचं वाटोळं व्हावं म्हणूनच तुझीं पावलं या घरांत टाकलीस काय ? लहान तोंडीं मोठा घास घेतांना तुला लाज कशी वाटली नाही ? निसर्गांत तरी हिरा आणि कोळसा बरोबरीनं राहूं शकतात काय ? ज्याला ना घरदार ना मानप्रतिष्ठा अशा यत्किंचित शाळा मास्तराला सुविद्य, सुंदर नि नामांकित वकिलाची मुलगी मिळेल, हा स्वप्नांतला आभास तुला कसा उमगला नाही ? हिरा राजेरजवाड्यांच्या व थोर विद्वानांच्याच डोक्यावर शोभिवंत दिसतो, तुझ्यासारख्या पोटाकरिता देशोधडीला लागलेल्या फटिंगाच्या नाही ! प्रेमाचं लटकं मृगजळ दाखवून तरुण मुलींचीं मनं जिंकणं सोपं, परन्तु त्या मिळविणं फार कठीण असतं समजलास ? चल, चालता हो ! पुन्हा या घरांत तुझं पाऊल नको."

सुहासच्या मृदु भावनावश अंतःकरणावर कठोर, क्रूर घणाचे घाव बसत होते. त्याचीं ज्ञानेंद्रियें बधीर झालीं होतीं. त्याने एक करुण कटाक्ष साऱ्या दिवाणखान्यांतून टाकला व अडखळत पण उद्विग्न अवस्थेंत नवरेंच्या घरांतून काढता पाय घेतला. आणि आंतून त्याच क्षणीं हृदयाला पीळ देणारा दुःखपूर्ण हुंदका त्याच्या कानीं पडला. नवरे वकिलांनी दोन निष्पाप नि निष्कलंक फुलांचा चोळामोळा करून मातींत मिसळविला होता. पेशाला अनुरूप असं त्याचं मन कठोर आणि न्यायाला अन्यायी ठरविणारं झालं होतं. त्या दोन जीवांचं विव्हळणं, ते त्याचं रुदन जाणायला ते थोडेच कवि होते !

थोड्याच दिवसांनी सुहासच्या कानीं मृणालिनीच्या लग्नाचें कर्णमधुर संगीत पडलें. मृणालिनी आता जज्जांची गृहिणी झाली होती. यत्किंचित शाळा मास्तराकरिता जन्माला आलेली नव्हती ती-राजमहालाच्या वैभवांत दंग असलेल्या मृणेला संगीताच्या सुस्वर लकेरींत, झोप-डींतल्या कपाळभद्री सुहासच्या हृदयाचें आक्रंदन ऐकूं येत असेल कीं नाही ते फक्त प्रीतीचे गोडवे गाणाऱ्या

मानसशास्त्रज्ञांसच माहीत. कठोर परिस्थितीने सुहासच्या जीवनावर भयंकर आघात केल्यामुळे आधीच तो मुखदुबळा नि एकलकोंडा झालेला होता. जगाशीं समरस व्हायला त्याला त्याच्या भावनांशीं, आचारविचाराशीं समरस होणारी गृहिणी हवी होती. केवळ संसार हा दोन जीवांचा भातुकलीचा खेळ व्हावा म्हणून नव्हे तर त्यांत दोन आत्म्यांचं मीलन होऊन जीवनांत स्वर्गीय नंदनवन निर्माण करतां यावं या हेतूनेच मृणालिनीशीं विवाह करण्याचं त्यानें मुक्रर केलं होतं. पण त्यांतहि वैफल्य त्याच्या पदरीं पडलं. यौवनाच्या प्रवाहांतील प्रीतिसागराकडे जाणारीं दोन लाकडं एकत्र आलीं परन्तु दैवाच्या प्रतिकूल वाऱ्याने तीं पुन्हा एकमेकांपासून दूर झालीं असंच त्यांच्या प्रीतीबद्दल म्हणता येईल.

x　　x　　x

आयुष्याचीं तीन तपं उलटून गेलीं तरी ठोमरे मास्तर लग्न कां करत नाहींत यांतील गूढ अजून कोणाला उमगलेलं नाहीं. कोणी त्यांना विचारलंच तर ते हसत उत्तर देतात— "अरे बाबा, निदान माझ्या बाबतींत तरी–माझ्या पाठीवर विलायतेचा शिक्का अ… शिवाय मला वैवाहिक बाजारांत कोण विचारतो… पण त्या हसण्याच्या पाठीमागे असलेले विदारक… फार थोड्यांना कळलं असेल. समाजांत 'सर्वे… कांचनमाश्रयन्ति' हें जोंपर्यंत खरें आहे तोपर्यंत… हिरा कोळशाच्याच भावाने विकला जाणार याची ज… किती जणाला असेल?

दुसऱ्या दिवशीं ठोमरे मास्तर नव्या उत्सा… शाळेंत गेले. तोंच त्यांच्या कानावर मुलांचा आ… आला— 'ठोमरे मास्तर म्हणजे आपल्या शाळेला… लेला हिरा आहे बुवा खरोखर. काल त्यांनी… कवितेचं विवरण किती सुंदर केलं नाहीं!' अ… लागलीचं मुलं ती कविता गुणगुणायला लागलीं.

" येईल कां ऐकूं तिला
आक्रंदन हें त्याचें
होईल कां सांगा कधीं
मीलन त्या दोघांचें "!



अडला हरी—

व्यंगचित्रकारः— खान्डोळे



# शिकार— ( शिकारकथा )

लेखकः— वसंत पवार ( प्रथम वर्ष, शास्त्र विभाग )

आज साऱ्या गांवांत अेकच गडबड उडालेली दिसत होती. जिकडे तिकडे आनंदाचें व हर्षाचें साम्राज्य पसरलेलें होतें. त्याच बरोबर प्रत्येकाच्या चेहऱ्यावर किंचितशी अभिमानाची छटासुद्धा पसरलेली दिसत होती. पुरुष मंडळी आपले ठेवलेले राखीव पोषाख करून पाटलाच्या वाड्यावर निघाली होती. आयाबाया ठिकठिकाणीं जमाव करून कौतुकाने पाटलाविषयी बोलत होत्या. मुलांनी तर हर्षाचा कळसच गांठला होता. आणि याचवेळीं भाऊराव पाटलांच्या वाड्यांत तोबा गर्दी उडाली होती.

दाराशींच महार डफडी बडवण्यांत गुंग झाले होते. अेकजण मधुनच भेर फुंकीत होता. बैठकीवर कांही बडे लोक बसले होते व इतर लोकांनी तर सबंध वाडाच व्यापून टाकला होता. आणि मध्यभागी या सर्व आनंदोत्सवाचें कारण, अेक लांब रुंद अशा बिबळ्या वाघ पडलेला होता. या वाघाने आसपासच्या बऱ्याच खेड्यांना अतिशय त्रासून सोडले होते; त्यामुळे सर्वांनाच त्याच्या शिकारीची बातमी ऐकून अतिशय आनंद झाला होता. आजूबाजूच्या खेड्यांवरील लोक त्यास पाहाण्यासाठी आले होते व येत होते. आणि स्वतः भाऊराव पाटील त्यांचें अगत्याने स्वागत करीत होते. प्रत्येक जण भाऊराव पाटलांकडे आदराने पाहत होता व त्यांचीं तोंड भरून वाहवा करीत होता.

याचवेळीं अेका कोपऱ्यांत कांही मंडळी झाल्या प्रकाराबद्दल चर्चा करीत बसली होती. अेकजण म्हणाला, "बाकी भरून पंधरा ईस वर्सांत इकत मोठं जनवर आपुन नव्हतं पाह्यलं बा." "आरं भलताच माजला व्हता कीरे. च्यार आठ दिवसांतनं योक तरी जनावर अक्षी कमी व्हायाचं आपल्या गावांतनं, आन् बाजूच्या गांवांतबी लई धुम केली व्हती बेट्यानं. काय हिंमत हाय आपल्या पाटलाची! समद्रे शाबाक्षी दून राह्यलेत त्यास्नी." दुसऱ्याने माहिती पुरविली. त्यावर तिसऱ्याने पाटलाच्या बहादुरीचें वर्णन करीत म्हटलें, "आन् दोनच गोळ्यांत लोळवलारं अगदी! काय तरी व्येस नेमबाजी हाय्. कारं तुळश्या?" "आरं नेमबाजीला काय पानं हाय् ह्यो वाघ तर धावत व्हता तवाच हानला कीं नेम. नेम पण नेम. याला म्हणतात नेम." तुळश्या चिलमींत तमाखु भरीत म्हणाला.

यावर इतका वेळ गप्प बसलेला म्हातारा पिराजी भिल भाषणांत प्रथमच भाग घेत म्हणाला, "अक्षी बापावानी व जातीवान निघाला पघा. देवराव पाटलास्नीबी शिकारीचा लई नाद! कुठं कुनीबी वाघाची बातमी आनली रं आनली का निघालेच बंदूक घ्यून. कैक वक्ताला जीवाचा धोकाबी आला. वर ढंगारीच्या वाघनळींत आलेला परसंग लई वंगाळ. नवा जनमच झाला व्हता तवा पाटलाचा. आजुनबी ती गोठ कालच घडल्यागत वाटते पघा." यावर महाद्या हळूच त्यास बोलते करण्याच्या इराद्याने म्हणाला, "आरं सांगतरी आजुबा समदं; काय झालं ते." आणखी दोघातिघानीं व नंतर सर्वांनींच आग्रह केल्यामुळे म्हाताऱ्यास सांगणें भागच पडले.

"भर ज्वानींत व्हतों म्या त्या वक्ताला, "पिराजीने घसा साफ केला, चिलमीचा अेक मोठा दम मारला व ती काथ्थाजवळ देत पुढे सांगूं लागला, "मी म्हंजे पाटलाचा जेवना हात. कुटंबी जाया झालं का पाटील माझ्याबिगर हालायचं न्हायी. तुमास्नी ठाव हायच की आपली वाघनळी आन् तिच्या आजुबाजुचे ते बन वाघासाठीं केव्हढं परसिद् हाये. तवा कुनी ना कुनी हपीसर अक्षी आपल्या पाटलाकडं आठ च्यार महिन्याला ठेवलेलाच असायचा. अेकदा आसाच येक परान्त साब आला व्हता शिकारीला. भिव्यानं मोड पाहून आनली आन् दुसऱ्या दिशी समदे हाकावाले, अेक दोन शिकारी कुत्रें, पाटील आन् परान्त समदे निघाले. जंगलांत योका झाडावर मांदली खाट. तिच्यावर बसले पाटील आन परान्त आन् च्यारी बाजुनं हाका सुरू केल्या.

योकसारखं आसं आर्धा घंटा झाल्यावर कुनीतरी आवाज दिला ‘ वाघ आला, ध्यान ठेवा. ’ वाघ पाटलाच्या म्होरनं जाऊं लागला तसा परान्तास पाटलानं ईसारा केला तर त्यो भला भक्कम वाघ पाहून परान्ताचें तं सात गेले आन् पाचंच राह्यले. त्येनं ठेवली बंदूक खाली. पर पाटील हिमतीचा पुरा. त्येनं धरली बंदूक आन् दिला आवाज ठयून. पर त्या दिवशीं तकदीरच खवाट. मानेवरला घाव म्होरच्या फऱ्यावर बसला. त्या बरोबर वाघ जोरानं डराकला, उंच उडाला आन् खाली येतांच योकसारखं बनांत पळत सुटला. जरा येळानं त्येचं डराकनंबी वंद झालं. मंग पाटील उतरल्यावर त्येची मोड पात पात म्होरं निघालों. समद्यांचं म्हननं कीं, म्होरं जान्यांत धोखा हाये. पर पाटलापुढं समदं फुकाट.

आखेर लई दूर गेल्यावर योक नळा गवसला आन् हिथंच मोडबी सरली.. पर भाईरून कायबी दिसेना. कोनाला काअी समजेना. पाटील परान्त लई मागं व्हते. इकल्यांत मला योक युक्ती ध्येनांत आली. माझं कुत्रं व्हतंच माझ्या बरुबर. त्येला योक दगड दावला आन् धिला नळयांत फेकून. त्या बरुबर कुत्रं मधी घुसलं आन् तवरून वरडत वरडत भाईर पळत आलं. आन् त्येच्यामागनं वाघ ! वाघानं माझ्या आंगावर झेप घेतली, पटकन् म्या धिला माझा हात त्येच्या तोंडांत आन् सुरूं झाली आमची कुस्ती. माझा हात रगतानं लाल झाला मांडीवर आन् दंडावर नखबी लागले. पर माझं कुत्रं लई ईमानी, धन्यास्नी वाघानं धरलेलं पाताच त्येनं वाघाची शेप आशी जोरानं चावली की पटकन वाघानं मला सोडलं आन् कुत्र्याच्या मागं लागला.

कुत्रं पळत पळत टेकडी चढून गेलं त्याच टेकडीच्या दुसऱ्या बाजुनं पाटील येत व्हते. वाघाची आन् त्येंची मुलाखत झाली बराबर टेकड्याच्या माथ्यावर. तवरून पाटलावर वाघानं कुदी मारली. वखत बाक देखून पाटलानंबी धिला डावा हात त्येच्या तोंडांत ! पर बंदुक काय चालवाया फावेना. परान्त जोळ उभा पर करनार काय ? गोळी झाडू म्हनतो आन् चुकून पाटलास्नीच लागली तर ? इकडं पाटलानं नेटानं बा[…] खाली केला. पर दोगंबी गडबडत गडबडत खा[…] लागले. योकदा वाघ वर तवा पाटील खाली आन् पा[…] वर तवा वाघ खाली. समदे लोक वरडत व्हते कै[…] म्होरं झाले पण काईबी उमजेना. समद्यांचे जीव डो[…] आले व्हते.” इतके म्हणून म्हातारा थांबला. त्या[…] लागला होता. थोडा वेळ थांबून त्याने तुळश[…] केलेल्या चिलमीचे दोन तीन दम मारले व ती म[…] देत तो धुराचे भपकारे मंडळीवर सोडूं लाग[…] इतक्या वेळांत उत्सुकता अनावर होवून कुण्या[…] “ मंग पाटलाचं काय झालं ? लवकर सांग.” […] म्हातारा त्याचकडे नजर वळवित म्हणाला, “[…] थांव तरी प्वारा. सांगतों कीं; खरी बहादरी आन्[…] तर म्होरंच हाये. हा, कुटवर आलों व्हतों बरं आ[…] पाटील आन् वाघ गरबडत गरबडत व्हते म्हाअी[…] बरं, बरं, इतक्यात देवाने खैर केली आन् योका[…] राला पाटील आडला, वाघबी आडला पर त्यो[…] व्हता. जराश्या करतां पाटील वर झाला. आन् ब[…] बंदुकीची नळी घातली वाघाच्या जाबड्यांत […] उजव्या पायाच्या आंगठ्यानं दाबला घोडा. […] काम बराबर केलं. सगळयास्नी डोक्यावरलं […] उतरल्यागत झालं. समदे म्होरं धावले. पर पाटल[…] वाघाच्या जबाड्याच्या वासानं चक्कर आली.

आखेरी थोड्या येळानं पाटील सुद्धींत आ[…] संग वाजत गाजत गांवामंधी आलों. रातची सम[…] प्वाटभर दारूबी धिली आन् सरूपा जेजुरीक[…] नाचनं वजावनंबी झालं.”

अव्हढे सांगून झाल्यावर म्हाताऱ्याने सग[…] अेक नजर टाकली. सगळे अेकण्यांत अगदी […] झाले होते जणूं ते नुकतेच त्या प्रसंगांतून […] आल्याप्रमाणे प्रत्येकाची मुद्रा दिसत होती. थोडा […] कोणीच कांही बोलले नाही. इतक्यांत शेजारच्या […] हून आलेल्या खाँसाहेबांनीं पेटीच्या सुरावर […] काढला व तबल्यावर थाप पडली आणि सर्वांच्या […] तिकडे वळल्या.

---



# म्हणे मला मत द्या !

## ( नाट्यछटा )

लेः—मधुकर रामचंद्र शुक्ल ( प्रथम वर्ष, कला विभाग )

भिक्या ऽ ! ए भिक्या— कोणी दिली ही चिठ्ठी ? कोण ? चष्मेवाला होता ? बारका नि उंच ? बरं, बरं, जा तूं तुझ्या कामाला. कोण असावा बरें ! अँ ! कोण नाम्या कोरडे ! काय म्हणतोय् लेकाचा. ‘ मतदारास जाहीर विनंती-आँ ! निवडणूक ? मत ? फिरलं डोकं ! सकाळपासून मोजुन सोळाजण दादा बाबा करून वाढेला लावले. आता ही ब्याद. जाहीर विनंती करायला निघाला आहे. बदमाष, हलकट, बुडव्या ! गेल्या वर्षांची २५ रुपयांची बाकी अजुन देत आहे ! ह्या निवडणूकांना उभ्या रहिलेल्या उमेदवारांचा काय भरवसा ? सांगतील एक आणि करतील दुसरेंच ! हा कोरड्या तर नंबर एकचा लफंगा ! एका वर्षांत पंचवीस रुपये देऊं शकत नाही; तर दिलेलीं आश्वासनं काय पाळणार ? म्हणे आम्हीं पगारवाढ करूं, द्विभार्याप्रतिबंधक कायदा रद्द करूं, अन्नाची आणि कपड्याची लयलूट करूं; खोटं ! साफ खोट ! चोर, लबाड, ढोंगी— अं ! कोण ? या या आंत या. आँ ! कोरडे ! अरे लेका, हा कसला फतवा काढला आहे ? बापाजन्मांत कधी निवडणूका लढविल्या होत्या का ? काय म्हणतोस ? बापाजन्मांत निवडणूकाच नव्हत्या अं ? तें कांही नाहे. म्हणे हमाल युनिअनचे कळकळीचे कार्यकर्ते ! अरे फेदरवेट चॅम्पिअना ! तुझ्याकडून एक पोतं तरी उचलवेल काय ? आणि खरंच ! तूं करणार काय लोकसभेंत जाऊन ? विड्या फुंकणार की पानपट्टी चघळणार कीं नीरेचे घोट घेणार ? मूर्खा, एवढी अक्कल नाही. दिलेलीं आश्वासनं पुरी करता येत नाहीत, तर कशाला दुसऱ्यांच्या शिव्या शापांचा धनी होतोस ? नाहीतरी लेका दुसऱ्याच्या शिव्या खाण्याचो तुला हौसच पहिल्यापासून ! बालवर्गापासून पहातोय ! पेन्सिली खाण्यापासून पैसे खाण्यापर्यंत तुझी प्रगति ! आणि आता दुसऱ्याच्या शिव्या खाण्यापर्यंत मजल मारणार हं ! अरे हो ! पण तुझें डिपाझिट कोणी भरलें ? पार्टीने ? बुडाली ! बुडाली पार्टी ! साफ बुडाली ! तूं निवडून येणार ? अरे ! प्रत्यक्ष श्रीकृष्णाने जरी परत पांचजन्य केला तरी तूं निवडून येत नाहीस. मोठा कळकळीचा कार्यकर्ता वाया चाललास कीं नाहीं ? बरं, हें बघ ! आता बोल, माझे पंचवीस रुपये कधी देतोस ? काय म्हणतोस ? सध्या अडचण आहे ? अरे, मग तूं निवडणुका कशा लढविणार ? काय म्हणतोस ? पार्टी खर्च करणार ? आणि तूं ? कांखा वर केल्यास कीं काय ? तें कांही नाही ! आता पुढे बोलायचें असेल तर आधीं पंचवीस रुपये टाक नि मग पुढे बोलणें ! आहे तयार ? अं हं, थांब बिम कांही लटपट चालायची नाही. लबाड लुच्चा ! मारे देशभक्तीच्या थापा मारतोय ! नीघ घराबाहेर ! परत आलास तर जोडे खाशील आता ! हुश ! गेला एकदांचा ! चिवट, चिकट, लोचट ! ‘ मत द्या ’ हें ऐकून डोकं फिरायची वेळ आली ! खून करावासा वाटतो एकेकाचा ! म्हणे मला मत द्या ! आँ ! आतां, आणखी कोण ? तुम्ही उभे राहिलेले उमेदवार कां ? जीव गेला तरी दारही उघडणार नाही. आणि मतही देणार नाहीं ! नव्हे जीवही देणार नाही आणि मतही देणार नाही ! कोण ? कोण आहे ? तूं होय ! मग ओरडतेस कशाला ? आधीं सांगायला काय झालं ? थांब हं ! उघडतोंच दार.

---

साहेब : कायरे, आज इतका उशीर का झाला तुला ?

कारकून : मी जिन्यावरून खालीं पडलों साहेब.

साहेब : मग तूं लवकर यायला पाहिजे होतास.

# अशोक इन्डस्ट्रीज, जळगांव

**७ पोलन पेठ, जळगांव, पू. खा.**

आर्डरीप्रमाणे मनपसंत साइझचे सामान तयार करून मिळण्याचे खानदेशांतील एकच ठिकाण.

आमचेकडे मशिनरीच्या सहाय्याने उत्कृष्ट डिझाइनची तयार केलेली स्टीलचीं कपाटें, तिजोऱ्या, कॅशबॉक्सेस व इतर सर्व तऱ्हेचा माल मिळेल.

**लिहा अगर भेटा.**

प्रोप्रा:- प्रभाकर छगन चौधरी.

# जगप्रसिद्ध ॲवकोचीं घड्याळें

सुंदर, मजबूत, अचुक वेळ,




म्हणूनच ॲवको

घड्याळें सर्व जगांत वापरलीं जातात.

★

खानदेशकरिता:- भारत वॉच कंपनी

जळगांव पू. खा.




# हिरव्या नोटा— ( लघुकथा )

लेः— नारायण जगताप ( प्रथम-वर्ष, विज्ञान-विभाग )

महादुला वाटे आपण आपल्या जीवनांत यशस्वी झालों. तो स्वतःला सुखी प्राणी समजे. शहादुवर त्याचें आणि जाईचें असीम प्रेम होतें. जाईच्या आणि महादुच्या आशा शहादुवर केंद्रित आल्या होत्या. एकुलता एक मुलगा त्याच्या मातापित्यांचें विश्रांतीस्थान बनल्यास नवल तें काय ? पण महादूच्या जीवनांत एकच आकांक्षा फलद्रूप व्हावयाची राहिली होती. त्याला हिरव्या नोटांचें फार आकर्षण वाटे. कां कोण जाणे, लहानपणा-पासून त्याच्या मनांतून एक फार मोठी इच्छा होती, कि खुपश्या हिरव्या नोटा हातांत घ्याव्यात, त्यांना गोंजारावे, कुस्करावे. किती वेडी इच्छा होती ती ! त्याच्यासारख्या गरीब टांगेवाल्याला हें कसें शक्य होतें ? पण महादूला आशा होती की आपली आकांक्षा कधीना कधी तरी फलद्रूप होईल. लहानपणापासून जतन करून ठेवलेल्या या इच्छेला त्याने आपल्या भावि आयुष्यांत देखील उराशी बाळगून तिची आठवण दृढ केली होती. त्याच्या या हिरव्या नोटांचे वेड त्याच्या व्यवसाय बंधूंना चांगलेंच परिचित होतें कुणी त्याची थट्टा करीत किंवा उपहास करीत. पण महादूला त्याची दाद ना पर्वा. या इच्छेतून त्याला कोडे सोडविण्याचा नाद लागला.

त्याच्या एका व्यवसायबंधूने नवीन टांगा खरेदी केला. महादूला खूप आश्चर्य वाटले. कारण तो टांगेवाला त्याच्या सारखाच गरीब असून त्याला नवीन टांगा घेण्या-ची ऐपत नव्हती हें महादूला माहीत होतें. तपासाअंतीं त्याला असें कळलें की त्याच्या व्यवसायबंधूला कुठल्या तरी शद्बकोड्याचें बक्षिस मिळाल्याने त्याला नवीन टांगा घेण्याची ऐपत निर्माण झाली. झाले ! या बातमीने महा-दूच्या विचारांना गती मिळाली. तो स्वतः फायनलपर्यंत शिकला असल्याने तो कोडे सोडविण्याच्या नादाला लागला. महिन्या काठी १०-१५ रुपये खर्च होऊ लागले. पण बक्षिसाची रक्कम २-३ रुपयाच्यावर जाईना. पण त्याची महादूला पर्वा नव्हती. निकालापर्यंत त्याला हिरव्या नोटांची स्वप्नें पडत हें काय थोडे होतें ?

आजही महादूचे पाय अभावितपणे स्टॉलकडे वळले. त्याच्या गतींत उत्साह नव्हता. महादूचा चेहरा निस्तेज आला होता. त्यांच्या मनांत द्वंद्व चालू होते. कालचे व आजचे असे ५ रु. खिशांत खुळखुळत होते. डॉक्टरचें बिल साचलें होतें. त्याने अगदी निक्षून सांगितलें होतें की निदान ५ रु. मिळाल्याशिवाय महादुला कुठलेंच औषध मिळणार नव्हतें. पोरगा तर घरीं आजारी होता. महादूचें मन त्याला बजावूं लागले, ' वेड्या, परत फिर. डॉक्टरचें बिल भर. कोडं काय पुढच्या पाळीला पाठ-वितां येईल. ' महादु पाय मागे घेणार तोंच दुसरें मन सांगू लागलें, ' अरे आज कोडें पाठविण्याचा शेवटचा दिवस ना ? मग पाठव कोडें. शहादु कांही इतका आजारी नाही. जर का हें कोडें चुकलें तर...' महादूच्या डोळयासमोरून हिरव्या नोटा हळूहळू सरकून अदृश्य व्हावयास लागल्या. दुसऱ्या मनाचा विजय झाला. तो स्टॉलमध्यें शिरला. रामलाल एजंटाने त्याचे हंसून स्वागत केले.

" ह्या पाळीला किती ॲन्ट्रीज पाठवणार ? " रामलालनें विचारले. " दहा " महादुने हसून प्रत्युत्तर दिलें. त्याने खिशांतून ॲन्ट्रीज भरलेले कागद आणि पांच रुपयांची चिल्लर काढली आणि रामलालच्या स्वाधीन केल्या आणि तो म्हणाला, ' हे बघा, रामलाल शेट, मी आज जरा घाईत आहे. तेव्हां कृपा करून पुढचीं कामें करून टाकाल काय ? "

" होय. करीन " रामलालने उत्तर दिलें. महादुने टांगा घराकडे घेतला. जाई त्याची वाट पहात दारांतच उभी होती. तिचा चेहरा निस्तेज दिसत होता. महादूला पाहतांच तिच्या डोळयांतून दोन ठिपें टपकलीं. महादूच्या काळजांत धस्स झाले. त्याने घाईनेच तिला विचारले. " अग तुला झाले तरी काय ? शहादुची तब्येत जास्त आहे होय ? "

जाईने होकारार्थी मान हलविली. त्याने तिला जवळ घेऊन तिच्या पाठीवरून हात फिरविला नि म्हटले, "

"अशी घाबरतेस कशाला ? होईल की तो बरा." व तिला दूर करीत तो आंतल्या खोलीत गेला. शहादुच्या गालाला हात लावतांच त्याला विस्तवाचा स्पर्श झाल्याचा भास झाला. त्याच्या डोळ्यापुढे काजवे चमकले. डॉक्टरांना बोलाविणें अत्यावश्यक होते, कारण शहादु तापाने नुसता फणफणत होता. आणि डॉक्टरांना बोलावयाचे म्हणजे त्यांच्या हातावर ५ रु. टिचविल्याशिवाय गत्यंतर नव्हते. त्याला वाटलें कुठून आपल्याला अवदसा आठवली आजच कोडें पाठविण्याची. पण झाल्या गोष्टीला इलाज नव्हता. बाण निसटला होता. शेजारी तर त्याच्याहूनही गरीब. त्यांच्या जवळ पैसे मागावयाचे म्हणजे भिक्षेकऱ्याजवळ भिक्षा मागण्यासारखे होते. महादुला कांहीच सुचेना. शेवटी त्याने ठरविले की, डॉक्टरालाच पाझर फोडूं या जाईचे सांत्वन करून त्याने डॉक्टर देशमुखाकडे जाण्याकरितां टांगा हांकलला.

"काय महादु बिल आणलेस काय ?' महादुला पाहतांच डॉक्टरांनी करड्या सुरांत प्रश्न विचारला.

"डॉक्टर कसंही करा, वेळ निभावून घ्या. पोरगा अगदी मरणाच्या दारांत अडकला आहे. फार उपकार होतील. माझ्या कातड्याचे जोडे करून घालीन तुमच्या पायांत." महादुनें करुणा भाकली आणि त्यांच्या पायाशी हात नेला.

"दूर हो. उपकार आतां फार झाले. माझे बिल प्रथम पूर्ण देऊन टाक नाहीतर तू मरो नाहीतर तुझा पोरगा मरो."

"डॉक्टर" महादू किंचाळून बोलला. डॉक्टरांनी त्याच्या वर्मावर घाव घातला होता." तुम्हाला यावयाचे नसेल तर येऊं नका पण असले अभद्र बोलूं नका दगडाला पाझर फुटेल पण तुम्हाला... हे शक्यच नाहीं"

"म्हावा" डॉक्टर मान वर करून मोठ्याने गुरगुरले. पण महादु तिथे होताच कुठे ?

जाई दारांतच उभी होती. त्याला एकटा पाहतांच तिनं दारांतच बसकण मारली. आणि ती रडक्या सुरांत म्हणाली, "धनी, नाही डॉक्टर तर नाहीं. त्या खालच्या आळींतल्या वैद्याला घेऊन या. तो बेशुद्धच झाला आहे.

महादु तसाच वेड्यासारखा वैद्याकडे पळाला वैद्याला घेऊन घरीं येतो न येतो तोंच जाईने आ[...] केला, "माझा शहादु" महादुने दारांतच [...] मारली नि डोक्याला हात लावला.

नंतरचे दिवस महादुला स्वप्नवत भासत जाईकडे पाहण्याचा त्याला धीर होत नव्हता. [...] वाटे शहादुचा मृत्यु आपल्या मूर्खपणामुळे [...] त्यामुळे त्याला चोरल्यासारखे वाटे. पण केंव्हा केंव्हा शहादुच्या मरणाचें खापर डॉक्टर देशमुखांच्या वर फोडी. त्याला प्रत्येक गोष्टीचा वीट यावयास [...] होता. त्याची मनःशांति पार ढासळून गेली [...] विचार करून त्याचे मस्तक सुन्न होऊन जाई. [...] वाटे साऱ्या मानवजातीविरुद्ध फिर्याद ठोकावी. पर[...] कडे भिक्षा मागावी, "माझा शहादू परत दे." [...] केंव्हा त्याला वाटे, डॉक्टराकडे जावे व त्याला [...] विचारावा. त्याला म्हणावे, "माझा मुलगा तूंच मार[...] त्याची किंमत भरून दे." मग त्याला स्वतः[...] कल्पनेचे हसूं येई. हृदयाच्या जखमा बुजतात हो[...]

त्याचें सारें जीवन आता यांत्रिक बनत [...] सकाळीं उठावे स्टेशनकडे धाव घ्यावी. मिळेल ते [...] पदरांत पाडून घ्यावयाची त्याची वृत्ती बनली [...] दुपारी जेवण करावें. घोंगडीवर थोडावेळ आड[...] पण झोप येतच नसे. विचार, विचार! तिन्ही [...] विचार! सायंकाळीं परत घरीं आल्यावर दो[...] खावे नि अंथरुणावर पडावे. जाईची सुद्धा तीच [...] स्थिती झाली होती. ती सर्व कामें निर्जीव बाहु[...] पार पाडी.

एक दिवस तो असाच विचार करीत स्टे[...] उभा होता. समोरून त्याचा व्यवसायी हातात [...] अंक घेऊन झाला नि त्याच्यापुढें फडकावून [...] "बेट्या, मजा आहे ५५० रुपयाचे बक्षि[...] कोड्याला."

हीच गोष्ट २ महिन्यापूर्वी घडली अस[...] महादुच्या आयुष्यांत ती एक मोठी पर्वणी [...] असती. पण आता महादु बदलला [...] त्याच्या इच्छा, आकांक्षा धुळीला मिळाल्या [...] त्याला आतां हिरव्या नोटाबद्दल वासना राहिली [...]



तो आतां जीवनाचे एक पान उलटविण्याच्या विचारांत होता तोंच परत त्याला मोहविणारी शक्ती प्रगट झाली होती. पण महादुने आतां तिचा पराजय करावयाचें ठरविलें होतें. त्याने क्षणभरच विचार केला नि दृढ निश्चय करून तो आपल्या पूर्व आयुष्यावर पडदा टाकण्याच्या विचाराने तेथून सटकला. त्याच्या सहकार्यांचे आश्चर्य वृद्धींगत झाले "काय माणुस आहे बुवा !" असे म्हणून तो कामास लागला.

इकडे महादु स्टॉलमध्यें शिरला त्याने रामलालशी एक शद्बही न बोलता हिरव्या नोटा मोजुन घेतल्या, त्या कुरकुरल्या पण हळुवारपणे नही तर आडदांडपणे, बेफिकीरीने, नि नोटा खिशांत जवळजवळ कोंबुनच रामलालला नमस्कार करून बाहेर पडला. रामलालाला त्याचें दुःख समजलें होतें. त्यानेही कांही न बोलतां महादुला निरोप दिला. महादुन आपला टांगा डॉ. देशमुखांच्या घराकडे वळविला. त्याच्या चेहऱ्यावर निश्चयाचें तेज दिसत होतें. तो झुंझार पणे आपल्या पूर्वायुष्यावर पडदा टाकण्यास निघाला होता.

महादु दारांतच थबकला. डॉक्टर मान खाली घालून हिशेब तपासण्यांत गुंग झाले होते. महादुला हसूं फुटले.

"डॉक्टर" तो जरा आवाज चढवूंन म्हणाला "तुम्हांला कल्पनाही नसेल तुम्ही माझ्या मुलाच्या मृत्यूला कारणीभूत झालात. कशाकरितां तुम्हीं अडून बसलात ? तुमच्या दमड्यांकरितां ? मी तुमची बाकी देण्यास आलों आहें. मला माहीत आहे ला उशीर झाला आहे. कांही हरकत नाहीं. मी तुम्हांला रकमेच्या दसपट पैसे मोजणार आहे. हे घ्या पन्नास रुपये" महादुने १० च्या ५ नोटा त्यांच्याकडे भिरकाविल्या. ते चकीत होऊन पहात होते.

"डॉक्टर, तुमच्या पैशाच्या लालसेकरिता माझ्या मुलाचा शहादुचा मृत्यु ओढवला, पण डॉक्टर, ध्यानांत घ्या, या सर्व पैशाची, घराची, तुमची, माझी, सर्वांची राख होणार आहे. पटत नाहीं तुम्हांला ? थांबा मी पटवून देतों" महादु निश्चळतेने बोलत होता. डॉक्टर आ वासून त्याच्याकडे पहात होते. त्यांच्या लक्षांतच येईना हा महादु आता पुढे काय करणार आहे ते? ते पाहूं लागले.

महादुने डाव्या हाताने काडी पेटविली नि उजव्या हातांत नोटा घेऊन, एक एक करून निश्चलतेने, गंभीरपणाने, निर्विकार चेहऱ्याने त्यांना काडी लावण्यास सुरवात केली. सर्व हिरव्या नोटा आगीच्या भक्ष्यस्थळी पडत होत्या. त्या बरोबरच महादु आपल्या इच्छेला तिळांजली देत होता. त्याने जाळ खाली टाकला नि डॉक्टरांना उद्देशून म्हणाला, "पाहिलंत ना पैशाची किती किंमत असते ती. जरा धडा घ्या." नंतर तेथून तो तीरासारखा निसटला. नव्या जीवनास प्रारंभ करण्यास निघून गेला.

डॉक्टर भानावर आले नि ते त्या जाळाकडे धावले. सर्व नोटांची राख झालेली पाहून त्यांच्या तोंडांतून अभावितपणे शब्द बाहेर पडला, "अरेरे !"



रडून रडून घर कसं मेल्याने डोक्यावर घेतलंय.

व्यंगचित्रकारः— खानझोडे.

# ‘तिने त्याला परि पाहिलेहि नाही’

[ लघुतमकथा ]

ले.:— त्रिंबक कानळदेकर

ठणाण ! ठणाण !! घंटा वाजली. भक् ऽऽ भक् ऽऽ करीत गाडी फलाटापाशी आली. तिसऱ्या वर्गाच्या डब्यांपाशीं नेहमीची खेचाखेच गर्दी सुरू झाली. उतरणाऱ्यांना खालीं उतरणं अन् चढणाऱ्यांस वर चढणं मुष्किल होत होतं कांही बहाद्दर खिडकीचा राजमार्ग पसंत करीत होते. “ जरा थोडं सरकतां का ? ” “ अजी जनाब ! जरा उठके तो बैठो ! क्या दिनमे सोते हो ! ” “ गाडी काय तुझ्या बापाची आहे ” “ कांही न्हाई म्होरल्या ठेसनांत उतरनं हायं ! ” अशा अनेक आवाजांची सरमिसळ त्या डब्यांत सुरू होती. एक म्हातारा एका तरुण पार्शीजरापाशी आला. “ जरा थाईच् जागा देतां का ? ” काकुळतेनं त्यानं त्या इसमांस विचारिलें. “ इतके लोक उभे आहेत दिसत नाही कां ? म्हणे जागा द्या. बस ह्या बाकाच्या खालीं ” तो ओरडला. दम्यानं खोकत खोकत म्हातारा दोन बाकांच्या मधील पेट्या वेडिंगांच्या ढिगाऱ्यांत बसूं लागला, तोंच,” “अबे! ओ ! वेडिंगपर मत बठना ” एक आवाज आला. “ बरं बाबा, खालींच बसतों नं ! ” म्हातारा पुटपुटला अन् मग त्याच्या खोकल्याच्या उबळीशिवाय कुणालाच त्याचं आस्तित्व जाणवलं नाही.

इतक्यांत, गाडी सुटायच्या वेळींच एक फ... आली. कसंबसं फुटबोर्डवरचं हॅण्डल पकडून ती ... आली अन् गाडी सुरू झाली. “ बरं झालं बाई ! ... तर गाडी चुकायचीच ! ” ती आपल्याशीच, ... रुमालाने घाम टिपतां टिपतां पुटपुटली. सर्वांच्या ... तिच्यावर खिळल्या. तिनंही एकवार डब्यांतल्या ... वांचं अन् मारवाडी स्त्रियांचं अवलोकन केलं. इत... मघाच्या तरुण पॅसिंजराचं “ सौंदर्य दाक्षिण्य ” उ... आलं, आपली जागा तिला मोकळी ... देत तो उद्गारला, “ बसा ना ! ” तीहि “ ... म्हणण्याच्या भानगडींत न पडतां त्याच्या ... जाऊन बसली. अन् तो वीर ( बिचारा ! ) ... गर्दींत धक्के खात उभा राहिला.

पुढचं स्टेशन आलं. ती उठली अन् वाट ... निघूनहि गेली. पण जातांना त्या गर्दींत ... धक्के खात उभ्या राहिलेल्या त्या तरुण पॅसिं... तिने पाहिलेहि नाही.

---

★ आपल्या स्वातंत्र्याचा उपयोग कोट्यावधि देशबांधवांना सुखी करण्यासाठी होऊं शकेल, पण केव्हा ? डोळ्यांत तेल घालून राष्ट्रीय चारित्र्याचें आपण संवर्धन करूं तेव्हाच. चारित्र्य हें केवळ नीतिपाठांतल्या पुस्तकांतील सुभाषित नाही. शहाण्या मुत्सद्याने त्याचा मनःपूर्वक पुरस्कार करावा, असा तो राष्ट्रोद्धाराचा श्रेष्ठ मार्ग आहे. चारित्र्य नसेल तर स्वातंत्र्य, शिक्षण, विद्यापीठें इत्यादि गोष्टींचीच नव्हे, तर प्रत्यक्ष आ... राज्यघटनेची किंमतसुद्धां रद्दींतल्या कागदापेक्षा अधिक ठरणार नाही.

—चक्रवर्ति राजगोपालाचार्य

★ आपला हिंदुस्थान देश एक दिवस जगांतील राष्ट्रामध्ये आपलें मानाचें योग्य तें स्थान पटकावणार, आपल्या स्वतःच्या प्रारब्धावर आणि परिस्थितीवर स्वामित्व मिळविणार हें निःसंशय. त्या दिवशीं ... आत्मिक स्वातंत्र्य लाभेल, आशासागरास भरती येईल, श्रद्धा कर्तव्यापासून विचलित होणार नाही, न्याय ... सर्वांना सारखेपणाने वागवील, बुद्धि निभ्रांत होईल, स्वातंत्र्याचा संपूर्ण विकास होईल आणि प्रेमभाव सर्व ... तोडून उचंबळूं लागेल. हें आपलें ध्येय आहे; आपल्या भविष्यांतील स्वर्गभूमि ती ही !

—न्यायमूर्ति ...



# अर्पण— पत्रिका. ( लघुनिबंध )

ले:— राजाभाऊ पाटील ( द्वितीय-वर्ष, कला-विभाग )

वेड म्हणा वाटल्यास माझें तें ! मलाही वाटतें माझें तें वेडच असावें. कोणतेंही पुस्तक हातांत येऊं द्या; कोणी त्यावरील तिरंगीं मुखपृष्ठ पाहील, कोणी प्रस्तावना वाचील; कोणी त्यांतील नायकनायिकांचीं नावें बघील, कोणी कांही पाहील, कोणी कांही पाहील. पण माझं वेड मात्र कांही औरच आहे. वेड ! खरंच वेडच आहे तें ! कोणतेंहि पुस्तक माझ्या हातांत येऊं द्या, मी प्रथम कोणती गोष्ट पहात असेल तर त्याची अर्पण–पत्रिका ! मग वेडच नाहीं का तें ?

तुम्ही विचाराल, “ काय हो एवढं असतं अर्पणपत्रिकेंत ? ” कांही, कांहीसुद्धा नसतं त्यांत हें खरं आहे. पण लेखकाच्या अंतरंगाचें प्रतिबिंब त्यांत पडलेलें असतें, हेंहि तितकेंच खरें. मला वाटतं लेखक आपल्या अर्पणपत्रिकेंत आपलें अंतरंग जितकें प्रगट करतो तितकें आंतील मजकुरांत करीत असेल की नाही कोण जाणे. हेच पहाना, कोणी आपलं मातृप्रेम प्रकट करण्याकरिता “ ती. मातोश्रीस ” म्हणून आदरानें लिहितो. कोणाला पिता अतिप्रिय असेल तर, “ परमपूज्य पित्याचें चरणीं अर्पण ” म्हणून सादर उल्लेख करतो; कोणाच्या अंगीं देशभक्तीचें वारें जास्तच असेल तो, “ मातृभूमीच्या चरणकमलीं ” आपलें पुष्प वहातो. कोणाला आपल्या गुरुजीबद्दल कृतज्ञता व्यक्त करावयाची असते, आणि म्हणून, “ ज्याच्या शिकवणीमुळे मी या पदीं आलों त्यांचें चरणी अर्पण ” म्हणून अभिमानाने गौरवितो. लेखक सनातनी असेल तर त्याच्या “ कुलदैवतास ” अर्पण करतो. कोणी लक्ष्मीची तर कोणी सरस्वतीची आराधना करतो.

पण कांही कांही लेखक, म्हणजे जवळ जवळ अलिकडील सर्वच लेखक, एका “ विशिष्ट व्यक्तीला ” आपली पुष्पांजली वहातात. आणि स्पष्टच लिहितात, “ माझ्या अर्धांगीस, ” “ माझ्या सहधर्मचारिणीस ” आणि लेखक अगदीच नवा असला तर स्वच्छच लिहितो, “ सौ. XX XXX यांना अर्पण ”. पण आश्चर्याची गोष्ट अशी कीं, लेखक “ तो ” असला तर “ ती ” ला अर्पण करतो; आणि आपलं प्रेम का काय म्हणतात ते प्रकट करतो. पण लेखक जर का “ ती ” असेल तर तिची अर्पणपत्रिका “ त्या ” ला नसतेच. ती तिसऱ्यालाच अर्पण केलेली असते. कारण त्यांच्या हृदयांत एक ! डोळ्यांत दुसरा !! मनांत तिसरा !!

पण लेखक जर का कॉलेजकुमार अगर कॉलेज कन्या असेल, मग तर मजा कांही औरच असते. कारण त्यांचें मन “ एका विशिष्ट व्यक्तीवर ” बसलेलें असतें. तेव्हा ते, आपल्या मनांत निश्चित केलेल्या देवाला अगर देवतेला, “XXX ला” म्हणून लिहितात. त्यांच्या अर्पण पत्रिकेंत त्यांचें अंतःकरण खऱ्या अर्थानें ओतलेलें असतें. अर्पणपत्रिकेबरोबर त्यांचें हृदय पण त्याच्या आवडत्या ‘ XXX ’ ला अर्पण करतात, म्हणूनच त्यांच्या अर्पणपत्रिका मला जास्त अर्थपूर्ण वाटतात.

पण सर्वांपेक्षा मला आश्चर्य वाटतें, तें माझ्या एका मित्राचें. दहा पुस्तकें समोर ठेवून त्यावरून त्याने एक नवीन कलाकृती (!) निर्माण केली होती. मला त्याने मदतीला बोलाविलें. मीही आनंदाने गेलों. बोलण्याच्या ओघांत त्याने चक्क सांगितले, “ हे बघा राजाभाऊ जर तुम्हीं मला सर्व प्रकारें मदत कराल, आणि पुस्तकाचा प्राथमिक खर्च भागवाल तर माझा हा ग्रंथ तुम्हांला अर्पण करीन. ”

माझ्या आशेचा चक्काचूर झाला. मी अगदी निराश झालों. हा गृहस्थ त्याचा ग्रंथ मला अर्पण करणार ! ग्रंथ कसचा, चोपडे होते तें. त्याला माझ्याविषयी प्रेम वाटत नव्हतें, जिव्हाळा वाटत नव्हता हें नक्की. माझ्या मदतीबद्दल त्याला कृतज्ञता दाखवावयाची नव्हती हेंही तेवढंच खरं. त्याच्या पुस्तकाचा खर्च मी भागवला असता तर त्याने मला त्याचा ग्रंथ अर्पण केला असता. मला वाटतं, मनुष्य कृतज्ञता व्यक्त करण्यास केव्हा

तयार होतो, कीं जेव्हा त्याला आणखी कांही स्वार्थ साधावयाचा असतो तेव्हा! म्हणजे कृतज्ञतेच्या पाठीमागे स्वार्थाचा झरा असतोच. आपला स्वार्थ साधण्यासाठी कृतज्ञतेचा बुरखा घेतलेला असतो हा एक कट्टू नियमच दिसतो. मी कर्तव्य म्हणून मदत केली पण माझ्या मित्रप्रेमाला असा अचानक धक्का बसला. त्याच्या कृतज्ञतेच्या मागे स्वार्थाचा पोलीस दबा धरून बसला होता.

असंच एकदां माझ्या एका अविवाहित मित्राने त्याच्या आयुष्यांतील पहिलें आणि बहुतेक शेवटलें एक पुस्तक लिहिलें. पहिलें आणि शेवटलें म्हणण्याचें कारण असं कीं त्याने तें स्वतः लिहिलें नव्हतें. एका लेखक मित्राकडून लिहून घेऊन तो स्वतः लेखक म्हणून जगाच्या बाजारांत आपली किंमत वाढवून घेणार होता. त्याला आपली अमोल कलाकृती (!) कोणाला अर्पण करावी हा मोठा पेच पडला आणि विचार-मंथन करून त्यानें एक अर्पण पत्रिका तयार केली.

त्याने एक गोष्ट ऐकली होती. मुंबईत एका सात मुलींच्या पित्याला आपल्या कन्या कशा रीतीने उजवाव्यांत हें मोठें कोडें पडलें होतें. लोकसत्तेचीं आणि लोकमान्याचीं कोडीं तो सहज सोडवत असे. पण हें कोडें मात्र त्याला फारच कठीण वाटलें प्रत्येकीला हुंडा देण्याची ऐपत नव्हती त्याला. खोलवर विचार करून सात ब्लॉक्सची एक नमुनेदार चाळ त्याने मुंबईत बांधली. मुम्बापुरीत घराभावीं बऱ्याच पदवीधरांना अविवाहित जीवन कंठावें लागते हें तो जाणून होता. मुंबईत घर मिळणार म्हणून, त्या गृहस्थाच्या सर्व मुलींचें विवाह भराभर आटोपले. आणि वधू-पिता संकटमुक्त झाला. ही गोष्ट ऐकून माझ्या मित्राने विचार केला, मी तर आता लेखक म्हणून जगाच्यापुढे येणार आहे. मग एका दगडाने दोन पक्षी कां मारूं नयेत! त्याला प्रसिद्धी तर मिळणार होतीच, लेखक म्हणून त्याचा भाव पण वाढणार होता. पण... ...पण त्या अर्पणपत्रिकेने त्याचा दुसरा आणि खरा मह[त्त्वाचा] फायदा साधणार होता. त्याचें पुस्तक प्रसिद्ध [झालें] त्यावेळीं खालीलप्रमाणे त्याने तयार केलेली [अर्पण] पत्रिका त्यावर होती.

' माझ्या भावी पत्नीस प्रेमपूर्वक अर्पण.' आणि कशी कल्पना सुचली त्या महाशयांना ठाऊक!

आपल्या भावी पत्नीला ग्रंथ अर्पण कर[णाऱ्या] माझ्या मित्राला असें नक्की वाटलें असेल की, आपल्या घरापुढे रेशन दुकानावर कापड घेण्या[सारखा] "क्यू" लागतो तसा विवाह करूं इच्छिणाऱ्या त[रुणींचा] "क्यू" लागेल आणि मग आपल्याला शेवटी कोण[ती] पसंत करावी असा प्रश्न पडेल. आणि वेळेला निवड करण्याकरिता "सिलेक्शन कमिटी" नेमून टाकली.

दुसऱ्या दिवसांपासून त्याच्या घरापुढे "क्यू" लागला कीं नाही मला माहित नाही. पण मला स्वार्थी हेतूचे हसूं आल्यावाचून राहिले नाही.

मनुष्य हा सदा सर्व काळ स्वार्थानें गुरफटलेला असतो. प्रत्येक उपकारामागे स्वार्थाचा बाण दडलेला ठेवलेला असतो. स्वार्थापुढे मित्रप्रेम वगैरे खोटें ठरतें. उपकार करून, औदार्याचा देखावा करून थोडेसे व्यक्त करण्याचा सद्हेतू दाखवून इतरांना [गुंग] करून त्यावर स्वार्थी हेतूचा बाण अचूकपणे [सोडला] जातो. एकूण अर्पणपत्रिकेमागे सुद्धा स्वार्थाचा [झरा] वहात असतो हें निश्चितच! मग माझ्या मित्राला मी दोष कां द्यावा?

---

व्याख्याते गेले दोन तास चऱ्हाट वळत होते. श्रोतृसमुदाय कंटाळून गेला होता. शेवटी ते म्हणाले, "मला वाटतं मी आपला बराच वेळ घेतला. परंतु माझ्याकडे घड्याळ नसल्यामुळे मी किती वेळ बोलत होतो हें मला समजणं शक्य नव्हतं. या सभागृहांतहि घड्याळ नाही ... ..."

तेवढ्यांत श्रोतृसमाजांतून एकाचा आवाज आला— ' पण आपल्या समोर भिंतीवर कॅलेंडर लावलं आहे तें कसं दिसलं नाही तुम्हाला? "



# नवकाव्य

लेखक:— अनंतराव जगताप ( चतुर्थ वर्ष, कला विभाग )

१

## नवी कविता

आज हृदयीं धगधग करी नवा सविता!
जळाया लागे प्राण-पिंडाचा सखोल गाभा
कसा रोखूं मी यातनांचे ही प्रदीप्त आभा?
करुद्ध प्रचंड नवा मार्तंड उरांउरांत पेटला आहे
महाप्रखर त्याचा प्रकाश माझ्या उरांत कोंदला आहे.
उरी जन्मते नवी कविता!
आज हृदयीं धगधग करी नवा सविता!!

नवी कविता नवा साजशृंगार चढवून नव्या युगाचें नवें गीत बेहोषपणें गात, बेगुमानपणें, ' नवी मळवाट ' तुडवीत जात आहे. ' हळव्या भिंगांतून ' वास्तवाचें विश्व न्याहाळत आहे पिस्टनच्या तांडव तालांत, रपरपलेला मासाचा चिखल तुडवीत, संकेतांचीं कोळिष्टकें झाडीत, उबगलेल्या मनाचे फ्यूज उडवीत, भविष्याच्या गर्भांतल्या बाळाच्या रुदनाच्या रोखाने, दिव्य नव्या तेजोवलयाकडे तिच्या जीवाची प्रचंड फेंक आहे. नवकवितेच्या भेदक चंचल नजरेंतील गूढता, तिच्या नवलावण्यांतील चारुता, तिच्या भावनाविष्कारांतील उत्कटता नि ओजस्विता, अनुभूतींतील व्यापकता आणि पदविन्यासांतील मोहकता आदि तिची मनोभूमिका नी वैशिष्ट्यें समजून घेऊन तिचा खराखुरा परिचय करून घेऊं या.

२

## मर्ढेकर युगाचीं वैशिष्ट्यें

आपला समाज विलक्षण वेगाने क्रांतिकालांतून जात आहे. कालपावेतो जीं देशभक्तीचीं ध्येयें, ज्या जीवनमहत्वाकांक्षा, जीं रम्य स्वप्नें, जीं मानवी मूल्यें सर्व जनतेस उत्तेजित करीत होतीं, तीं प्रेरणा देईनाशीं झालीं आहेत. आजच्या मानवाची जीवनविषयक दृष्टी बदलत आहे सांस्कृतिक जीवनाची अंतर्बाह्य रचनाहि बदलत आहे. या बदलत्या जीवनानुभूतीचा आविष्कार ' नवकाव्यांत ' आविष्कृत होत आहे मर्ढेकर मानव समाजाच्या आशाआकांक्षांचीं, ध्येयांचीं, मनोभावांचीं कल्पनारम्य रंगीत स्वप्नें रंगवीत बसले नाहीत; तर यंत्रयुगांत इंजिनच्या तालावर पिचलेल्या माणसांचें विश्व कसें नाचत आहे, परिस्थितीचें ॲसिड पिऊन लिबलिबलेलें त्याचें मन कसें कण्हत आहे, त्याच्या मनास कशीं खिंडारें पडलीं आहेत, त्याचं मन प्राप्त परिस्थितीस कसं उबगलेलं आहे याचं अत्यंत वास्तवपूर्ण चित्र मर्ढेकरांनी ' कांही कविता ' तून केलेलें आहे. अनिलांनी दिलेल्या नव्या छंदावर नवे संकेत चढवून, नव्या युगाच्या नव्या भाषेंत ते आपला जीवनविषयक दृष्टिकोन व आशय व्यक्त करीत आहेत. भांडवली संस्कृतीने, प्रचलित समाजपद्धतीने व्यक्तीचा निर्दय बळी घेतला आहे, ही नवी जाणीव मर्ढेकरांनीच स्पष्ट शब्दांत मराठी कवितेंत प्रथम आविष्कृत केली नी त्यामुळे तेच केशवसुतयुगानंतरचे युगप्रवर्तक ठरतात.

इग्लंडमध्ये एलिझाबेथच्या उत्तरकालीं ' डन ' कवीने प्रथम प्रतीकवादाचा ( Symbolism ) अवलंब केला. नवीन चमत्कृतीपूर्ण प्रतीकांची नव उज्वल धारा त्याने निर्माण केली. त्याचप्रमाणे नवकाव्य मुक्त छंदांतून, प्रतीकांतून, ध्वनियुक्त शब्दांतून, अवतरणांतून आविष्कृत होत आहे. कवीचे शब्द केवळ विचार किंवा भावनाच व्यक्त करीत नाहीत, तर विचारांची नागमोडी गतीही दर्शवितात. नवकवीच्या प्रतिभेने व्यक्तिगत जीवनाची सीमा ओलांडली आहे. ' सामाजिक परिस्थिति व आंतरिक प्रेरणा यांच्या संघर्षांतून उज्ज्वल प्रतिभेने जी भावमूर्ति बनते ' ती प्रतीकांच्या साहाय्याने व मुक्त छंदाने साकार होते.

ज्ञान सारखे वृद्धिंगत होत आहे. कवीला नवी जाणीव, नवी प्रतीति, नवे अनुभव येत आहेत. जगांत कुठल्याच मूल्यांची स्थिरता दिसून येत नाही. त्यामुळे विचारांच्या तरल असंबद्ध स्वप्नसृष्टींतून एक कलात्मक

रचना निर्माण करण्याची, नवी जाणीव अभिव्यक्त करण्याची, नवप्रवाही व तेजस्वी अनुभूति आविष्कृत करण्याची उत्कंठा कवीला लागलेली आहे. नी म्हणून दिव्य दृष्टीला ज्ञात झालेला आशय अभिव्यक्त करण्यासाठी मुक्तछंदाचा व प्रतीकाचा आश्रय घ्यावा लागला. समाजास बदलूं पाहणारी वैचारिक बैठक वास्तवतेचें यथास्थित, नवज्ञानाचा उपयोग करून केलेलें चित्रण, मुक्तछंद, प्रतीकांचा नि अपूर्व नाविन्यपूर्ण प्रतिमांचा वापर, अंतर्मनाचे पापुद्रे उलगडीत मनोभावांच्या संघर्षाचें रेखाचित्र रंगविणें आणि नव्या जगांतील जीवनमूल्यांची पुरोगामी दृष्टी देणें हीं सर्व नवकाव्याची ठळक वैशिष्ट्यें आहेत. ह्या वैशिष्ट्यांचा वापर करून श्री. य. द. भावे, श्री. विंदा करंदीकर, श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध, गं. ब. ग्रामोपाध्ये इत्यादि नवकवि नवकाव्य लिहीत आहेत. नवकाव्य ' आशय ' नि ' अभिव्यक्ति ' या दोन्ही दृष्टीने नवें आहे.

## ३

## नवकाव्यांतील दोन प्रवाह

नवकाव्याची मूलप्रेरणा रम्यभावनात्मक नसून वैचारिक आहे. आधुनिक यंत्रसंस्कृतींतील विषमता, दारिद्र्य, उपासमार, अस्थिरता, युद्धासारखे अनर्थ, आध्यात्मिक मूल्यांविषयीं वाटणारी अश्रद्धा, मानवी जीवनाची क्षुद्रता व किळसवाणेपणा या सर्व गोष्टीचे पडसाद अत्यंत अभिनवतेने नवकाव्यांत उमटले आहेत. नवकाव्यांत स्पष्टपणें दोन धारा, दोन प्रवाह दिसून येतात. एकप्रवाह -- भावना प्रेरणांचें उदात्तीकरण ( Sublimation ) करणारा, समाजवादी विचारसरणीचा आहे. श्री. विंदा करंदीकर व श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध हे या प्रवाहाचे आविष्कारक आहेत.तर दुसरा प्रवाह भावनांच्या अधःपतनाचें स्वरूपदर्शन करणारा, निराशावादी मनोवृत्तीचा आहे. श्री मर्ढेकर व भावे यांच्या काव्यांत हा प्रवाह दिसून येतो

### मर्ढेकर-भावे यांचा निराशावादी प्रवाह

भांडवली संस्कृतीने, यंत्रयुगाने, विज्ञानाने मानवाची व मानवी मूल्यांची जी हानी चालविली आहे त्याबद्दलचा सात्त्विक संताप व अतिरिक्त चीड या दोन्ही प्रवाहांतून व्यक्त झालेली आहे. श्री. मर्ढेकर व भावे यांच्या काव्यांत निराशावाद जास्त प्रमाणांत दिसेल. मानवी अंतकाळ जवळ आला एवढे ते सांगतात. नव्हे ' पृ... तिरडी जळो देवा भली ' असेंही ते म्हणतात. ... यंत्राचा दास झालेला आहे, यांतून त्याची सुटका ... अशा विचारसरणीचें अत्यंत वास्तवपूर्ण चित्र ... रलेलें दिसेल. भाव्यांना फक्त ' कार्लमार्क्स ' ... दिसतो. परन्तु नवे जग उभारण्याची नवी प्रेरणा ... शकत नाहीं. यंत्रयुगांत भांडवली संस्कृतींत माणसा... मानव्याचा संहार होत आहे. माणूस पूर्णतया ... बनला आहे त्याच्यामध्ये ' उगीचता ' व ' वि... भरून राहिली आहे. त्याच्यामध्ये विकृती वाढत ... त्याला परिस्थितीची चीड येते नि ती चीड ... मर्ढेकर नव्या प्रतीकांच्या सहाय्याने व नव्या ... व्यक्तीच्याद्वारें वाचकांपुढे मांडत आहेत. ... काव्यांत सौन्दर्यवादाची दाट छाया नाही किंवा ... वादाची ललकार नाही. ते फक्त जीवनाच्या ... त्यांना जे सामान्य अनुभव येतात ते अनुभ... संकेत मोडून नव्या प्रतिमा, नवे शब्द नि नवे ... यांच्या मुशींत ओतून, वास्तव स्वरूपांत ... घेऊन तीव्रतर शब्दांत अभिव्यक्त करतात.

पृथ्वीची तिरडी । ( एरव्ही परडी
फुलांनी भरली ) । जळो देवा भली
किंवा सत्तेचेंच तूप । सत्तेचीच पोळी ।
मानव्याची होळी । भाजाया ती ॥
देवा ऐशी भूक । कासया दिलीच ।
झालों कासावीस । मीही नंगा ॥

यांत नवकवींना जगाबिषयीं वाटणारा ... उबग किती स्पष्ट शद्बांत मर्ढेकरांनी व्यक्त ... त्याचप्रमाणे –

काळ्या बंबाळ अंधारीं
धपापतें हें इंजिन;
कुट्ट पिवळ्या पहाटी
आरवतो दैनंदिन
भोंगा –
घनश्याम सुंदरा श्रीधरा गिरणोदय झाला,
उठि लवकरि दिनपाळी ... ...

x x x

कुत्रापि पतितं तोयं यथा गच्छति सागरं
सर्वचक्रभ्रमस्कारं मालकं प्रतिगच्छति

x x x







शुभं करोति कल्याणम् दारिद्र्यम् ऋण संपही
शुद्धबुद्धिविनाशाय भोंगाकुत्री नमोस्तुते.

हा यंत्रावर व भांडवली मनोवृत्तीवर चढविलेला हल्ला तितकाच परिणामकारक वाटेल.

पिपांत मेले ओल्या उंदिर
माना पडल्या मुरगळल्याविण
ओठावरती ओठ मिळाले
माना पडल्या आसक्तिविण
गरिब बिचारे बिळांत जगले
पिपांत मेले उचकी देऊन
जगायची पण सक्ती आहे
मरायची पण सक्ती आहे
ओठांवरती ओठ लागले
पिपांत उंदीर न्हाले ! न्हाले !

या कवितेंत यंत्राने मनुष्यास कसें संज्ञाहीन केलें आहे तें नाविन्यपूर्ण वर्णनांतून सूचित केलेलें आहे. तसेंच—

कुठें धुराचा जळका परिमल
गरम चहाचा पत्ती गंध
कुठें डांबरी रस्त्यावरच्य
भुक्या शांततेचा निशिगंध

ह्या ओळींतून सांदीकोपऱ्यांतलें जीवन नाविन्यपूर्ण शैलीने मर्ढेकर आपणास दाखवीत आहेत. त्याप्रमाणे—

निबरट किरटी
हाड बंगले अशा बायका
उष्टी भांडी उरकुन बसल्या
विणीत चिमणे जीवन !

ह्या ओळींत: चितारलेलें जीवन हेंच बहुतांशी मजुरांचें जीवन नाही काय ? मर्ढेकरांच्या काव्याचें खरें वैशिष्ट्य म्हणजे चमत्कृतिपूर्ण प्रतिभायोजनेंत व नाविन्यपूर्ण शब्दरचनेंतच दिसून येते.

मिस्किल शिंगल, भोळासाधा
सीधे रूळ नी खडी गोमटी
कुरूप काळी पाठ लावितां
ज्या जीवाला धरिले पोटीं
ह्या समर्थाच्या गोष्टी सांगा
फलाटदादा, फलाटदादा
बोला वो तुमि
गेली गाडी

बोला वो तुमि
फलाटदादा, फलाटदादा

या ओळींतून फलाटदादाचें ( पिचलेल्या मानवाचें ) जें चित्र रेखाटलें तें किती समर्पक नी हृद्य आहे. तसेंच

पंक्चरली जरि रात्र दिव्यांनीं
तरी पंपतो कुणि काळोख
हंसण्याचें जरी वेड लागलें.
भुंकतात तरि अश्रु चोख.
फत्कन बसली रबरी रात्र
दुजा न टायर या अवकाशीं
खांद्यावरती न्यावी रात्र
जमेल ज्याला त्याने त्याने
डोळ्यावरती जरा कातडें
ओढावे पण हंसत मुखाने
पंक्चरलेल्या रबरी रात्रीं
गुरगुरवावी रबरी कुत्रीं ! !

ह्या कवितेंत नवे शब्द, नव्या कल्पना, पण कांहीशा दुर्बोध, मांडलेल्या आहेत. पण त्यांतूनहि दुःखी जीवनाचें दर्शन घडतें.

मर्ढेकरांच्या कवितेंत जें जीवन दिसतें तसेंच आमचें जीवन आहे. जीवनांतील विसंगतीचें व कुरुपतेचें यथार्थ दर्शन त्यांच्या कवितेने होतें. ' फलाटदादा ' न्हालेल्या जणु गर्भवतीच्या ' ' विशाल पटे सतेज तांबुस ' या कविता नितान्तसुंदर आहेत. त्यांच्या प्रवाहास आपली अभिनव धारा श्री. य. द. भावे यांनी आणून मिळविली आहे. भाव्यांच्या ' आर्दा ' नि ' अचानक ' ' हळवे भिंग ' या संग्रहांत ' रेशमी ' ' रेशमी कळ्या ' ' कणीस ' ' विव्हल पक्षी ' ' त्या चांदरातीं ' ' तुझ्या स्मृतीला ' ' माध्यामोहर ' ' वरती ' ह्या कविता नितान्तसुंदर आहेत.

चोयट्या ! चोयट्या !
बरें झालें देवा
त्या तरी निर्मिल्या ! !

हें अत्यंत थोडक्या शब्दांतून सूचित केलेले मजुराचें चित्र अत्यंत वास्तव आहे. त्याचप्रमाणे

खंडी खंडीची ओझीं वाहून
पाठ पिचली
आणि सालडी तिची निघाली

या ओळींतून मजुराचें खरेंखुरें चित्र दिसेल. ' हळवे

भिंग ' हा भावे यांचा कांहींसा दुर्बोध पण वैशिष्ट्यपूर्ण असा संग्रह आहे. त्यांत ते प्रथमच 'तेजोवलयाचें' स्वरूप समजून घेतात पण त्यांत कल्पनांची नि विचारांची गल्लत झालेली दिसेल.

'मांगल्य रूपाच्या शिवाचें सुजत्व!'

या ओळींतून निश्चित काय सांगावयाचें तें समजत नाही. तसेंच 'अंतरात्म्यांत लोंबलोंबतोस तूं

जसा क्रूसावर जीजस ख्रिस्त!

ह्या ओळीहि दुर्बोध आहेत. दुर्बोधता नवकाव्यांत अपरिहार्य आहे असा दावा करून चालणार नाही. नवकवि जे प्रतीक घेतात तें केवळ कवींनाच समजणारें नसावें.

अनंत शून्याच्या
पोकळी माजीं
तमानें पेटला चंद्रमा दुबळा
तिमिर स्फुलिंगें
संतत वर्षतो
आणि पृथ्वीला
दीन विनवितो
"दे दान, दे दान, सुटूं दे गिराण"

ही कविता नि तिचें प्रतीक गूढ आहे. आशय स्पष्ट होत नाही. परन्तु भावे कांही कविता नि प्रतीकें सूचकतेने किती हृदयंगम नी प्रासादिक लिहूं शकतात हें खालील ओळीवरून सहज समजेल

पडतो पाऊस पडतो पाऊस
सोनचांफ्यावर होते दाटण
पिवळ्या धमक सुगंधी सुमांची
लाजरीची वेल
सरकूं लागते
रसरसलेल्या सोनचाफ्याकडे
खुलते कळी अवकाशाची
अन् पसरून कर पटकन्
इंद्र धनुष्याचे
दृढ आलिंगितो नदी यौवनेला
जलमदानें
आळसलेल्या.

## उज्ज्वल प्रवाह–

नवकाव्यांतील दुसरा जोरदार नि भावनांचें उदात्तीकरण करणारा, 'समाजवादी' नवा दृष्टिकोन देणारा व भावी मानवी जीवनाचें आशावादी चित्र चित्र... उज्ज्वल प्रवाह मुक्तिबोध-करंदीकर यांचा आहे ... सहानुभूति आणि सहानुभव, कणखर आशावादी ... वारी दृष्टिकोण, मानवाच्या उज्ज्वल भविष्या... सुजाण विश्वास हे या विचारसरणीचे गुण होत. ... बोधांच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे 'या युगा... हें काव्य निर्बळ, विकृत, तुच्छतामूलक न होतां ... सहानुभूतीमुळे मानवी भावनांचीं निरनिराळीं ... दर्शविणारें ओजस्वी असें निर्माण होणार अस... नैसर्गिकच आहे असें म्हणावे लागेल. हें नव... नुसतें सामाजिक परिस्थितीचें चित्रण करूं पहात ... तर परिस्थितीवर आरूढ होऊन ती बदलूं पाह... नवकाव्य अत्यंत ज्वलंत नि प्रक्षोभक आहे. ... नवकवींचा जीवन दृष्टिकोन अत्यंत व्यापक, ... आहे आणि निष्ठा पुरोगामी आहे. करंदीकर ' ... सहर्ष स्वागत करतात. मुक्तिबोधांना 'स्वप्नाचा सा... त्कार' होत आहे. ते 'लाल कंदील' दाखवीत ... करंदीकरांना 'श्रमदेवीचा साक्षात्कार', ... आहे नी म्हणूनच 'स्वेदगंगेला' ते प्रणाम करीत ...

"स्वेदाची ही अखंड गंगा
देश धर्म रक्ताचे सारे
फोडित धरणें नी बांधारे
भिजवित माती काळी गोरी
पहा धांवते अखिल जगावर,"
जीवननौका नाचे त्यावर –
"कांचनगंगेहुन जी सुन्दर
भागिरथीहुन जी पावनतर
परमेशाहुन जनहित तत्पर
त्या गंगेतिल स्वेदबिंदुनो!
प्रणाम माझा तुम्हा निरंतर"

नवें आनंदी जग निर्माण करण्यासाठी 'लोक... चा कूच त्यांना दिसत आहे.

लक्ष हस्त लक्ष पाद लोकशक्ति ही
क्रान्तीच्या दीप्तींतुनि मुक्ति शोधिते
शोधिते नव्या युगास ज्यांत पूर्णता
पावती अनेक उच्च दिव्य कामना
दैन्यता न जीवनांत फक्त दिव्यता
भव्यता कृतींत आणि पूर्ण ऐक्यता
मानवांत स्वप्न जेथ सत्य होतसे.



लोकशक्ति ही - क्रांतीच्या दीप्तींतुन तेथ जातसे.

नव्या युगांत यंत्रास स्थान नाही काय ? पण त्यांत यंत्राचा काय दोष ? उलट मानवी जीवन अधिक सुखी व समृद्ध बनवायला यंत्रावर सामुदायिक मालकी हवी. आणि म्हणून करंदीकर 'ये ये यंत्रा!' असे यंत्राचें स्वागतच करीत आहेत

ये यंत्रा ये!
ये ये घडवित सृष्टी
ये ये सुखवित कष्टी
ये उच्चारित वेद नव्या रचनेचे
ये ये नाचत युगप्रवर्तक तांडव
शक्तीच्या सम्राटा!
ये यंत्रा! ये यंत्रा!
संहारित नवदानव
निर्मित ये नवमानव
उद्‌घोषित नवमूल्यें
उद्‌घोषित क्रांतिपाठ
ॐ क्रान्तिः क्रान्तिः क्रान्तिः

करंदीकरांना जीवन हें निराशावादी न वाटतां दुर्दम्य आशावाद ते प्रगट करीत आहेत.

हें जीवन अंबर दैवानें विणतांना
मांडिले उभे जरि निराश-धागे नाना
आडवे तयांतच आशा-सूत गुंफियलें
छे, तुटो न कोणी, जीवन त्यांतून सजलें

करंदीकरांच्या काव्यांत ओजोगुण भरपूर आहे. प्रामाणिकपणाहि आहे आणि तें मार्क्सवादानें रसरसलें आहे. त्यांची 'मजूर' कविता अत्युत्कृष्ट कवितासंग्रहांत मानाचें स्थान मिळवील.

शरच्चन्द्र मुक्तिबोध यांच्या कवितेंत संमिश्र रूपकें नवी प्रतीकें नी अभिनव प्रतिमा वगैरे आहेत. मुक्तिबोधाच्या कवितेंत न्याय, समता, माणुसकी यांचीच आराधना आहे. त्यांच्या कवितेंत भावनांचा रम्य हृदयंगम आविष्कार झालेला आहे. त्यांच्या काव्यांत केवळ भावरम्य कल्पनांचा झराच झुळझुळत नाही तर दाहकता, जळजळीतपणा आणि असीम दुःखसंवेदनांच्या ज्वालाहि उफाळत आहेत. छंदाच्या लहरीवर त्यांची प्रज्ञा गहिरी झालेली आहे. ती दाहक शराब पिऊन ज्वाळांची कफनी घालून, नव्या युगाचें नवें गीत गात, नव्या युगाचा साक्षात्कार घडवीत, जीवनाचा जयघोष करीत आहे. मानवतेचें नवें दर्शन दाखवित त्यांचा तेजस्वी काव्यसविता धगधगत आहे. मानवाचें नवें जग ते निर्मू इच्छितात.

हुश्शार रे! जन्म घेतें कांहीसें नवीन
प्रचंड जनशक्ति जिंके यामधुन
आयका! या संघर्षांच्या गदारोळांतून
भविष्याच्या गर्भांतल्या बाळाचें रुदन

° ° °

स्वातंत्र्य हें स्वप्न किंवा भोळ्यांचा विचार
म्हणा! जीवनाचा नाद नाही थांबणार
त्याच्या लाटा दाहि दिशा पोटांत घेणार
आजचें जें स्वप्न - उद्या वास्तव होणार

नव्या जगाचें जें स्वप्न कवी पाहात आहे तें उद्याच्या वास्तव जगाचें आहे हा त्यांचा आत्मविश्वास आहे. ह्या नव्या निर्मितीसाठीं लोकसेना निघाली आहे.

"क्षणांत दीनांची भुकेली सेना कीं,
क्षणांत जाज्वल्य मानव विराट"

° ° °

दुधाविना अन्नाविना मेलेल्या बाळांनो,
खुला डोळा बघणाऱ्या कंगाल आयांनो
रस्तोरस्ती मरणाऱ्या दुर्दैवी जीवांनो
खोल जखम हो केली प्राण देणाऱ्यांनो -
प्राण तुम्हीं दिले, आम्ही चैतन्य पावलों
अश्रु तुम्हीं दिले, आम्ही आग्नेय जाहलों
आम्ही खोल खोल तुमच्या प्राणांत बुडालों
अगाधता पाहुनिया स्तंभितसें झालों

अशा रीतीनें मुक्तिबोध जनशक्तीचें हुबेहूब चित्र रेखाटतात. त्याचप्रमाणे 'माझ्या पीडेला अर्थ येईल' 'गंभीर झडते गगन दुंदुभी' 'त्रिशंकूचें स्वप्न' 'लाल कंदील' 'वर्णागम' 'स्वप्नसाक्षात्कार' सूर्ययुग' 'सांज ये हळू हळू' इ. कविता विचार नि कल्पना या दृष्टीनें अत्यंत हृदयंगम नि भावपूर्ण आहेत.

यंत्रा आहे मी प्राण यांत्रिक, आगतिक व ळी परिस्थितीचा.
चोवीस तास गुलाम आहे मानवनिर्मित महायंत्राचा.
तुझ्यापासून, फुलापासून, प्रीतीपासून निर्वासिनी
हृदयी धूळ, केवळ धूळ! शुष्क जळून जाहलों मी
काय करूं गे!

'माझ्या उत्कट आतुर जिवाचिये साजणी' या ओळींतून मनुष्य यंत्रानें कसा अगतिक बनला याचें

प्रासादिक पण वास्तवपूर्ण चित्र आहे. तसेंच

नव्या छंदाच्या डफावरती, सूर्ययुगाचें प्रदीप्त गीत
सूर्ययुगाचें नवीन नातें, नवीन प्रीत, नवीन रीत !

या ओळींतून नव्या युगांतील सुखी जीवन सूचित केलें आहे ! नि म्हणून कवी आनंदाने मानवतेचें दुःख व्यक्त करीत आहे.

नवी कविता !
आज हृदयीं धगधग करी नवा सविता !

## नवकाव्य प्रगतिशील आहे काय ?

केशवसुतांनी मानवी भावनांना वाचा फोडिली. रविकिरण मंडळांतील कवींनी त्या भावनांना सुचारु रुप दिलें. कुसुमाग्रज, कान्त, बोरकरादींनी त्या भावनांना क्रांतीशील, मानवशील बनविलें तर मर्ढेकर संप्रदायांतील कवींनी यंत्रप्रधान संस्कृतीचें, कुजलेल्या, उबगलेल्या भावनांचें वास्तवदर्शन घडविलें आणि मुक्तिबोध करंदीकरादिनी मानवी भावनांना 'समाजवादी' जगाचें नवजीवन दर्शन घडविलें. मानवी भावनांचें उन्नयन केलें. मानवी भावना केवळ आत्मसंतुष्ट राहून भावी समाजजीवन सुखी होणार नसून व्यक्तिगत जीवनाचें कुंपण ओलांडून अधिक व्यापक समाजजीवनाच्या सुखांतच व्यक्तिगत जीवन-सुख आहे हें पटवून दिलें. नव्या युगाच्या नव्या लहरी, नवे छंद, नवे विचार, नव्या कल्पना यांना सुचारु रुप देऊन मानवी भावनांना अधिक व्यापक, विशाल, पवित्र नि मंगल, सेवातत्पर नि सहिष्णु बनविलें.

नवकाव्यप्रवाहांतील मुक्तिबोध व करंदीकर याची काव्यधारा निश्चितपणे प्रगतिशील आहे. कारण त्याची बैठकच मुळी पुरोगामी विचाराची आहे. बुद्धिवादाने सुसंस्कृत, परिमार्जित झालेल्या भावनांच्या रम्य अनुभूतीतून त्यांच्या प्रतिभेचा अभिनव आविष्कार होत आहे. मराठी रूढ काव्यापेक्षा थोडे वेगळे, क्रांतिप्रवण पण उज्ज्वल भविष्य दर्शविणारें असें हें बण्डखोर नवकाव्य आहे. ज्ञान जसजसें विकसत आहे नी जसजसें व्यापक बनत आहे तसतसें नवकाव्याचें स्वरूपही व्यापक बनेल. नवकाव्य समाजाच्या विशिष्ट भावना रंगविण्यांत, समाजाचें वास्तवचित्र चितारण्यांतच धन्य मानीत नाही; तर आज समाज रूढी, विषमता, ढोंग, खोटा धर्म, दारिद्र्य, खोटा पारंपारिक स्वाभिमान, खोटी सभ्यता, जातिनिष्ठता, सहिष्णु शून्यता, आणि अमंगलशुचिता आदि बंधनांनी जखडलेला आ… त्याला मुक्त करून नवसमाज निर्माण करण्याच्या उ… नी पवित्र ध्येयाने प्रेरित झालली आहे. हिन्दी … त्यांतही ही प्रगतिशील काव्यधारा एका तपापूर्वी … 'निराला' 'दिनकर' 'पन्त' आणि 'अंचल' … कवींनी जोरदार रीतीने निर्माण केली. हिन्दी रसि… त्या काव्यधारेचें स्वागत केलें. परन्तु आज ती … धारा थंडावल्यासारखी वाटते. प्रगतिशील का… केवळ दलित, मजूर वर्गाचें व भावनांचेंच वास्तव… रेखाटूं नयें. समाजवादी विचारात्मक कल्पनांचाच … काव्यांत आविष्कार करूं नये. त्याच दृष्टीने नवें … हें निश्चितच प्रगतिशील आहे.

## नवकाव्याचा ध्रुवतारा

नवकाव्य दुर्बोध, शिवराळ, निराशावादी, … नाचें ओंगळ नी उबग आणणारें स्वरूप दाखवि… आहे तें त्रुटित नी प्रसंगीं गद्यपद्य मुक्तछं… आविष्कृत होणारें आहे. ना पूर्ण भावनात्मक ना … विरोधात्मक असेंच कांहीसे आहे. विविध … नवकाव्यावर केलें जातात. परन्तु नवकाव्याची … वैचारिक बैठक व जीवनाकडे पाहण्याचा नवा साम… दृष्टिकोण लक्षांत घेतां आपल्या हें चटकन लक्षांत … की, हे आरोप संपूर्ण सत्यावर आधारलेले न… जीवनच कांहीसे ओंगळ, निष्ठाशून्य, निरा… बनल्याने त्या जीवनाचें वास्तवचित्र चितारणारें … तीच भूमिका स्वीकारणार. मात्र कवीने केवळ नि… वादी भावनाच रंगवूं नयेत, तर जीवनांतील … विषय जे प्रेम नी सौन्दर्य हेंही हाताळावेत. … आणि सौंदर्य ह्यावरील विश्वास उडणें म्हणजे जी… वरचा आणि अखेरीस काव्यावरचा विश्वास उ… सारखें आहे.' हे नवकवी ग्रामोपाध्ये यांनी … केलेलें आहे. प्रगतिपर काव्यांत 'जीवनांतील सौ… कोमलता, शुचिता, मंगलता, विश्वबंधुता, सहि… मानवता नी प्रेम ह्या भावनाहि हृदयंगम रीतीने … रायला हव्यात.

कवींनी जसें केवळ प्रिया, मुलें, फुलें, तारका, … नितान्तरम्य निसर्ग यांतच गुरफटून चालणार … तसेंच केवळ विचित्र राजकीय प्रणालींचें प्रचार… चित्र रेखाटूं नये, तसेंच सामाजिक मूल्यांचें, क्रांति… धार्मिक नी आर्थिक मूल्यांचेंच केवळ चित्रण क…



सर्व समाजाला 'मानवता धर्माची' उच्च प्रेरणा देणारी, जीवनावर नितान्त अढळ निष्ठा निर्माण करणारी, बहुजन समाजाच्या आशा आकांक्षांचीं, शाश्वत भावनांचीं, जीवनांतील सत्यांचीं, विचारप्रवर्तक, प्रक्षोभक पण हृदयंगम चित्रें नवकवींनी रंगविलीं पाहिजेत. 'प्रचीति, प्रसार, प्रक्षोभ, प्रयत्न नी प्रतिभा' हे काव्याचे लाडांनी पंचप्राण मानिले आहेत ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन भावपूर्ण आणि रसपूर्ण काव्य निर्माण करावें. poetry is not only the criticism of life but it is also an interpretation of life. आणि ह्या दृष्टीने मानव जीवन हाच नवकाव्याचा ध्रुवतारा असला पाहिजे हें जाणतेपणाने नवकवींनी ओळखूनच नव–काव्यधारा तेजस्वी, मंगल नि विशुद्ध बनवावी.




न्यू प्रभात सोडा फाउन्टन,

३५ पोलन पेठ, जळगांव पू. खा.

तुम्हांस....

★ शुद्ध साखरेपासून तयार केलेली
★ भरपूर कॉर्बनऑक्सिडवायुयुक्त
★ रिफ्रिझेटरने बर्फतुल्य थंडगार केलेली
★ उत्तम रुची असलेली

उन्हाळ्यांतील थंड पेय
ऑरेंज ज्यूस
( प्रभात प्रॉडक्टस् )

अशी उत्तम रुचकर पेयें हवी ना ! तर मग आमचे दुकानचा एकवेळ अवश्य अनुभव घ्या. तुमचा संतोष हेंच आमचें ध्येय.

प्रोप्रः - रामचंद्र कृष्णाजी भादलीकर.

# रिक्षा की भिक्षा ( लघुकथा )

लेः— कु. सुमति कोल्हटकर ( चतुर्थ-वर्ष, कला-विभाग )

हॉलमध्ये दिव्याचा मंद प्रकाश पसरला होता. बागेंतील रातराणीला बहर आल्यामुळे तिचा मधुर सुगंध वातावरण धुंद करीत होता. हॉलमधील भिंतीवर काढलेल्या चित्रांतील स्त्री आपल्या हरिणाला इतके दिवस त्याच कारुण्यपूर्ण नजरेने ओढ्याच्या कांठीं कुरवाळत बसली होती. तेथे असलेल्या सोफा सेटची परिस्थिति अनेक वेळा पालटूनहि त्याला आज पूर्ववत स्थिती प्राप्त झाली होती. पण नीला मात्र मोठ्या उत्सुकतेने -- मोठ्या आतुरतेने घड्याळाच्या मंद गतीने चालणाऱ्या काट्याकडे पहात होती व जिन्यावर न वाजणाऱ्या पावलांची चाहूल घेत होती. मनांतील ही सर्व आतुरता दिसूं न देण्याचा प्रयत्न किती निष्फळ होत आहे हें हॉलच्या भिंतीवरील घड्याळाकडे पुन्हा पुन्हा पाहतांना बसणाऱ्या मानेच्या नाजुक हिसक्यावरून व पुढें येणाऱ्या बंडखोर शेपट्याला कलापूर्ण रीतीने पाठीवर टाकतांना होणाऱ्या हाताच्या सुंदर हालचालीवरून स्पष्ट होत होते.

नीला मोठी गोड पोरगी होती. कॉलेजचें शेवटचेंच वर्ष होतें तिचें. आर्ट्स्कडे असल्यामुळे व कॉलेजजीवन अत्यंत आनंदानें घालविण्यास योग्य त्या गोष्टीचा तिच्या जवळ भरपूर 'स्टॉक' असल्याने तिने आतापर्यंत 'कॉलेज लाईफ्' चांगलेच 'एंजाय्' केलें होतें. आपल्या खिलाड्र वृत्तीमुळें व मोकळ्या स्वभावाने ती सर्व कॉलेजमध्यें अत्यंत लोकप्रियहि झाली होती. पण तिच्या मोकळ्या स्वभावाबरोबर तिच्या अंगीं भरपूर खट्याळपणा व मिष्किलपणाहि भरलेला होता. त्यामुळे तिच्या स्वभावांत अनंत आकर्षक गोष्टींचें मिश्रण झाल्यानें व स्वभावाला सौंदर्याची जोड मिळाल्याने ती सर्वांनाच हवी हवीशी वाटे.

आज तिच्या आतुरतेचं कारण अगदी निराळं होतं. तिने बऱ्याच दिवसापूर्वी एक नाटिका लिहिली होती व ती मुंबई नभोवाणी केन्द्राकडे पाठविली होती. ती स्वीकारली गेल्याचें व नभोवाणी केन्द्रावरून प्रयोग आजच रात्रीं होणार असल्याचें तिला पत्र आलें होतें. आठ वाजलें होतें. आणखी अर्धा तास हवें होतें.

पण तिच्या आतुरतेचं दुसरं हि एक कारण सुरेन् आणि चारूला तिनं नाटिका ऐकायला होतं. आणि त्यांना बोलावण्याच्या मागे सुद्धा रहस्य होतं. किंबहुना तिच्या मिष्किल स्वभा- एक नमुना होता तो. सोफ्यावर मागे बसली असतांना तिच्या डोळ्यासमोरून तीं तरळूं लागलीं—

आपली निळी साडी एका हाताने दुसऱ्या हाताने पुस्तकें सांभाळीत, पुढे मानेच्या झटक्यासरशी मागे करीत ती होती. इतक्यांत एक भिकारी तिला आडवा चांगला धट्टाकट्टा होता तो पण चेहऱ्यावर दैन्य, अंगावर फाटकी लक्तरें, गाल व गेलेले असा विलक्षण केविलवाणा त्याचा निर्वासित होता तो. घरांत कुणीतरी आजारी, खायला अन्न नाही-आणि कहीं किरकोळ नोकरी सुटलेली, अशा स्थितींत भिक्षेशिवाय यच राहिलेला नव्हता. पूर्वीचे कराचीमधील जीवन व प्रतिष्ठितपणा फाळणीमुळे पार होता व कधी स्वप्नींहि नसलेलें लाचारीचें पतकरावें लागलें होतें. नीला अत्यंत मुलगी. हें सर्व ऐकून तिच्या डोळ्याला तिचा हात पर्सकडे गेला व ती त्याला

इतक्यात—

सुरेन् तिकडून धावतच आला.

"लाज वाटत नाही भीक मागायला? धट्टाकट्टा दिसतोस अन् भिक्षा मागतोस.



का नाही भरत त्यापेक्षा" सुरेन् तावातावाने बोलत होता. "चल चालता हो येथून. काम करायला नको अन् भिक्षा मागायला पाहिजे. हरामखोर"

अन् त्याच्या त्या तोफखान्याने बावरलेला भिकारी तिच्याकडे एक करुण कटाक्ष टाकून निघूनहि गेला. नीला या प्रकारोने खूप चिडली... पण सुरेन् जणू काय आपण केवढ्या आपत्तींतून नीलाला वाचवले अशा कल्पनेने तिच्याकडे हसत हसत पहात निघूनहि गेला होता.

तिला दुसरा प्रसंग आठवला. ती अन् चारू स्टेशनवरून घरीं येत असतां एकदम पाऊस सुरू झाला. आणि त्यांनी एक रिक्षा ठरवून त्यांतून त्या घरीं आल्या. पाऊस सपाटून पडत होता. रिक्षावाला अगदी चिंब झाला होता. चारूने त्याला चार आणे दिले.

"बाईसाहेब, एवढ्या पावसांत आणलं—निदान बारा आणे तरी......" तो केविलवाण्या सुरांत मागूं लागला.

आणि त्याबरोबर चारू उखडली. त्याला नाही नाही तें बोलूं लागली. 'रिक्षा ठेवायची ऐपत नाही तर मग भिक्षा का मागत नाही? असं फसवण्यापेक्षा तें बरं! एक पै जास्त मिळणार नाहीं. चल-चालूं लाग."

तो रिक्षावाला अतिशयच गरीब दिसत होता. नीलाला वाटले त्या बिचाऱ्याला द्यावं आणखी कांही तरी. तिनं पर्स उघडलीहि. पण चारूनं तिला थांबवलं.

"ठेव ते पैसे आंत. अग फार माजोरे असतात हे लोक. जरा पैसे जास्त दिले की डोक्यावर बसतात." ती म्हणाली.

"बाईसाहेब, पोटासाठी मागून घ्यावं लागतं—" तो दीनवाण्या चेहेऱ्यानं बोलूं लागला.

"पोटासाठी! हं! "तिरस्काराने हसून ती म्हणाली" पोट भरत नसेल तर सरळ भिक्षा का मागत नाहीं?"

बिचारा रिक्षावाला शेवटी तसाच परत गेला होता.

ते दोन्ही प्रसंग तिच्या नजरेसमोर तरळत होते व चेहेऱ्यावर मिष्किल हास्य फुकट होतें. इतक्यात साडेआठच्या ठोक्याने ती भानावर आली, जिन्यावरून धाडधाड् पावले वाजवीत चारू व सुरेन् ही आंत अले. सोफ्यावर बसत रेडियोकडे सर्वांनी आपले कान लावले.

"मुंबई नभोवाणी केन्द्रावरून आम्ही बोलत आहोत. आज कु. नील देशपांडे यांची 'रिक्षा की भिक्षा' ही श्रुतिका आम्ही आपणाला सादर करीत अहोत. 'रिक्षा की भिक्षा'—

हे शब्द ऐकताच दचकून सुरेन् व चारू एकमेकांकडे पाहूं लागली......आणि श्रुतिका सुरू झाल्यावर तर त्यांच्या चेहेऱ्यावरचे रंग हळूहळू पालटूं लागले. नीलाच्या खट्याळपणाचा हा नमुना आहे या कल्पनेने रागाने नीलाकडे ते वळले.

पण नीला त्या ठिकाणी होतीच कुठे? आपणाला फुटणारें हास्य त्यांना ऐकूं जाऊं नये म्हणून केव्हाच ती शेजारच्या खोलींत पळाली होती. मानवतेची विटंबना करणाऱ्या त्या दोघांना चांगलाच धडा दिल्याचें समाधान तिच्या चेहऱ्यावर दिसत होतें.

---

मीं एका विधवेशीं लग्न केलें. तिला पहिल्या नवऱ्यापासूनची एक मोठी मुलगी होती. पुढें माझ्या वडिलांनी त्या माझ्या सावत्र मुलीशी लग्न केलें. त्यामुळे माझे वडिल माझे जावई झाले. आणि माझी सावत्र मुलगी माझी सावत्र आई झाली. पुढ मला एक मुलगा झाला. हा मुलगा माझ्या बापाचा मेहुणा झाला. आणि तो माझ्या सावत्र आईचा भाऊ असल्यानें माझा मामा झाला. तेव्हां सहाजिकच तो माझा भाऊ झाला. आणि शिवाय तो माझ्या सावत्र मुलीचा मुलगा असल्याने माझा नातू झाला. तशीच माझी बायको ही माझी आजी झाली, कारण ती माझ्या आईची आई होती. म्हणजे एकाच वेळीं मी माझ्या बायकोचा नवरा व नातू झालों. आणि आजीचा नवरा हा आपला आजोबा होत असल्याने मी माझ्या स्वतःचाच आजोबा झालों.

* * * *

शाळेच्या बोर्डिंगांतून मुलगी सुट्टीला घरीं आली होती, व बापाला ऑल्जिब्रा, ॲरथमेटीक शिकल्याचे ती सांगे. तें आईने लक्षांत ठेवलें होतें. दोन प्रहरीं शेजारीण घरीं बसायला आली तेव्हां आई मुलीला म्हणते, "बाळ, त्यांना या अल्जिब्र्यांत नमस्कार कर पाहूं"

# लाथ मारीन तिथं पाणी काढीन पहा ! !....

## ( नाट्यछटा )

लेः— मधुकर वि बेन्द्रे ( तृतीय वर्ष, कला विभाग )

काय म्हणालात ?...... छे......हो...... अहो असं नर्व्हस् होऊन कसं चालेल......अहो...... जर आपणच असं करायला लागलों तर आपल्या मुला-बाळांना कोण खाऊं घालणार !...... साहाजिकच आहे...... महागाई भीषण आहे त्याला कोण काय करणार आहे......!!......मोठे वाईट दिवस आले बुवा...... छे...... पण असा मागे पाय घेऊन नाही चालणार...... प्रयत्न हेंच माणसाचं कर्तव्य...!!... अहो धमक आहे अंगांत...... काय समजलांत...... लाथ मारण्याचा अवकाश...... पाण्याचे फवारे उड-तील जमिनींतून !!!...... पण नको...... इतकं धैर्य नको सध्या......!!!......

कोण रामभाऊ ? या......हो...या... बसा... नमस्कार......काय पण अगदी वेळेवर आलात...! अहो तुमच्याचकडे येणार होतों पहा......काय म्हणालांत......येण्याचं कारण......!!...... छे... बुवा ! तें कांही विचारू नका......या महागाईनं तर डोकं फिरलंय् बघा......!! एवढ्या पगारांतून इतकं मोठं संसाराचं गाडं ओढणं म्हणजे......कसं काय करावं कांही सुचत नाही.........!!......... ते पहा कर्जाचे हप्ते......!!...तो पहा किराणा मालाची उधारी... ती पहा मुलाची फी...दंड... तें घरभाडं... तें दुधाचं बिल...तो कपडालत्ता...ती उसनवारी !!! अरेरे...डोकं कसं भांबावुन गेलं बघा... काय करावं तरी काय !!...कांही उपाय रामभाऊ !!... हो तुमच्या सल्याशिवाय काय...!!! हो मी आपला दुसऱ्याला मारे धीर देतों...परंतु स्वतःवर तीच गत येते...!! हो! ...रामभाऊ......पण पांच पन्नास रुपये कसंही करून उसने द्या बुवा...! हो ..अगदी या पगारावर देतों पहा तुमचे......!! अहो अगदी चार दिवसांनी परत करतों...पहा बुवा रामभाऊ......अहो आमच्या ... ख्यांनी या संसार-समुद्रांत धीर सोडून कसं चालेल...!! मुळीच आवडत नाही पहा मला हे उसनवार घेणं...! हो, आपले लोक परतच करीत नाहीं... काय करूं रामभाऊ...!! नाही म्हणजे तसं नका ... समजू रामभाऊ !!!...हो धमक आहे अंगांत... काय समजलांत...लाथ मारीन तेथे पाणी काढीन... पहा......हो !!...लाथ मारण्याचा नुसता अवकाश...

काय म्हणालांत रामभाऊ......पैशाची सोय ... कठीण आहे......!!......अरेरे !......अहो ... नका करूं हो...रामभाऊ !!...अहो आम्हाला ... राहण्याची पाळी येईल......पहा बुवा कांही ... उपाय......तो पहा कर्जाचा हप्ता मागायला ... आला......आणि तो कोण...अरे बापरे......!!... मालाचं बिल मागायला आलेला दिसतोय्...... कठीण आहे बुवा......कसं करावं......रामभाऊ... अहो रामभाऊ......ओ हो ...काय म्हणतां... थोडी फार व्यवस्था करतों पैशाची......वा... छान !!...उपकार होतील......काय म्हणता... हो हो...अगदी न चुकता......हो ! नक्की अहो ... देतों सर्व पैसे पगारावर......!!......

काय निघालांत रामभाऊ......काहो...... घाई...... कांही चहापाणी......काय नको... काय म्हणालांत...... हे दिवस फार कठीण आहेत ......हो खरं...... पण असं पहा रामभाऊ, माघार घेऊन चालेल कां...... अहो काय ... आहे ह्या महागाईची...... हं...... अहो ... आहे अंगात रामभाऊ...... हूं...... लाथ मारीन तेथे पाणी काढीन. पहा...... हो...... पण नको... एवढं धैर्य...... लाथ मारण्याचा अवधी ... फक्त.........!! !.........

---



# अ जिं ठा

लेखकः— ब. र. गंगेले ( प्रथम वर्ष, शास्त्र विभाग )

" हें चित्र पाहिल्यावर कसली आठवण होते तुम्हाला ?"

" नाही बुवा. मला कसलीच आठवण होत नाहीं " मी म्हणालों.

" काय, तुम्हीं अजून अजिंठ्याचीं लेणीं पाहिली नाही ? "

एकदा चाळीसगांव येथील आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार श्री. मुस यांचें एक चित्र पहात असतां, वरील प्रश्न त्यांनी मला विचारला होता. तें चित्र एका स्त्रीचें होतें. त्या चित्राच्या कोणत्याही बाजूने पाहिले तरी ती स्त्री आपल्याकडेच पाहात आहेसे वाटे. तेव्हापासून मला लेणीं पहाण्याची उत्कंठा लागली होती. कॉलेजच्या वस-तीगृहाची सहल अजिंठ्याला निघाल्यावर माझी इच्छा पूर्ण झाली.

मोटारींतून उतरल्यावर आम्हीं वर चढलों. वर गेल्यावर सगळीकडे दृष्टी फिरविली असतां, त्यावेळी त्या नयनमनोहर दृश्यांने मन वेधून घेतलें. ती अर्ध-गोलाकृतींत कोरलेलीं लेणीं, समोर उंचावरून खाली खोल दरींत पडत असलेली वाघुर नदी, हिरव्यागार झाडींनीं भरलेलें नदीचें खोल पात्र, त्यांतील झुळझुळ वाहणारें पाणीं, सगळें कसें मन वेधून घेणारें होतें. त्या वेळीं वाटलें लेणीची जागा इतकी सुंदर तर लेणीं कशी असेल ? हा विचार मनांत येतांच लेणी पाहण्याची उत्सकता आणखी वाढली. त्यामुळे पाय आपोआपच तिकडे वळले.

सातव्या शतकांत बुद्धधर्माचा झपाट्याने ऱ्हास झाला, त्याबरोबरच त्यांचीं मंदिरें, मठ, पवित्रस्थानें यांचा नाश झाला. त्याचप्रमाणे अजिंठा लेणींची दशा होऊन बाहेरच्या जगाला तिचा विसर पडला. त्यानंतर इ. स. १८१९ मधे ब्रिटीश लष्करांतल्या कांहीं शिपायांनी ह्या लेणींचा शोध लावला. त्यानंतर रॉयल एशियाटिक सोसायटीने इ. स. १८४३ मधे कांही तज्ञांना तिकडे संशोधन करण्यास पाठविले. त्यांच्या संशोधनावरून आणि अहवालावरून सोसायटीच्या सदस्यांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरांना ह्या लेणीच्या संरक्षणाची विनंती केली. त्यानंतर मेजर गीलने तेथील चित्रें रेखटून लंडनच्या म्युझियममधे पाठविलीं. त्यामुळे दुसऱ्या देशांना अजिंठ्याचा परिचय होऊं लागला.

पहिल्या नंबरच्या लेण्याच्या दारांत पाऊल टाकले तेव्हाच धीर गंभीर, भव्य, शांत व उपदेश करीत असलेल्या स्थितींतील बुद्ध मूर्तीचें दर्शन झालें. या ठिकाणी विजेच्या दिव्याची सोय केलेली आहे. त्या मूर्तीच्या उजव्या बाजूने विद्युद्दीपाचा झोत टाकला असतां, बुद्धाची क्रुद्ध मुद्रा दिसते, समोरून झोत टाकला तर गंभीर मुद्रा दिसते, व मूर्तीच्या डाव्या बाजूने झोत टाकला असता मूर्तीची हसतमुख मुद्रा दिसते. पुष्कळ वेळपर्यन्त हें असें कसे ? माझ्या लक्षांत येईना. मी जेव्हा त्या मूर्तीचे गाल चोळले त्यावेळीं माझ्या लक्षांत आलें की मूर्तीचा एक गाल फुगलेला व दुसरा गाल थोडासा बसलेला आहे. माणूस हसतो तेव्हा त्याचे गाल फुगतात व रागीट मुद्रेंत गाल फुगत नाहीत. दोघांचें मिश्रण म्हणजे गंभीर मुद्रा.

